

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

बेलभाषा

सुमन बेलवलकर

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

अनुक्रमणिका

बेलभाषा

प्रथमावृत्ती : २७ फेब्रुवारी २०००

© राज्य मराठी विकास संस्था

प्रकाशक : प्रशासकीय अधिकारी
राज्य मराठी विकास संस्था
३, महापिलिका मार्ग
मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २६५ ३९६६

मुद्रक : प्र. पु. भागवत
मौज प्रिंटींग ब्युरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

अक्षरजुळणी : सुधीर कुलकर्णी
२०३, मारुती दर्शन
दांडेकर हॉस्पिटलजवळ, पनवेल

मूल्य : शंभर रुपये

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

……………………………………………………………………………………

1. निदान एक कारण 12
2. एक शब्द बोलेन जरी - 14
3. असावे घरटे अपुले छान 16
4. शपथ वाहा 18
5. शिवीलीलामृत 20
6. नावार्थ रामायण 22
7. शब्देविण संवादिजे 24
8. शाकाहारीने केला- 26
9. उखाणे 28
10. भाषा शेजाऱ्याची 30
11. एकेकाचा काळ 32
12. आपुले मरण 34
13. बोलाफुलाची गाठ 36
14. भ्र विरुद्ध ब्र 38
15. कोणाच्या पाठीवर 40
16. राजश्रिया विराजित 42
17. मावशी उरो- 44
18. खात्यापित्यांची भाषा 46
19. उचलली जीभ 48
20. न भिजणारा तिळ 50
21. आड येणारी नावं 52
22. अर्पण 54
23. फार फारशी 56
24. कटुभाषितं 58
25. सरळ नसलेलं रूप 60
26. बाई मी मुलखाची मराठी 62
27. देसभासा मणोहरा 64

28. टाकलेल्या पाट्या 66
29. वर्ग-संवाद 68
30. वाणी स्त्रीरूपिणी 70
31. दर्पोक्ती 72
32. ठकी ते बाऽबी 74
33. श्रीगणेशाच का? 76
34. लेखनरीती 78
35. परंपरा आणि नवता 80
36. भाषा - नवराबायकोची 82
37. कृषीवलांच्या उक्ती 84
38. मिजाजे उर्दू 87
39. अशिक्षितपटुत्वम् 90
40. उपसर्ग 92
41. आम्हा घरी आहे शब्दांचेच धन 94
42. श ष स ह 96
43. एका श्वासाचं अंतर 98
44. दुर्दशादर्शन 100
45. मराठीः लेखकांचं आणि संपादकांचं 102
46. दूरदेशीचं प्रौढ लेकरू 104
47. जाबसाल 106
48. शेजाऱ्यावर प्रेम करा - भाषेतून ! 108
49. ‘अहो, अगं आणि अरे’ 110
50. शुभ बोल 112
51. म्ह म्ह म्हणीतला 114
52. विष्णुपदी 116

निवेदन

....

भाषविषयक विविध प्रश्नांच्या संदर्भात जिज्ञासू वाचकांची जाण अनेक अंगांनी वाढविणे हे राज्य मराठी विकास संस्थेला आपले एक महत्वाचे कार्य वाटते. ते उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून आम्ही पुढील पाच पुस्तके या वर्षी प्रकाशित करीत आहोत. डॉ. मिलिंद मालशे आणि डॉ. गीता भागवत यांच्या आम्ही यापूर्वी पुरस्कृत वा प्रकाशित केलेल्या दोन पुस्तकांना ('आधुनिक भाषा विज्ञान' आणि 'प्रशासनिक मराठी भाषेचा विकास') वाचकांनी उत्तम रीतीने दाद दिली आहे. जाणकारांनी परितोषिके देऊन त्यांचा सन्मान केलेला आहे.

नव्याने प्रकाशित होत असलेल्या पाच पुस्तकांपैकी कालदृष्ट्या पहिले पुस्तक आहे कै. प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांचे 'शिक्षण, शिक्षक व सध्याचा अभ्यासक्रम'. मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेत त्यांनी या विषयावर दिलेली व्याख्याने पुस्तकरूपाने १९०६ साली प्रकाशित झालेली होती. परंतु दुर्दैवाने आज त्या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध नाहीत. अभ्यासक्रमात मराठी कशासाठी शिकवायचे या प्रश्नाचे उत्तर जसे या व्याख्यानांत पटवर्धनानी दिले आहे तसेच सर्व शिक्षणक्रमात, सर्व स्तरांवर मराठीचे स्थान आणि स्वरूप कसे असावे याचे विवरण केले आहे. हे करताना त्यावेळी त्यांच्या डोळ्यासमोर जो जर्मनीतील भाषाशिक्षणाचा आदर्श होता त्याच्याशी त्यांनी आपल्याकडील भाषाशिक्षणाच्या वस्तुस्थितीची तुलना केलेली आहे. शालेय शिक्षणाशी विविध अंगांनी संबंधित असलेले आणि स्वतंत्रपणे लिहिले गेलेले अर्वाचिन मराठी वाङ्मयामधील हे पहिले मराठी पुस्तक आहे. आम्ही हे पुस्तक प्रकाशित करताना त्याला अद्याप वर्तमानकाळातील शैक्षणिक परिस्थितीच्या संदर्भातही अर्थपूर्णता कशी आहे हे लक्षात यावे या दृष्टीने अभ्यासपूर्ण प्रस्तावना व तळटिपांची जोड दिली आहे. आमच्या विनंतीवरून प्रा. रमेश पानसे यांनी हे अत्यावश्यक काम केले. गेली पंधरा वर्षे एक अभ्यासक-कार्यकर्ता या नात्याने प्रा. पानसे यांचा पूर्वप्राथमिक. प्राथमिक आणि ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाशी विशेष जवळून संबंध आलेला आहे.

प्रा. वा. ब. पटवर्धन यांचा परिचय त्यांनी प्रकट केलेल्या विचारांवरून वाचकांना होईलच. पण आवर्जून आणखी दोन चार गोष्टींचा उल्लेख इथे करावयास हवा. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात पटवर्धन हे इंग्रजीचे अत्यंत नाणावलेले असे प्राध्यापक होते. शेक्सपीअरची नाटके आणि शेली, कीट्स्, बायरन आदी रोमँटिक कवींची कविता उत्तम रीतीने शिकविण्याबद्दल त्यांची महाविद्यालयात विशेष ख्याती होती. त्याचबरोबर मराठीतील प्राचीन संतकवितेपासून त्यांना समकालीन असणाऱ्या रविकिरण मंडळाच्या कवितेपर्यंतच्या मराठी कवितेचे ते एक चोखंदळ समीक्षकही होते. न्या. रानडे, सुधारकाग्रणी गो. ग. आगरकर आदी मान्यवर शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या मान्यवर लोकनेत्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा पुरस्कार करताना जो विचार केला होता, त्या विचारसरणीला धरून काम करणारे पटवर्धन हे एक कार्यकर्तेही होते. त्यांच्या विषयीची ही पूर्वमाहिती सांगण्याचा उद्देश मराठीविषयक त्यांनी केलेल्या प्रतिपादनाचे नेमके वजन वाचकांच्या लक्षात यावे हा आहे.

दुसरे प्रकाशित होणारे पुस्तक 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' हे कै. श्री. के. क्षीरसागर यांच्या भाषाविषयक लेखांचे श्रीमती शकुंतला क्षीरसागर यांनी केलेले संकलन आहे.विविध भाषांतील दर्जेदार साहित्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या क्षीरसागरांचे हे लेखन वेळोवेळी अनेक नियतकालिकांतून आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले होते. आणि त्या त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, कविवर्य माधवराव पटवर्धन आदी भाषाशुद्धीच्या पुरस्कर्त्यांशी त्यांनी घेतलेल्या वैचारिक झुंजीसाठी गाजलेलेही होते. हे लेख वाचताना

अनुक्रमणिका

आमच्या असे लक्षात आले की भाषशुध्दी, परिभाषेची घडण, मराठीचे लेखन आणि उच्चारण आदी आजही चर्चेत असणाऱ्या प्रश्नांवर प्रा. क्षीरसागर यांनी त्यावेळी जे विचार व्यक्त केले आहेत ते पुष्कळ अंशांनी स्वीकारले तरी गेले आहेत किंवा अजून स्वीकारावेत इतके उपयुक्त तरी आहेत. विवेचनात त्यांनी घेतलेल्या काही उदाहरणांशी आपला मतभेदही होईल. तथापि, आपल्या भाषेच्या संदर्भात सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे जे प्रश्न घुटमळत आहेत त्यांचाच क्षीरसागरांनी 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' या पुस्तकामध्ये परामर्श घेतलेला आहे. त्यांचे हे पुस्तक आजच्या लेखक-वाचकांच्या मराठी बाबतच्या संभ्रमित झालेल्या मानसिकतेला निश्चित दृष्टीकोनाची आणि आधाराची बैठक पुरवल्याखेरीज राहणार नाही. कै. क्षीरसागरांनी हाताळलेल्या भाषाविषयक प्रश्नांच्या संदर्भात, नंतरच्या काळात प्रत्यक्ष कार्यनुभवच घेतलेल्या श्रीमती सत्त्वशीला सामंत निवृत्त उपसंचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य) यांची प्रस्तावना आम्ही या पुस्तकाला घेतलेली आहे. तीही विषयाच्या संदर्भात आजची भाषिक स्थिती सांगत आवश्यक तेवढ्या माहितीची पुरेशी भर घालणारी आहे. (पूर्वप्रसिद्धी म. सा. प., जुलै-सप्टेंबर १९९५) मराठी लेखन आणि व्याकरण यांबाबत सत्त्वशीलाबाईंची स्वतःची एक विशिष्ट भूमिका आहे. तिचा आदर राखण्यासाठी प्रस्तावनेतील काही तत्सम शब्दांचे लेखन त्यांच्या मूळ लेखनानुसार आम्ही ठेवलेले आहे. एवढे कृपया वाचकांनी समजून घ्यावे.

तिसरे पुस्तक आहे डॉ. दिनेश द. माहुलकर या बडोदा येथे वास्तव्याला असणाऱ्या आणि बऱ्याच मराठी मंडळींना अपरिचित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भाषावैज्ञानिकाचे. 'वृद्धिः - भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन'. 'वृद्धिः' हा पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथातील पहिल्या सूत्रातील पहिला शब्द आहे. तो शीर्षकात योजनाबाबत डॉ. माहुलकर विशेष आग्रही होते. त्यांचे म्हणणे असे आहे की, विविध प्रकारची कुंपणे तोडून पलीकडे हा पाणिनीचा मंत्रच भाषाविकासनाच्या संदर्भात आज विशेष अर्थपूर्ण ठरतो आहे. पाणिनीचा हा विचार जितका जुना तितकाच नवाही आहे. भाषा विषयावरील डॉ. माहुलकरांचे आजवरचे सर्व लेखन इंग्रजीतून झालेले आहे. हे त्यांचे पहिले मराठी पुस्तक प्रकाशनासाठी आम्हाला देऊन त्यांनी राज्य मराठी विकास संस्थेचा बहुमान केला आहे, अशी आमची कृतज्ञतेची भावना आहे. डॉ. माहुलकर यांच्या विचारांचा व कार्याचा परिचय राज्य मराठी विकास संस्थेच्या संस्थापकांपैकीच एक असणाऱ्या ज्येष्ठ भाषावैज्ञानिकांनी डॉ.अशोक केळकर यांनी प्रस्तावनेत समर्थपणे करून दिला आहे. त्याची पुनरावृत्ती मी करीत नाही. पण जगभर झालेली भाषाविषयक विचारांची गेल्या काही शतकांतील वाटचाल या पुस्तकात डॉ. माहुलकर यांनी ज्या सुबोध बोली मराठीत उलगडून दाखविली आहे तिने वाचक स्तिमित झाल्याखेरीज राहणार नाहीत एवढे मात्र इथे आवर्जून सांगायला हवे. डॉ. माहुलकर यांनी पाणिनीचा 'वृद्धिः' हा मंत्र उच्चारीत काढलेला वरील निष्कर्ष तर आपली मान उंचावणारा आहे.

या पाच पुस्तकांच्या संचातील चौथे आणि पाचवे पुस्तक आहे अनुक्रमे श्रीम सुमन बेलवलकर आणि अविनाश बिनीवाले यांचे. या दोघांनी 'लोकसत्ता' या मान्यवर दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीत १९९४ ते १९९९ या काळात जी भाषाविषयक सदरे लिहिली त्यांचे हे संकलन आहे. 'बेलभाषा' आणि 'भाषा - आपली सर्वांचीच' ही दोन्ही पुस्तके भाषाविषयक दोन वेगळ्या विचारक्षेत्रांचा विनोदात्म शैलीत परामर्श घेतात. सुमन बेलवलकर यांना परभाषिकांना मराठी शिकवताना जे स्वभाषेचे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन झाले ते त्यांनी मोठ्या खेळकरपणाने छोट्या छोट्या लेखातून टिपले आहे. अविनाश बिनीवाले यांनी मराठी भाषिकाला वर्णमाला, लिपी, उच्चार, इत्यादींच्या संदर्भात जगातल्या विविध भाषांच्या व्यापक विश्वातून गंमतीजमती सांगत फिरवून आणले आहे. या दोघांनीही स्वतःच्या पुस्तकाला ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्याही त्यांच्या मूळ विवेचनात अधिक भर घालणाऱ्या आहेत.

अनुक्रमणिका

अविनाश बिनीवाले यांनी वरील सर्व पुस्तकांची जुळवाजुळव करताना वेळोवेळी विचार विनिमय करण्यामध्ये, पुस्तकांच्या मुद्रणाच्या संदर्भात विशेष सहकार्य केले आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानते. त्याचप्रमाणे या प्रकाशन प्रकल्पात सहकार्य देणाऱ्या लेखक, प्रस्तावनाकार यांचेही आम्ही ऋणी आहोत. तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयातील माझे सहकारी अनिता जोशी, कविता महाजन, गिरीश पतके, स्मिता जोशी, नेहा मोहोड, सरोज भंडारी, ज्योती जोशी यांनीही कामाचा आपापला वाटा आनंदाने आणि हौसेने उचलला आहे. त्यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळेच दिनांक 27 फेब्रुवारी रोजी, कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी ही पुस्तके प्रकाशित होत आहेत. गेली काही वर्षे महाराष्ट्रात कुसुमाग्रजांचा वाढदिवस हा मराठी दिवस म्हणून साजरा होत आला आहे. यंदा कविवर्य आपल्यामध्ये नाहीत. राज्य मराठी विकास संस्थेला त्यांचे सहकार्य अनेक प्रकारे लाभले होते. कृतज्ञतापूर्वक त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून ही भाषाविकासाची वेगवेगळे पैलू दिग्दर्शित करणारी पुस्तके आम्ही त्यांच्या जन्मदिनी प्रकाशित करीत आहोत.

सरोजिनी वैद्य
संचालक
राज्य मराठी विकास संस्था
मुंबई.

दिनांक २७ फेब्रुवारी, २०००.

अनुक्रमणिका

मनोगत

....

१९९६ च्या फेब्रुवारी-मार्चमधली गोष्ट आहे. बालभारतीच्या शालेय शब्दकोशाच्या निमित्तानं प्रथम ओळख झालेले त्या प्रकल्पाचे प्रमुख प्रा. डॉ. वि. गो. कुलकर्णी मला म्हणाले, 'लोकसत्तात भाषाविषयक सदर लिहिण्यासाठी टिकेकरांनी विचारणा केली. मी तुझं नाव सुचवलं आहे. तू हे लिही ! त्यापूर्वी टिकेकरांना भेट.' विगोंमधल्या भाषाप्रेमी वैज्ञानिकाला जर माझ्यात काही मूलद्रव्यं आहेत असा विश्वास असेल तर तो स्वतःलाच का नसावा? शिवाय एखादं काम आपल्याला शोधत समोर आल्यास 'कुंकवाला नाही म्हणू नये' ही मनाची भूमिका. टिकेकरांना मी भेटले. ते किती निष्णात संपादक आहेत याचा प्रत्यय मला त्याचवेळी आला. समोरच्या व्यक्तीला बरोबर जोखून त्यांनी साडेचारशे शब्दांची मर्यादा घातली. पानांची पुरती अडीसरीही हातपाय पसरायला नसताना लिहिणं जरा अवघड होतं, कारण जितक्या म्हणून मराठीच्या परीक्षा दिल्या किंवा इतर लेखन केलं त्यावेळी तावांच्या मापानं लिहिलं होतं. दुसरा पेच होता वाचकांचा. 'सर्वाधिक खपा' च्या वर्तमानपत्राचा वाचक पानवाल्यांपर्यंत पसरलेला असतो. त्यांनीही वाचावं असं पूर्वी कधी लिहिलं नव्हतं. मी टिकेकरांना सुचवलं, 'मी फारच थोडं लिहिलेलं असल्यामुळे माझ्या लिहिण्याचा तोंडावळा आपल्याला माहीत नाही. (त्यांनी त्यापूर्वी 'भाषा घरची आणि दारची' एवढा एकच लेख वाचला होता.) मलाही हे काम नवीन आहे. तेव्हा मी नमुण्यासाठी दोन-तीन लेख देते.ते पाहून आपल्याला वाटलं की, सदर सुरू करायला हरकत नाही; तर आपण पुढे जाऊ; नाही तर इथेच थांबू.' त्याप्रमाणे आधीचे काही लेख आणि सदरासाठी नमुन्याचे लेख मी पाठवले. फोटो-पत्रिका पाठवणाऱ्या मुलीच्या आई-बापांची माझी मनःस्थिती होती. मे महिन्यात कार्यालयीन कामासाठी म्हैसूरला असताना अचानक माझ्या हातात फॅक्स आला. तुमचा पुढचा लेख अमुक तारखेला पाठवा. आधीचे दोन लेख छापल्याचा मला तोवर पत्ताही नव्हता. पुढची तारीख तोंडावर होती. यदाकदाचित यापुढे थोरपण आलेच तर चरित्रात घालण्याजोगा प्रसंग असावा म्हणून मी तो लेख चक्क आगगाडीच्या प्रवासात लिहिला. अशी ही गाडी सुरु झाली.

सदराला काय नाव द्यावं याचा विचार पुढे आला. तोपर्यंत पहिल्या लेखाचं शीर्षक 'निदान एक कारण' हेच नाव होतं. ती टोपी सर्वांना बसण्याजोगी नव्हती. मला या सदरातून बोलायचं होतं, म्हणून आधीचं सुमधुर हे विशेषण काढून 'भाषिणी' सारखं काहीतरी मनात होतं. सखी डॉ. माधवी कोल्हटकरनं 'बेलभाषा' सुचवलं. ते मला आवडलं. आडनावामुळे बेली हेच माझं नाव अगदी डॉ. कालेलकरांपर्यंत रूढ झालेलं. ती थोडी नावाची हौस भागली. पण खरा भाव थोडा वेगळा होता. भाषेला शिवरूप मानून मी हा बेल अर्पण केला. नियमित भटकणाऱ्या बाईबद्दल बोलताना पूर्वी म्हटलं जायचं, 'ती होय, गेली बेल घालायला!' त्या बेल घालण्यातला नियमितपणा सदराच्या आवर्तात बसणारा होता. कोणी इंग्रजी बेल पकडली तरी 'हाकारोनि सांगे तुला' ही भूमिका असल्यामुळे अर्थ बिघडत नव्हता. अंती तेच नाव पक्कं झालं. सदर लिहायला एवढा भक्कम होकार मी का भरला त्याची पार्श्वभूमी थोडी सांगायला हवी. आपल्या भाषेबद्दल प्रेम, अभिमान, साधारणपणे शाळेपासून अनेकांच्या मनात रुजतो. मला थोडी वेगळी संधी एम्. ए. चं पहिलं वर्ष झाल्यावर मिळाली. भारतीय साहित्याविषयीचं पहिलं उन्हाळी शिबिर डॉ. रं. श्री. मुगळी यांनी मंगळून इथे १९६९ साली भरवलं होतं. त्या वेळी डॉ. गोकाक हे विद्यापीठाचे कुलगुरू होते. संपूर्ण भारतातून आलेले भाषांचे पदव्युत्तर अभ्यासक महिनाभरासाठी तिथे एकत्र राहिले होते. विद्वानांच्या व्याख्यानांपेक्षाही या काळात आम्हा सर्व भाषिकांच्या एकत्र सहवासातून माझी भाषेविषयीची जाणीव रुंदावली - विस्तारली - समृद्ध झाली. माणसाच्या जीवनात स्वभाषेचं स्थान काय आहे याचा तिथे झळझळीत प्रत्यय आला. भारतीय भाषा आणि साहित्य एकमेकांना किती जवळचं, किती आपलं; तरीही

किती निराळं - म्हणून कुतूहल वाढवणारं आहे, याचा अनुभव तिथे आला. इथे मिळालेले स्नेही डॉ. गो. मा. पवार, निर्झरी, राघवेंद्र मानवी आजही जिवाभावाचे आहे. हा व्यक्तिगत लाभ. पण भाषेकडे, आपल्या देशाच्या साहित्याकडे पाहण्याची दृष्टी मिळणं हा आत्मिक लाभ होता.

मराठी घेऊन एम्. ए. झाल्यावर बनणाऱ्या सर्व प्राध्यापकांना जे काम करावं लागतं त्यापेक्षा वेगळं काम मला सुमारे वीसेक वर्षांपूर्वी मिळालं. ते म्हणजे अमराठी लोकांना मराठी भाषा शिकवण्याचं. तेही 'भारतीय भाषा संस्थान' या भारतीय भाषांच्या संकुलात. 'आपली भाषा कशी आहे हे मला त्यापूर्वी समजलेलंच नव्हतं.' असं म्हणावं लागेल. अजूनही या भाषेविषयीचं कुतूहल संपलेलं नाही. आपण नकळत निःश्वासावाटे सोडलेल्या हवेचं वैज्ञानिक विश्लेषण करावं त्याप्रमाणे सवयीच्या भाषेचं विश्लेषण करून,तिचे नियम जाणून घेऊन, घटक पदार्थांचे विशेष दुसऱ्याला समजतील असे मांडणं असं या कामाचं स्वरूप असतं. त्यामुळेच खरी भाषा समजत गेली. स्वभाषा कोणीही दुसऱ्याच्या नियंत्रणाखाली बोलत नाही. तरीही प्रत्येकाच्या मुक्त आविष्कारातून प्रकटणारी ही भाषा किती अंतर्गत सुसंबद्ध व्यवस्था निर्माण करते हा साक्षात्कार थक्क करणारा होता. तिचे नियम आणि अपवाद दोन्ही तिच्याबद्दल सतत विचार करायला प्रवृत्त करत राहिले. देशातल्या आणि देशाबाहेरच्या प्रत्येक विद्यार्थ्याला पडणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांसाठी खुलासे करताना या पूर्णतः मानर्मित वस्तूचं मला जसं काही वेडच लागलं.

गेली चाळीस - पन्नास वर्षं माझ्या खात्यात पडलेल्या या भाषेच्या धनराशी मी वापरत आले. तीसेक वर्षं ही भाषा शिकत-शिकवत राहिले. या सर्वांमधून मला सदराचे विषय मिळाले. त्यात व्यक्त झालेल्या प्रत्येक विचाराची, मताची जवाबदारी पूर्णपणे माझीच आहे. संपादकांप्रमाणे 'या मतांना आम्ही जवाबदार नाही' असं मी म्हणणार नाही. तसंच 'यातील सर्व व्यक्ती-घटना काल्पनिक आहेत' असं प्रसारमाध्यमाचं ब्रीदही मला घ्यायचं नाही. लेखनातल्या सगळ्या व्यक्ती, घटना प्रत्यक्षातल्या, घडलेल्या, पाहिलेल्याच आहेत. लहानपणापासून घडलेल्या घटना-प्रसंगांचे अर्थ-अन्वय यांची केवळ या सदराच्या निमित्तानं मी देवाण-घेवाण केली आहे. स्वातंत्र्यात जन्मलेल्या वाढलेल्या माझ्या पिढीची ही भाषा आणि हा भाषाविचार आहे. अव्वल इंग्रजीत केवळ इंग्रजीतून शिक्षण झालेल्या आधीच्या पिढ्या आणि देशाच्या स्वातंत्र्यानं बळ धरल्यावर तरुणांना मिळणाऱ्या परदेशातल्या संधी या दोन टोकांमध्ये आमची पिढी आहे. पारतंत्र्यातंला भाषेचा, शिक्षणाच्या माध्यमाचा विचार आणि स्वातंत्र्यात त्याची बदललेली ध्येयं-धोरणं यांचा संक्रमणकाळ म्हणजे आमचा काळ. काळाचा हा विशिष्ट टप्पा ध्यानात घेऊन सदरातल्या आशयाकडे पाहिलं जावं.

आता पुस्तकरूपात साकार होणाऱ्या या लेखनाचे सदर म्हणून आलेले अनुभव उमेद वाढवणारे होते. सुरुवातीला फक्त साडे-चारशे शब्दांची मर्यादा भेडसावत असे. पण मग मी विषय त्याच बेतानं निवडले. शब्दसंख्या मोजकी बसवताना लक्षात आलं की, खरंच आपण एरव्ही किती अनावश्यक शब्द लिहीत असतो. बेतशीर लिहिण्याची सवय होणं हे भाषेच्या माणसाला किती उपकारक आहे याची जाणीव समव्यावसायिकांना होईल. सदर छोटेखानी असल्यामुळे रविवारच्या गर्दीतही अगदी बायकासुद्धा वाचत होत्या, हा दुसरा फायदा. नवसारीपासून बेळगावपर्यंतच्या वाचकांनी प्रत्यक्ष वा पत्रानं संवाद साधला बहुजनांमधली आपली ही नवी ओळख माझ्यापुरती सुखद होतीच; पण माझ्या आईला एक स्टेशन मास्तर, पिठाच्या गिरणीचा एक चालक यांनी सदराबद्दल भरभरून सांगितलं. ठेवलेली कात्रणं दाखवली. तिला हा आनंद देऊ शकले याचं कृतार्थ समाधान मोठं आहे. सदरलेखन पुस्तकरूपात यावं, भाषा शिकवणाऱ्यांपर्यंत पोचावं असा विचार बोलून दाखवणारे मराठीचे, संस्कृतचे अनुभवी अध्यापक होते. पण माझ्यासमोर फक्त मराठीचे शिक्षण, अभ्यासक एवढेच नाहीत. हा अभ्यासपूर्ण असा सिद्धान्त ग्रंथ नाही, हे केवळ बोलणं आहे.

अनुक्रमणिका

भाषेशी संबंध येणाऱ्या प्रत्येकाशी हे बोलणं आहे. थोडसं भाषेकडे वळून पहावं, तिच्याबद्दल कुतूहल वाटावं, तिच्या वापराबद्दल थोडी बूज असावी एवढाच माझा हेतू आहे. आजच्या जगात आणि युगात भाषा-स्वभाषा हीच आपली ओळख आहे ही जाणीव वाचणाऱ्यांच्या मनात ठळक झाली तर स्वभाषेच्या मजवर असलेल्या ऋणातून मी कणभर तरी मुक्त झाले असं मला वाटेल! स्वभाषाप्रेम, परभाषाद्वेष केल्याशिवाय सिद्ध होत नाही असं मी मानत नाही. किंबहुना भाषेवर प्रेम करणारा कोणीही दुसऱ्या कोणत्याही भाषेचा दुस्वास करणं शक्य नाही. भाषा, मग ती कोणतीही असो, आपलीशी करण्याची गोष्ट आहे हाच एक विचार माझ्या मनाच्या तळाशी आहे.

पितृतुल्य डॉ. वि. गो. कुलकर्णी आणि लोकसत्ताचे संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी मला लिहायला प्रवृत्त केलं. लोकसत्ताच्या कचेरीत सुभाष नाईक हे उमदे मित्र मला मिळाले. खूप जुन्या आप्तांशी, वर्गमित्रांशी, परिचितांशी संवाद साधण्याची संधी या सदरामुळे मला मिळाली. पण हे लेखन वाचणाऱ्यांच्या लक्षात येईल अशी एक स्पष्ट बाब आहे, ती म्हणजे यात फार थोडं माझं आहे. भाव आणि शब्द दोन्हींचंही दान इतरांचं आहे - कान आणि मन फक्त माझं आहे. देणाऱ्या त्या सर्वांविषयी मी कृतज्ञ आहे!
डॉ. सरोजिनी वैद्य आणि त्यांची राज्य मराठी विकास संस्था यांनी माझं हे पहिलं पुस्तक प्रकाशित केलं हा भावबंध माझ्या बाजूनं फार महत्त्वाचा आहे.

सुमन बेलवलकर.

अनुक्रमणिका

निदान एक कारण

....

पुण्यात ज्या संस्थेत मी काम करते तिथं परप्रांतातले शिक्षक मराठी, गुजराथी, सिंधी अशा प्रादेशिक भाषा शिकण्यासाठी येतात. या प्रशिक्षणानंतर परत जाऊन त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना ती भाषा शिकवावी अशी अपेक्षा असते. खास करून हिन्दी-भाषिक विद्यार्थ्यांनी इंग्रजीला जोडून तिसरी एखादी प्रादेशिक भाषा शिकावी अशी शिफारस फार पूर्वी कोठारी आयोगानं केली होती. परस्परांच्या भाषा शिकल्यानंतर ताणतणाव, दुरावा कमी होऊन राष्ट्रीय एकात्मता साधेल असा स्पृहणीय हेतू या योजनेमागं आहे.

स्वप्नांना आणि आदर्शांना व्यवहाराचे मातीचे पाय असतात. त्यामुळे अनेकदा प्रशिक्षणार्थी वेगवेगळ्या लौकिक कारणांनी आलेले दिसतात. उदाहरणार्थ ज्या आकड्यावर सही तेवढा पगार !

पहिल्या दिवशी आम्ही उत्साहानं विचारतो, 'तुम्ही मराठीचीच निवड का केलीत?'

'मुंबई-गोवा पहायला!' हे खरं कारण लपवून तेही शिवाजी, टिळक (त्यांच्या उच्चारात तिलक) ही नावं हमखास सांगतात! त्यातही असम राज्यातून आलेल्यांनी शालेय अभ्यासात 'सिंहगड विजय' (त्यांचा उच्चार हिंहगर बिजय) हे काव्य अभ्यासलेलं असतं. तानाजी - शेलारमामाचा तो गड प्रत्यक्ष पाहण्यासाठी ते पाच दिवसांचा रेल्वेचा प्रवास करून पुण्याला येतात. (मनात येतं की 'गड आला पण सिंह गेला' यावरचा सुंदर पोवाडा महाराष्ट्रातल्या शाळांमध्ये सर्वांना का बरं शिकवत नाहीत?) असो. तर ज्ञानेश्वर, शिवाजी आणि टिळक हे मुख्य आकर्षण-बिंदू असतात.

एका विद्यार्थ्याचा हा ध्रुव वेगळा होता. तो विद्यार्थी होता असमचाच, पहाडी लोकगीतं गाणारा. त्याच्या मते ज्या ज्या असामी नसलेल्या गायकांनी असमिया भाषेतली गीतं गायली आहेत त्यामध्ये एकट्या लता मंगेशकर उच्चारणाच्या दृष्टीनं पूर्णतः निर्दोष, अगदी मातृभाषेप्रमाणं सहज गातात. असमिया भाषा उच्चारामुळंच खरं तर अवघड वाटते, नाहीतर ती मराठीला खूप जवळची आहे. असमियामधल्या 'स' चा 'ख्व' जवळपास होणारा आपला उच्चार त्यांच्या मुळीच मनास येत नाही. स, श, ष, ह आणि च यांचे बरेच घोळ त्या उच्चारांमध्ये आहेत. लताबाईंचे उच्चार ऐकून मात्र ती असमी आसामी भारावून गेली आणि लताबाईंची मातृभाषा म्हणून मराठी शिकायला आली. स्वरांसाठी लताबाईंना हजारो सन्मान मिळालेले आहेत पण त्यांचा हा गौरव वेगळा आहे कारण स्वर देव देतो पण उच्चार माणसाला आत्मसात करावे लागतात.

दुसऱ्या एकानं आपलं प्रवासवर्णन अर्पण केलं होतं श्री. सुनीलराव गावस्कर यांना! हे नाव त्या ओरिया भाषिकानं लिहिलेलं, कारण मान देण्यासाठी राव लावणं जरूरीचं! त्यानं लिहिलं होतं, 'कटकला झालेल्या सामन्यात तुमचा खेळ पाहून मी मोहरून गेलो.' हा वाक्प्रचार त्यानं पुलंच्या 'सुंदर मी होणार' या नाटकामधून उचलला होता. विश्वचषक जिंकल्यानंतर पाकिस्तानी क्रिकेटवीर इम्राननं जेव्हा तो आशियात आला असं म्हटलं त्यावर सुनीलची प्रतिक्रिया होती, 'डोंबल तुझं!' हे डोंबल काय असावं हे जाणून घेण्यासाठी तो थेट मराठी वर्गात दाखल झाला.

'नाकाला मिरच्या झोंबणे' हा वाक्प्रचार खरा झाला आणि मग मराठी शिकायला नाव घातलं!' असं एका कानडी शिक्षकाच्या बाबतीत घडलं. लहान गावात ते हिन्दी शिकवत होते. तिथले बरेच लोक

अनुक्रमणिका

नोकरी-धंद्यासाठी महाराष्ट्रात स्थायिक झालेले असायचे, त्यामुळे त्यांची पत्रं मराठीत असायची, कोणाकडूनतरी लिहून घेतलेली म्हणून! हिन्दी शिक्षक देवनागरी वाचणारे म्हणून लोक त्यांच्याकडे कागद घेऊन यायचे. ‘मला हे समजत नाही’ असं त्यांनी सांगितलं तरी लोकांना पटायचं नाही. मास्तर असं का करतात यावर लोक तर्ककुतर्क करत. बायका त्याहीपुढे जाऊन मास्तरीण काकूंच्या पुढ्यात म्हणत, ‘मुळात या मास्तरला हिन्दीच येत नाही. तरी बरं बाहेरची पत्रं आली म्हणून समजलं तरी नाहीतर इतकी वर्षं पोरांना काय शिकवत होता देव जाणे!’

हे ऐकून मास्तरीण काकूंचा अगदी तिळपापड झाला. त्यांनी नवऱ्याला बजावलं, ‘ती पत्रं ज्या कुठल्या भाषेत असतात ती भाषा शिकून घ्या! मी माझं कसंही पाहीन. कुठेही गेलो तरी यातून सुटका नाही!’ मास्तरांनी भार्याज्ञा पाळली.

अमराठी माणसांनासुद्धा अशी एक ना दोन कारणं मराठी शिकण्यासाठी सापडतात.

या महाराष्ट्र देशात सर्वच्या सर्व मराठी माणसांना ‘मराठी शिकलंच पाहिजे’ यासाठी निदान एक तरी कारण सापडेल का?

एक शब्द बोलेन जरी -

....

या देशाची 'एकदा व अखंडता' हा सर्वच पुढाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. प्रत्यक्षात मात्र इथल्या पावला-पावलागणीक आढळणाऱ्या विविधतेमुळं सतत ठेचकाळायला होतं. साधा कपभर चहा मागायचा झाला तरी मराठी माणसाला उत्तरेकडे गेल्यावर स्त्रीलिंगी 'चाय' ची सवय करावी लागते. आसामात तर उच्चारण 'सा' त्यामुळे 'सहा चहा' हे वेटरपर्यंत पोचवणं महा कर्मकठीण. देवानं आपल्याला दहा बोटं दिलीत म्हणून बरं!

आपण म्हणतो खरं की अनेक भारतीय भाषा संस्कृतमधूल उगम पावल्या. द्राविडी भाषांमध्येही संस्कृत शब्दांचं प्रमाण भरपूर आहे. पण मग एका संस्कृत शब्दाचा तोच अर्थ टिकवायला आपलं सर्वांचं काय जात होतं? एकानं हस्तलिखित म्हणायचं तर दुसऱ्यानं पूर्ण वेगळं 'पाण्डुलिपि'! एकानं विद्यार्थी म्हणायचं तर दुसऱ्यानं छात्र. हिन्दीवाल्यांनी शुद्ध संस्कृतप्रमाणं 'यातायात' हा जाणं-येणं या अर्थाचा शब्द टिकवून ठेवला. आपण तो भलत्याच यातायातीसाठी वापरतो. कहर म्हणजे त्या अर्थाचा शब्द दळवळण. वळणं निदान जागोजागी धोक्याची बनून येतात पण दळणाचा काय संबंध?

महाराष्ट्राबाहेर प्रवासाला गेलं की असे अनुभव हमखास येतात. उत्तरेत रेल्वे प्रतीक्षालयावर 'समागम कमरा' अशी पाटी वाचली तेव्हा हे वाचताना आपल्याला कोणी पाहिलं तर नाही ना याची मी खात्री करून घेतली! सर्वात गरज पडते ती चौकशीच्या खिडकीची. पूर्वेला त्यासाठी 'अनुसन्धान' शब्द आहे. आपण संधान हे नेहमी बांधतो, कटकारस्थानासाठी किंवा प्रेम जुळवताना. मग अर्थ कळावा कसा? खानपानगृह हे रोखठोक नाव कसं तिथून येणाऱ्या वासाशी इमान राखतं. आपल्या एस.टी. स्टँडवर मात्र कायम 'उपहारगृह' आणि 'रसवंतीगृह' असतं. 'उपाहार' न लिहिता भेटवस्तू देण्याचं ठिकाण या अर्थाचा 'उपहार' हाच शब्द शंभरातल्या एकशेपाच जागी दिसतो! सरवंतीगृहाबद्दल काय बोलणार?

यासाठी एक करता येईल, प्रत्येक रेल्वे फलाटावर पिवळ्या-काळ्या पाट्यांवरची अक्षरं अगदी एकाच वळणाची असतात तसे निदान गरजेचे वाटणारे शब्दतरी सगळीकडे सारखेच ठेवायचे. याचा अर्थ भाषिक अस्मिता, सौंदर्य, साहित्य यांतली नैसर्गिक विविधता पुसून टाका असं नाही, पण वाहतुकीच्या खुणा जशा सर्वत्र सारख्या तशा बसच्या पाट्या, हॉटेलांची नावं या वर्गातले सार्वजनिक शब्दतरी देशभर सारखे असायला काय हरकत आहे? संचालक की निदेशक? एक काय ते ठरवा! प्रेक्षक की दर्शक याचा काय तो तुकडा पाडा! सरकारी हिन्दीत निर्वाचन, साधं चुनाव, संस्कृतमध्ये छन्दाकलन, गुजरातीत चुटणी आणि मराठीत निवडणूक. इतर भाषांमध्ये आणखी काही. आता लोक बोलतायत कशावर हे तरी समजावं कसं?

वृत्तपत्राला 'समाचारपत्र' म्हणताना सकाळी-सकाळी मनात पाल चुकचुकणारच! 'खरपूस समाचार घेणे' किंवा 'समाचाराला जावे लागणे' याच सदरात मोडणारा मजकूर त्यात असतो हे खरं. उलट एक शब्द असण्याचा फायदा 'पापड' वरुनच कळेल. बेधडक मागावा, अर्थ जराही वाकडा होणार नाही.

या पाठोपाठ येणारा धाडसी विचार म्हणजे एका लिपीचा. पृथ्वीचा नकाशा एकाच शुभ्र रंगात रंगवलेला असावा, असं कुसुमाग्रजांना वाटतं कारण 'शुभ्रतेत आहे साऱ्या रंगांचे मीलन'. या देशात रस्त्यावरच्या पाट्या जरी एकाच लिपीत लिहिल्या तरी केवढी सोय होईल! आंध्र प्रदेशात समोरून गेलेल्या

चार बस मला जायचं होतं त्याच ठिकाणच्या होत्या पण मीच निरक्षर! सिनेमावाले कसे हुषारीनं तमिळ, तेलगु सिनेमाची पाटी इंग्रजीतसुद्धा लिहितात ! आता आकडेतरी एकाच प्रकारचे स्वीकारले गेले आहेत.

मुंबईच्या फलाटावर एका उच्चभ्रू जोडप्यानं आठ क्रमांकाचा डबा नक्की कुठं येईल हे मला पुनः पुन्हा विचारल्याचं आठवतं. तिथली इंग्रजी पाटी गायब झाल्यानं त्यांना खात्री वाटेना!

जे खरोखरच माझ्यासारखे संकटग्रस्त असतील ते माझ्या प्रस्तावाला रुकार भरतील. थोडा व्यावहारिक विचार केला तर भाषावैज्ञानिकही आपली हरकत नाही म्हणतील. पण कोणती एक लिपी असं विचारलं तर बंगाली म्हणतील बांगला, तमिळी म्हणतील तमिळ, त्याचं काय?

अनुक्रमणिका

असावे घरटे अपुले छान

....

खूप जणांनी खूप वेळा ऐकलेलं आहे हे गाणं! अनेकांच्या आवडीचंही आहे ते. विशेषतः 'पहायला' आलेल्यांसमोर गाणं म्हणून दाखवायचा जेव्हा जमाना होता, तेव्हा कितीतरी उपवर तरुणींनी खाली मान घालून, कापऱ्या आवाजात ते गाऊन पसंती पदरात पाडून घेतली होती.

अलीकडे माझं लक्ष त्याच्याकडे गेलं ते त्यातल्या फारच कल्पित आशयामुळं. 'संगमरवरी ती पुष्करिणी त्यात असावे गुलाबपाणी, पाण्यामधुनी कारंजाची उडावी सुरेख सुंदर तान…'

यात भाबड्या कल्पनांपलीकडे काय आहे? संसार करण्यासाठी उभारलेलं घर हेही एक काव्यच असतं. मनुष्यप्राण्याचा मानव झाला तेव्हापासून प्रत्येकानं आपल्या नजरेसमोर ठेवलेलं! पण तो पोकळ मनोरथांचा डोलारा नाही तर दगडमातीत साकार होणारं ते पूर्त स्वप्न. गुलाबपाण्याच्या संगमरवरी पुष्करिणीनं ज्यांचे संसार होणार असतील ते होवोत बापडे! हे ठळकपणे मनात येण्यामागं आणखी एक कारण आहे. असमिया भाषेतल्या दोन ओळी मला समजल्या.

'भरालीत धान । गोहालीत गोरू
पुखुरीत मास । बारीत तामूलपान.'

'कोठीत भात, गोठ्यात गाई-गुरं, तळ्यात मासे आणि परसात विड्याच्या पानाची नागवेल.' असा त्यांचा शब्दशः अर्थ आहे. एका गृहस्थाला सुखी-संतुष्ट होण्यासाठी काय हवं त्याचं नेमकं, अतिसुंदर असं हे चित्र आहे.

शेत हा असममध्ये घराचाच भाग असतो. त्याचा इथं अप्रत्यक्ष उल्लेख आहे. कोठीत भात आलं ते शेतातून, गाईगुरं शेतीसाठी. घराजवळच प्रत्येकचाची पुखुरी म्हणजे छोटं तळं. त्यात रहू, इलिसासारखे चवदार मासे. ते गोड्या पाण्यात पोसले जातात. आत्माराम संतुष्ट होईल असा स्वादिष्ट स्वैंपाक करणारी गृहिणी (असमियात 'घोईनी') पण इथं शेताप्रमाणेच गृहीत धरलेली आहे. कवनातल्या पहिल्या तीन गोष्टींची तीच स्वामिनी आणि चौथीची उपभोक्ती! परसात भाजीपाला तिच्याच हातचा. मासे तीच निवडते. माश्याच्या जेवणाबरोबर आवश्यक असं दही तिच्याच 'गोरू' चं. तिकडे दही विरजण न घालता बनवतात. त्यामुळे 'विरजण पडणे' हा वाक्प्रचार तिकडे नाही. अशा स्वामिनीनं बनवलेल्या स्वैंपाकाची सांगता 'तामूलपाना'नं होणार. तीही परसातून खुडून आणलेल्या ताज्या पानांच्या! कोणाही गृहस्थाला हेवा वाटावा असं हे चित्र आहे.

याच संदर्भात पण वेगळ्या बाजूची एक मराठी ओळ आठवली. 'रानात ओघळ, दारात बाभळ, घरात शिंदळ नसावी.' हेही सांसारिकांच्या बाबतीत सांगितलेलं आहे. शेतात ओघळ असेल तर धूप होऊन जमिनीची नासाडी होणार. ज्याच्या दारात बाभळीचे काटे त्याच्याकडे कोण येणार? आणि 'अमित्रस्य कुतः सुखम्?' अतिथीच नाही तर गृहस्थ कसला? सर्वात महत्त्वाची बायको. तीच शिंदळ म्हणजे व्यभिचारी असेल तर संसारच नासला! ज्ञानेश्वरांनीही 'भार्या रूपगुणवती आणि पतिव्रता' असा चढता सर्वश्रेष्ठ क्रम दिला आहे. तात्पर्य, गृहस्थाचं आयुष्य उधळून टाकणारे तीन घटक या चरणात कवीनं एकत्र बांधले आहेत. फरक एवढाच की ते नकारात्मक आहेत. ही कटावाची रचना उपदेशासाठी होती.

अनुक्रमणिका

‘भरालीत धान’ या असमिया चरणांमध्ये मात्र कसं शेतकऱ्याला समाधान आहे. चित्रकाराला त्याचं सुंदर चित्र काढावसं वाटेल असं आवाहन आहे. एकूणच त्याचा परिणाम घरच्या सुग्रास भोजनानंतर खाल्लेल्या विड्याचा, रंगतदार समाधानाचा आहे.

मनात विचार येतो की, अस्सल भारतीय जीवन चित्रित करणाऱ्या वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमधल्या अशा सुंदर कवनांचा संग्रह केला तर तो किती अमोल ठेवा होईल! कन्नड भाषेत एक म्हण आहे. सावकार शेतकऱ्याला कर्ज देताना म्हणतो, ‘तू चिखलानं भरलेले पाय तारण म्हणून घेऊन ये, तरच मी तुला कर्ज देईन!’ पाऊस चांगला झाला असेल तर शेतकऱ्याला कर्ज द्यायला मुळीच हरकत नाही, असा त्याचा अर्थ. शब्दांनाही असं चिखलाचं तारण’ असलं पाहिजे. त्याच्यापुढं संगमरवराची काय मातब्बरी?

अनुक्रमणिका

शपथ वाहा

....

केंद्रीय मंत्रिमंडळाचे महिन्याच्या आत पाठोपाठ दोनदा शपथविधी झाले. अटलजींच्या शपथग्रहणाच्या वेळी एकूणच नूर वेगळा होता. स्वतः अटलजींची मातृभाषा हिन्दी. त्यातून ते कवी. त्यांनी आपली शपथ हिन्दीत खणखणीतपणे घेतली. हे अगदी स्वाभाविक झालं. भाषेला तरी धर्म न चिकटविण्याची उदारता दाखवली तर कोणीही याचं स्वागत करील.

प्रश्न आला तो दुसऱ्या सर्वसमावेशक मंत्रिमंडळाच्या वेळी! पंतप्रधान देवेगौडा कन्नड भाषी. त्यांची प्रतिमा 'मातीचा पुत्र' अशी लोकांपुढे मांडली गेलेली. यापूर्वी नरसिंह राव हे दक्षिणेचे पहिले पंतप्रधान झाले आणि उत्तरेची विशेषतः उत्तर प्रदेशाची मक्तेदारी संपली. राव बहुभाषापंडित आणि नेहरू-गांधी कुटुंबीयांशी दीर्घ परिचित. त्यामुळे ते नेहरूशैलीतच मोडत. पण देवेगौडांचं तसं नाही. रंगरूप, चेहरामोहरा इतकंच काय पण पोशाखातही त्यांची कन्नडदेशी प्रतिमा उठून दिसते. त्यामुळंच त्यांनी जेव्हा इंग्रजीत शपथ घेतली तेव्हा जरा खटकलं. तीन महिन्यांच्या आत हिन्दी शिकण्याची स्वागतार्ह घोषणा त्यांनी केली आहे. पण हिन्दी येत नव्हतं तर त्यांनी कन्नडमध्ये शपथ घ्यायला हवी होती, असं वाटतं.

यंदा आपण पन्नासावा स्वातंत्र्यदिन साजरा करू. पण या देशात केंद्रीय मंत्रिमंडळाचे बहुतेक सर्व सदस्य अजूनही इंग्रजीत शपथ घेतात ही गोष्ट भूषणावह नाही. हिन्दीला आपण आपली राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारलं आहे. कोणी एखाद्या कारणासाठी आव्हान देत असलं तरी ती आज व्यापक संपर्काची भाषा आहे हे सत्यच आहे. घटनेनुसार अन्य प्रादेशिक भाषांचं स्थानही मुळीच दुय्यम नाही. या देशात सोळा राष्ट्रभाषा आहेत हे हिन्दी भाषिकांनीही लक्षात ठेवायला हवं. असं असता संस्कृतमध्ये शपध घेतलेली चालते तर प्रादेशिक भाषेत का नको? हिन्दीला पर्याय हवा असेल तर तो प्रादेशिक भाषेचाच हवा, इंग्रजीचा नको.

इंग्रजीचं जागतिक स्थान मान्य करूनही कोणत्या कारणांसाठी आपल्याला इंग्रजी हवी याचं भान आपण ठेवलं पाहिजे. इतर अनेक देशांनी इंग्रजीचा भरपूर उपयोग करूनही देशांतर्गत वापर मात्र आपल्या भाषेचाच ठेवला. माझी रशियन मैत्रिण इरिना या संदर्भात टीका करते. तिच्या देशाचे सर्व नेते सगळीकडे फक्त रशियनच बोलतात; त्यांना इंग्रजी येत नाही म्हणून नव्हे. ते दुभाषे ठेवतात किंवा घ्यायला भाग पाडतात. आपले सर्व नेते मात्र देशातल्या गरीब जनतेशीही इंग्रजीत बोलतात, याचा तिला मनस्वी राग येतो.

असं सांगतात की पंडित नेहरूंच्या घरी जेवणाच्या टेबलावर फक्त हिन्दीच बोललं पाहिजे असा दंडक होता. त्यामुळे तर सोनिया गांधींना हिन्दी शिकून घ्यावं लागलं. प्रश्न असा आहे की फक्त जेवणाच्या टेबलापुरतंच का? की पुडी, दाल, चटनीशी संबंध येतो म्हणून असू दे झालं हिन्दी!

इंग्रजीचा वापर जिथं हलवता येणार नाही तिथली गोष्ट वेगळी. अणुउर्जचा, अंतरिक्षाचा सगळा विचार हिन्दीत किंवा मराठीत व्हावा असं कोणीही म्हणणार नाही. पण मंत्र्यांनी घ्यायची शपथ त्या वर्गात मोडत नाही. तिच्यात असा कोणताही मजकूर किंवा शब्दप्रयोग नाही की जो फक्त इंग्रजीतच व्यक्त होऊ शकेल. आपापल्या श्रद्धेनुसार ईश्वराला साक्षी मानून किंवा ईश्वराचं अस्तित्व नाकारून पण पूर्ण श्रद्धेनं शपथ घेतली जाते. श्रद्धेचं हे स्वातंत्र्य जर ते निवडतात तर मग मातृभाषेचा किंवा राष्ट्रभाषेचा पर्याय निवडावा असं त्यांना का वाटत नाही?

अनुक्रमणिका

एका भाषेतला मजकूर निमिषात दुसऱ्या भाषेत सांगणारे संगणक आता उपलब्ध आहेत. भाषांतर करणारा मेंदू (न्यूरो लँग्वेज ट्रान्सलेटर) यंत्रात बसवण्याच्या प्रयत्नात आज वैज्ञानिक आहेत. तंत्रज्ञानानं भाषांमधलं अंतर पुसलं आहे. पुसलं नाही ते स्वतंत्र भारतीयांच्या मनावरचं इंग्रजीचं वर्चस्व.

अनुक्रमणिका

शिवीलीलामृत

....

'राजा, वयाची अठरा वर्षं पूर्ण होईपर्यंत साधी 'साला' ही शिवीसुद्धा मी तोंडानं उच्चारली नव्हती-'

'हो, पण पुढे माणसांची ओळख पटायला लागली. त्यातून तुम्ही भाषाशास्त्रज्ञ. त्यामुळे तसल्या माणसाला तोच शब्द हवा. म्हणूनच तुम्ही शिव्यांचा संग्रह वाढवलात न?' हे संभाषण झालं होतं मराठीतले डी.लिट्. आणि विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. ना. गो. कालेलकर यांच्या घरी. ते मूळचे मालवणी. त्यामुळे 'भ' च्या बाराखडीतल्या सर्व शिव्या ते अगदी भल्याभल्यांना मोठ्या निःसंकोचपणे द्यायचे. त्यांचा हा शैव संप्रदाय भाषाशास्त्राच्या ज्ञानाइतकाच मूलगामी होता. शिमग्याच्या दिवशी तर प्रत्येकाचं स्वागत ते मनमुराद शिव्यांनी करायचे.

प्रभाकर पाध्येही या वर्गातले. पूर्वी मी नोकरी मिळाल्याचं कळवायला त्यांना फोन केला होता. तेव्हा तेही आनंदानं, 'शिंचे, फोनवर काय सांगतेस!.... कार्टे पेढेतरी आण!' असं म्हणाले होते. रागणि प्रेम यांच्या उत्स्फूर्त आविष्कारासाठी आपल्या भाषेतल्या शिवीसारखं दुसरं प्रभावी माध्यम शोधूनही सापडणार नाही.

माझे एक आतोबा शाळामास्तर होते. कोकणात शेजवली या खेड्यात त्यांची शेती आणि डोंगरात एकच एक उभं घर. राखण करण्यासाठी तीन बंदुका पुढल्या भिंतीवर असत. पण कोणा परक्याचा आक्षेपार्ह पायरव आढळला तर आधी सणसणीत शिवी. मग बंदुकीची गरज पडायची नाही. त्यांच्या घरातली ही सत्यकथा आहे.

त्या डोंगरात नेहमीच दोनतीन वाघांचं छोटं सुखी कुटुंब मुक्कामाला असायचं. वर्ष सहा महिन्यांत एखादी गाय, वासरू यांचा जबरी पाहुणचार ते हक्कानं घ्यायचं. एका रात्री वाघ वासावर आला तो नेमका चुलीमागच्या दीडदोन वितीच्या खिडकीत. धुरासाठी बनवलेल्या त्या खिडकीला गज नव्हते. त्या चौकटीत वाघाचं थोबाड अंदाज घेत होतं. आतोबांची एक चुलती चुलीच्या उबेला झोपायची. आधीच म्हातारपणची अधू झोप. त्यात वाघाच्या श्वासाचा जवळून येणारा दर्प. आजीबाई जाग्या झाल्या. चांदण्यात त्यांना ती उग्र मुद्रा स्पष्ट दिसली. हती आलेलं लाकूड त्याच्या नाकाडावर फेकत त्या म्हणाल्या, 'कुळक्षा झाला त्या वाघराचा. शिरा पडली तुझ्या तोंडावर ती!'

वाघ पळाला. लाकडामुळे नाही, कुळक्षयाच्या भीतीने! ही भीती वाघाशिवाय दुसऱ्या कोणाला असणार?

एकूणच या कुटुंबात शिव्यांचा संग्रह कोणाचा जास्त हा संशोधनाचा विषय होता. त्यांच्यात एक पोलीसपाटील होते. ते हळहळून म्हणायचे,

'भाऊ शाळामास्तर असल्यामुळे त्याची कशी रोज शिव्यांची उजळणी होते, म्हणून त्याचं पाठांतर चांगलं. माझं काय, मी चार-सहा महिन्यांनी तोंड उघडणार!'

अनुक्रमणिका

शिवीच्या जहालपणावर, प्राणांतिक ठसक्यावर तिचा दर्जा अवलंबून असतो. म्हणून तर 'हासडणे' हे एक क्रियापद शिवी आणि जीभ याच दोन नामांसाठी वापरले जाते. दुसरीकडे कुठेही त्याचा वापर होत नाही. दोघांची गाठ प्राणांशी! आम्ही अनेक भाषाभाषी जेव्हा एकत्र जमतो तेव्हा शिव्यांचा विषय निघतो. त्यात मराठीच्या तोडीस तोड शिव्या पंजाबीत असल्याचं आढळलं. उर्दूवाले 'जेहन्नुम में जाइए!', 'दफा हो जाइए!' म्हणतानाही 'जाइए' च म्हणणार. कारण उर्दू अदब !

गुजरातचे थोर समाजसेवक महाराज रविशंकर व्यास दुसरे विनोबा. दरोडेखोर 'बाहरवाटियां' ना त्यांनी समाजात आणलं. असे हे करुणानिधी लहानपणी महाव्रात्य होते. त्यांची आई त्यांना खूप शिव्या द्यायची. आपल्या आठवणी सांगताना ते म्हणतात, 'बानी गाळमां मने घीनी नाळ देखाती' (आईच्या शिव्यांमध्ये मला तुपाची घार दिसे!') गुजराती माणूस तो, त्यांना शिव्यांवरही तुपाची धार हवी.

शिव्यांना सरसकट अश्लील म्हणून अर्वाच्य समजणं हे अन्यायाचं आहे. इतकंच काय, माणसाच्या उच्चारस्वातंत्र्याचा मूलभूत हक्कावर ती गदाच आहे. आमचे अधिकारी आनंदाचं भरतं येऊन एखाद्याचं अभिनंदन करायलाही 'च्याऽऽ' नं तोंड उघडतात. खरंतर ऐकल्याबरोबर संडासला लागावी किंवा पायताण हातात घ्यावं याच प्रतिक्रिया होतील अशी ती शिवी! अशा जातिवंत शिव्या शास्त्रोक्त उच्चारणासह आता कमी ऐकायला मिळतात.

आता शिकलेले तरुण इंग्रजीत शिव्या देतात. 'ब' ने सुरू होणाऱ्या त्या कसल्या बुळबुळीत शिव्या! व्यंजनात महाप्राण नाही तर ती शिवीच नाही. म्हणून तर शिवीसाठी 'भ' ची बाराखडी उत्तम !

सगळ्या रागाचा समर्थ उद्रेक केवळ एकाच शब्दात करणारी सणसणीत शिवी माणसानं अवश्य द्यावी. पण ती आईच्या भाषेत!

अनुक्रमणिका

नावार्थ रामायण

....

'सचिनच्या नावाचा काय अर्थ होतो हो? एवढ्या पराक्रमी मुलाचं नाव त्याच्या आईवडलांनी तसंच ठेवलं असणार, नाही?' माझ्या संस्कृत पंडिता मैत्रिणीकडे कोणीतरी हा विषय काढला.

प्रतिभा गेली अनेक वर्षं पुण्यातल्या डेक्कन कॉलेजात चालू असलेल्या संस्कृत शब्दकोशाच्या महाकाय प्रकल्पात काम करते आहे. ती उसळून म्हणाली,

'काही अर्थ-बिर्थ निघत नाही त्या शब्दाचा! त्या बंगाल्यांनी साऱ्या संस्कृत शब्दांचं धिरडं घालून ठेवलंय. शचि आणि इंद्र यांना एकत्र आणणारा शचींद्र हा मूळ शब्द. त्याचं हे अपभ्रष्ट रूप आहे झालं!' एक सचिन गडगडल्यावर नितीन आणि तत्सम सगळेच रद्द झाले.

प्रत्येक आईबापांना आपल्या मुलाचं नाव अगदी 'वेग्गळंऽऽ' ठेवायची हौस असते, म्हणून तर एकाच वयाचे अनेक राजू, एकाच वयाच्या अनेक वैशाली आपल्याला दिसतात!

ज्यांना आपल्या कुटुंबात एकाक्षरी मंत्र हवा असतो त्यांचा मार्ग सोपा असतो. एक 'सु' धरला की सर्व सु-सु करत जन्माला येतात. पहिलीच्या नावामागे 'श्री' जोडलं तर त्या घरात मुलींची माळच लागली. अखेर आठव्या मुलीचं नाव 'इतिश्री' ठेवलं. लग्नानंतर तिच्या नवऱ्यानं आधी तिच्या नावातली श्री काढून टाकली! आता ती आमच्या मित्रपरिवारात फक्त 'इति' म्हणून ओळखली जाते.

ह्या एक अक्षरवाल्यांना दुसरं कोणतंच तर्कशास्त्र मान्य नसतं. नवऱ्याचं नाव नितीन म्हणून मुलांचाही नन्नाचा पाढा लावायचा ह्याला काय अर्थ आहे?

त्यातही केवळ ऐकायला छान वाटतं म्हणून मराठी घेऊन एम. ए. झालेल्या एका बाईनं आपल्या मुलीचं नाव निलिशा ठेवलं. पदांची फोड केली तर नील आणि ईशा मिळून नीलेशा असा शब्द तयार होईल. निलेश शंकरासाठी तर ओढून ताणून निलेशा पार्वतीसाठी म्हणता येईल. पण निलिशा म्हणजे काय? डोकं खाजवत चर्चा चालली असताना शाळेत जाणारी प्राजक्ता म्हणाली, 'अग मावशी, ते 'शालिनी' चं उलटं करून ठेवलंय!' धन्य ती नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा!

संस्कृत किंवा तशा तोंडावळ्याचा शब्द असेल तर त्यावर लोकांची अगदी श्रद्धाच असते. संस्कृतात असणार ते सर्व मंगल, उदात्त अर्थाचं असणार असं त्यांना वाटतं. मग अर्थ न पाहताच ते नावं ठेवत सुटतात. आपल्याच मुलाचं नाव 'पंकज' ते काय म्हणून ठेवत असतील? करता-करात कोणी आपल्या मुलीचं नाव 'श्लेष्मा' ठेवल्याचं ऐकलं. त्यांच्या डोळ्यांपुढं करिष्मा असावी. पण ह्या शब्दाचा अर्थ शेंबूड हे त्यांना सांगणार कोण?

अनेक नावं आईबाप पुढच्या स्वप्नपूर्तीसाठी ठेवतात. प्रज्ञा, मेधा ही नावं ठेवणाऱ्यांना मुलगी बद्धिमान निघावी असं वाटत असतं. पुढे परिणाम वेगळाच दिसतो. 'नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा' ही म्हण प्रत्येक भाषेत सापडते. यावरून हे सत्य कसं सार्वत्रिक आहे हे लक्षात येतं. माणसू आणि नाव यांच्यात अर्थीअर्थी संबंध नाही हे सांगणारी पापकाची जातककथा प्रसिद्ध आहे. नाव असतं कणिका पण बाई

रेल्वेच्या आरामखुर्चीतही मावत नाही. नाव अजय पण सतत हापटी खाण्यातच कारकीर्द संपली. अशी शेकडो उदाहरणं मिळतात.

नाव ठेवण्याची प्रत्येक समाजाची एक रीत असते. भारतात अनेक ठिकाणी कुलोपाध्ये जन्माक्षर काढून नाव ठेवतात. त्यातही उत्तरेला आणि पूर्वेला सामासिक नावांचा प्रघात आहे. मैथिलीशरण, देवीप्रसन्न अशा नावांमधलं फक्त पहिलं संबोधन राहतं नि परिणामी मैथिली, देवी या हाकांना ओ देणारे बऱ्यापैकी टक्कल पडलेले, धोतराचा सोगा खिशात घातलेले भद्रजन असतात!

एकेका प्रदेशात एकेका नावाचा महिमा असतो. एक राम आणि पुढे आधार, शरण जोडलेली नावं एकत्र केली तर अर्धा उत्तर भारत एकाच वर्गात मोडेल. सुब्रह्मण्यम् घेऊन बोटं मोडत गेलं तर अर्धा दक्षिण देश एका गटात टाकता येईल. मुलीला नदीचं नाव ठेवणं हा संपूर्ण भारतात समान सांस्कृतिक घटक आढळतो. ही जोड किती अर्थपूर्ण आहे. सर्व नद्या स्त्रीलिंगी. फक्त ब्रह्मपुत्र तेवढा असमियांचा 'बाबा ब्रह्मपुत्र' असतो.

गुजरात्यांना चिडवण्यासाठी मी गमतीनं म्हणते, 'तुमच्यात अर्ध्या पुरुषांचं नाव रणछोडदास. तुम्ही काय सैन्यात भरती होउन लढणार?' पण आपल्या नावाला जागायचं असं प्रत्येकानं ठरवलं तरी अनर्थ होण्याची शक्यता आहे, कारण बंगाल्यात एका मंत्र्याचं नाव 'कामिनीमोहन' होतं, आता बोला!

अनुक्रमणिका

शब्देविण संवादिजे

....

तीनेक महिन्यांच्या तान्ह्या गौरीला मांडीवर घेऊन मी गणपतीच्या देवळापुढच्या निंबाखाली बसले होते. सगळीकडे स्तब्ध शांतता होती. मोठ्या-मोठ्या डोळ्यांची गऊ वरच्या झाडाकडे एकटक बघत होती. मधेच वाऱ्याची झुळूक आली. कडूनिंबाची पानं सळसळत हलली. त्या हलत्या झाडाकडे पाहून गऊ छान ओळखीचं हसली. झाडाशी तिनं साधलेला तो संवाद होता.

ती जन्मल्या दिवसापासून रोजच कुणी न कुणी बाळ बघायला यायचं. तिचं ठेवलेलं नाव 'लावण्या' आहे. हे नाव ठेवावं अशी ती रूपानंही आहे. बघायला येणारा प्रत्येक जण तिचं नाक, डोळे, रूप, रंग वाखाणत कुठं गालाला हात लाव, चिमुकले हात हातात घे असं करायचा. माणूस हा बोलणारा प्राणी आहे ही व्याख्या तिला तोवर समजली असावी. आमच्या समोरचा दीपक अगदी अबोल. तो आला तेव्हा नुसता तटस्थ बघत उभा राहिला. हा न बोलणारा प्राणी कोण असावा बरं याचं आश्चर्य गऊच्या डोळ्यात स्पष्ट उमटलं होतं. तिचा विश्वास बसत नसावा. हाही एका परीनं शब्दाविण संवादच.

मुलं भाषा कशी शिकतात यावर जगातले सर्व भाषाशास्त्रज्ञ आणि मनोवैज्ञानिक संशोधन करतात. आपापले सिद्धान्त ते ढीगभर पुराव्यानिशी मांडत असतात. आपण शास्त्रज्ञ नसलो तरी घरीदारी वाढणाऱ्या मुलांचं निरीक्षण केल्यास ही संवादाची गरज नि धडपडीतून सापडत जाणारे शब्द आपल्याला टिपता येतात. बाळाचं रडणं हा संवादाचा पहिला प्रयत्न. थोडं निरखून पाहिलं तर लक्षात येतं की मुलाला पाळण्यातही कोणाशीतरी बोलण्याचा खेळ जास्त आवडतो. पाळण्याला बांधलेलं चिमणाळं हललं की त्याला प्रतिसाद देण्यासाठी त्याचे डोळे, हातपाय सर्व नाचायला लागतात. कोणी बाळाशी बोबडं बोलायला लागलं की त्याची हाहू करण्यातली अधीरता वाढत जाते. त्याला स्वर सापडलेले असतात हळू हळू त्या स्वरांमधून अर्थ, भाव व्यक्त करणंही त्याला साधायला लागतं. बाळाशी जितकं बोलावं तितकी त्याची आकलनशक्ती वाढत असते.

आमची कोमल सहा महिन्यांची झाली तेव्हाची गोष्ट. अंघोळ घालून तिला खोलीत आणून बसवलं. घरात गुलाबजाम केलेले होते म्हणून तिच्या आईला मी म्हटलं, 'एक देऊया का ग तिला? तिच्या बापाला फार आवडतात. तीही खाईल.' पहिला गुलाबजाम तिनं पटकन संपवला आणि मी वाटी घेऊन उठले तर पठ्ठी 'एऽऽ' असं स्पष्ट नाराजी दाखवत ओरडली. स्वैंपाकघरातून दुसरा घेऊन येईपर्यंतही तिला धीर नव्हता.

आवड-नावड, भूक-तहान, राग-लोभ सारं सारं कुणालातरी सांगण्याची गरज माणसाच्या पिल्लांना सर्वात जास्त असते. त्याच्या हातात सर्वात जास्त साधनंही असतात. पाहता-पाहता सर्वात सामर्थ्यवान साधन त्याला सापडतं, ते म्हणजे भाषेचं. खापर-पणज्याच्या खापर-पणज्यापासून चालत आलेला साठा ते उत्स्फूर्तपणे, स्वतंत्रपणे, मनाला हवा तसा वाकवत असतं, वापरत असतं. मूल अनुकरणातून भाषा शिकतं असं म्हटल जातं पण प्रत्यक्षात अनुकरण नाकारून केलेल्या अनेक नव्या नव्या रचना प्रत्येक जण प्रतिक्षणी करतो असं आधुनिक भाषाविज्ञान सांगतं. माणसाची संवादाची गरज आणि भाषेसारखं प्रभावी साधन या दोन चक्रांचे आटे आता एकमेकात पक्के बसून गेलेले आहेत. जगातल्या सगळ्या भाषा नष्ट झाल्या तर मनुष्य जातीची कित्येक अणुयुद्धांपेक्षा जास्त हानी होईल असं भाषाविद् सांगतात. शब्दांचं विलक्षण स्फोटक, संहारक आणि त्याच वेळी संजीवक, सर्जनशील साधन माणूस आयुष्यभर वापरत राहतो.

शेवटी हाच संवाद म्हातारपणी आकसत अगदी कमी होत जातो. माझ्यासमोर राहणारे पुंडलिककाका अतिशय उमदे पेन्शनर. क्रिकेटचा सामना सुरू होण्यापूर्वीच तो जिंकल्यावर वाटण्यासाठी ते श्रीखंडाच्या गोळ्या तयार ठेवायचे. शेजाऱ्यांच्या आवडीच्या माणिकबाईंच्या नाट्यसंगीताच्या, भावगीतांच्या कॅसेट्स ऐकवायचे. अखेर अखेर त्यांना दुखण्यानं घेरलं. त्यांचा उत्साह, विनोद आटत गेला. क्षीण होत होत शब्दही बंद झाले. शेवटी त्यांच्या डोळ्यांत नजर नव्हती की नजरेत ओळख. तिथे काहीच उमटेना. मृत्यूनं तो प्रदेश कबजात घेतला होता. अशा किती जणांचे अखेरच्या दुखण्यातले भकास, शून्य चेहरे डोळ्यांपुढे आले नि वाटलं,

माणूस जेवढा संवाद साधतो, सांगतो, बोलतो तेवढाच तो जगतो.

अनुक्रमणिका

शाकाहारीने केला-

....

'दादाकडे जाण्यात आता काही अर्थ नाही. कोणी पाहुणं गेलं की वहिनीला म्हणतो, मी शिरिखंडाचा डबा आणतो. तू काहीतरी बटाट्याची भाजी आणि कोशिंबीर कर!' कोशिंबीर म्हणून तो चांगला खीखी हसला. दुसरी बाई म्हणाली,

'मग, पुण्याला राहून ही कोशिंबीर करून आणली, आता खा निसती कोशिंबीर!'

एकूण हा मामला असा 'शाकाहारीने केला मांसाहारी भ्रतार-' या वर्गातला होता.

कोंबडीही शाकाहारात मोडत नाही याचं चीनमधल्या लोकांना आश्चर्य वाटतं. या देशात मात्र आहारावरून फक्त दोन गट पडतात, शाकाहारी आणि मांसाहारी. यातही सर्व शाकाहाऱ्यांसाठी शुद्ध हे विशेषण आवश्यक. ते तसलं खाणाऱ्यांची सावलीही पडून न घेण्याचे दिवस आता राहिले नाहीत. आणि सोवळ्या जेवणाची टर उडवणारेही कमी नसतात. त्यातल्या त्यात हौशी मांसाहारी हा पाककुशल मांसाहारी गृहिणींच्या नेहमीच थट्टेचा विषय असतो.

आहार आणि भाषा दोन्हीचा जिभेवर संचार म्हणून दोघांची भाषा बघण्यासारखी. त्यात विविधतेचा आणि समृद्धीचा कौल मात्र मांसाहारी लोकांच्या बाजूनं पडतो. कुठल्याही बाजारात वांगी घ्यायला फार शब्दवैभव लागत नाही. पण आरतीला मटण आणायचं शिकवताना जयानं दहा-पंधरा नवे शब्द शिकवले. दुकानात जाऊन प्रत्येक भाग दाखवून त्यात काय पहायचं हे पद्धतशीर समजावलं. मटण कसं मागायचं हे न समजणाऱ्या अडाणी गिऱ्हाइकांच्या गळ्यात मटणवाला नेहमी वाईट मटण मारतो. कारण त्यांच्या नोटा चलनी असतात. भाषा मात्र चलनी नसते.

ईश्वराच्या पहिल्या अवताराबद्दल तर काय बोलावं? पाण्याविना मासा आणि माशाविना खाणारा कसा तडफडतो ते सर्व देशभर पहायला मिळतं. एका असमिया लेखकानं 'इलिसा' माशावर सुंदर कथा लिहिलेली आहे. गोपाळ कृष्ण भोब्यांचं 'मासे आणि मी' हे पुस्तक मी प्रत्येक शाकाहाऱ्याला वाचायला लावते. खरा तो प्रेमा त्याला कळावा म्हणून.

समुद्रात जेवढी मासळी तेवढेच तिला जमिनीवर शब्द. जवळा, सुंगटं, भुसा, काड, वाकडी डाळ इतके शब्द एकाच प्रकारासाठी आहेत हे खरं वाटेल? अशा विविधतेतही कोकणात चिंगळं ही पूर्वेच्या चिलीका सरोवरात चिंगुल ही एकता.

बंगाल्यात जावयाचा एक सण असतो. त्या दिवशी रहूची किंमत अस्मानाला भिडते. तोंडात दात न उरलेला बाबू मोशायही आपल्या सासूनं कसा 'दारूण माछेर झोल' बनवला होता हे दोस्तांना ऐकवतो. 'ताजा मासा येई घरा, तोची दिवाळी दसरा' हा अनुभव शाकाहाऱ्यांना कोणत्या पदार्थानं येईल बरं?

माशांची आणि त्यांच्या पदार्थांची गणती शक्य नाही. राज्यश्री भाषिक पाहणी करत होती. वर्गातली अगदी मुखस्तंभ म्हणून ढ ठरलेली मुलगी शिक्षिकेनं तिच्यापुढे उभी केली. आपल्या पद्धतीनं तिला बोलती

अनुक्रमणिका

करून तिची शब्दगणना सहाशे असल्याचं राज्यश्रीनं सांगितलं! साधारणपणे हुषार मुलांची ही गणना ४५० पर्यंत जाते. ती मुलगी कोळ्याची होती. ही भाषिक संपत्ती तिला सुमद्रानं दिली होती.

सोवळ्या शेजाऱ्यांना कळू नये म्हणून अंड्यांनाही कवटं, बिनदेठाचे कांदे, कुक्कुची फळं असे कितीतरी शब्द असतात. शाकाहारी जिनसांची भाषा किती तोकडी. साऱ्या देशात दाल एक. वरण साधं किंवा फोडणीचं, बस! भाज्या, रसाची किंवा कोरडी या दोनच वर्गात मोडणार. वांग्याच्या नशिबात भरीत किंवा भरली वांगी हे दोन मोक्ष जास्तीचे! मांसाहारी गृहिणी एका माशाचे दशावतार जन्माला घालते. उडद-मेथी, भुजणं, कालवण, रस्सा, दबदबीत, सुकं, तळलेली तुकडी, कचमूर, सार, सरंग्याचंही लोणचं अशा कितीतरी परी सासवा-सुना घडवतात. ते शब्दवैभव ज्याच्या रसनेला माहीत नाही त्याची टिंगल होईल नाहीतर काय? त्याचं चुलीजवळ अगत्यपूर्वक स्वागत नाही.

हो! ज्याचं संगीताचं ज्ञान फक्त राष्ट्रगीतापुरतं मर्यादित आहे त्याला काय करायची आहे किशोरी आमोणकर?

अनुक्रमणिका

उखाणे

....

'काळी चोळी कणकण, पुणेरी विणकर, विणली होती बरी, मी नव्हते घरी, सोन्याचा राजवाडा, चांदीचं कुलूप, आत उघडून बघते तर जिरग्या तांदळाचा भात, भातावर वरण, वरणावर तूप, तुपासारखं रूप, रूपासारखा जोडा, चंद्रभागेला पडला वेढा, आधी आळंदी दावा, मग पंढरीला जावा. पंढरीचा कळस... चं नाव घ्यायला मला नाही आळस.'

असं ऐकणाऱ्याची दमछाक करणारा उखाणा अजून गावाकडच्या बाया घेत असतील. हा जुना गांवढळ विषय कशाला शोधून काढला असं एखाद्याला वाटेल. खरं तर तो भाषेचा सुंदर आविष्कार आहे. बऱ्याच अंशी ते अपौरुषेय वाङ्मय आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात सांस्कृतिक रंग आहेत. वरच्या उखाण्यात इतके वेढे घेऊन ही वधू पंढरीला जाते. लोकसाहित्य वेचण्यात आयुष्य खर्ची घातलेल्यांना या अनघड रत्नखड्यांचे रंग माहीत असतात. ओठाबाहेर न आलेले तर कैक उखाणे असतील.

लाजत, मुरकत वेळ काढत उखाण्यात नवऱ्याचं नाव घेणं ही फक्त मऱ्हाटणींची मिरासदारी आहे. बायकांच्या वेढ्यात आपली बायको उखाणा घेण्यापूर्वी आणि घेत असताना दुरून पाहण्यातली खुमारी मराठी नवऱ्यांनाच माहीत. तेही आता इतिहासजमा झाले बापुडे. एरवी उत्तरेस 'मुन्ने के बापूऽ' म्हटलं की पुरे. इतर प्रांतातल्या बायकाही सरसकट नवऱ्याचं नाव घेत नाहीत. समोरच्याशी नवऱ्याचं जे नातं त्याचा उपयोग त्या करतात. त्यामुळे परप्रांतीयांना 'उखाणा' म्हणजे काय हे समजावून सांगणं कठीण. 'सेवी तोचि चवी जाणे, येरा सांगता लाजिरवाणे.'

एकेका समाजाचं खास असं सांस्कृतिक अंग असतं. आता 'परदा' आपल्याला माहीतच नाही. 'बायकांना लोणचं समजून बांधलेला दादरा' हे आपलं मत. पण परदा नसता तर अर्धं उर्दू काव्य जन्मालाच आलं नसतं. तसंच जावई-सुना आल्यावरही बाई इतकी लालेलाल, घामाघूम का होते हे ऊठसूट पीटर म्हणणाऱ्या जेनीला कसं कळणार?

उखाण्यांचेही परंपरागत साचे असतात. 'द्राक्षाच्या वेवावर रुमाल टाकले विणून, - नाव घेते आग्रह केला म्हणून.' असले छापाचे उखाणे सुमार बुद्धीच्या बाया घेतात. त्यात एखादी 'इंग्रजीत चंद्राला म्हणतात मून, - नाव घेते अमक्यांची सून.' असे इंग्रजीचे क्लास सुरू करते. आग्रह करणाऱ्यांची खोड मोडण्यासाठी हिरीनं मुळीच न हसता 'यमुनेच्या तीरी कृष्ण वाजवतो पावा, - आशीर्वाद द्यावा' हा एकच उखाणा लग्नात पुनः पुन्हा घेतला. पाचवेळा पावा ऐकल्यावर त्यातली हवाच गेली.

उखाण्यात पुरुषही मागे नसतात. 'निळं तळं निळं पाणी, निळ्या कमळात नीला राणी.' हा काव्यमय झटका एका अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांना आला होता. एका रोखठोक नवऱ्यानं भर मांडवात 'दिवसेंदिवस वाढत चालली महागाई, शकू आता संसार नीट कर ग बाई!' असं बायकोला ऐकवलं!

पण उखाण्यांचे हे नमुने मी शिकवताना सांगत नाही. माझ्या मनात कोरला गेलेला तो उखाणा आहे ना. सी. फडक्यांच्या पहिल्या पत्नी मनोरमाबाईंचा. त्या माझ्या मैत्रिणीच्या काकू.

अनुक्रमणिका

सांगलीतली गोष्ट ही. एका मंगळागौरीत सगळ्यांना उखाणे घ्यायचा आग्रह झाला. प्रौढावस्था ओलांडलेल्या या अशा बाईपाशी आल्यावर सगळ्या चपापून गप्प झाल्या तेव्हा त्यातल्या एका वृद्धेनं त्यांच्या अहेवपणाचा मान म्हणून म्हटलं, 'घे ग मनोरमे, तू पण नाव घे!'

उजव्या खांद्यावरचा पदर सारखा करत त्यांनी घेतलेला उखाणा असा होता-

'शेवटचा आला मुक्काम, शेवटचं आलं गाव. अशा वेळी माणून घेतो नारायणाचं नाव!'

फडक्यांचं सगळं कागदी साहित्य या एका उखाण्यावरून ओवाळून टाकायला माझी मुळी हरकत नाही.

अनुक्रमणिका

भाषा शेजाऱ्याची

....

‘अहो, दिपूची सारेगममध्ये निवड झाली बरं का!’ यावर शेजारणीची प्रतिक्रिया असते, ‘होक्का!’ जशी काही ही संधी जुन्या बाजारात मिळते!

उतू जाणाऱ्या दुधावर पाण्याचा शिपका मारला की दूध खाली बसतं. शेजाऱ्यांच्या भाषेचं हे नेमकं असं असतं.

हे खरं नसतं तर ‘निन्दक नियरा रखिए’ आणि ‘निंदकाचे घर असावें शेजारी’ हे कबीर आणि तुकाराम यांनी काय एकमेकांच्या कॉप्या करण्यासाठी म्हटलं? ख्रिस्तानंही (बाकी कोणावर नसलं तरी) शेजाऱ्यावर प्रेम करा म्हणून बजावलं. काठियावाडी माणसं देवाच्या पायावर डोकं ठेवताना म्हणतात, ‘आधी शेजाऱ्याचं भलं कर, मग माझं!’

शेजाऱ्यांनी भाषेला खूप दिलं आहे. भिंतीला कान असतात ते कोणाचे? घरोघरी मातीच्याच चुली हा इशाराही शेजाऱ्यालाच. दुसऱ्याचं कुसळ दिसतं पण आपलं मुसळ दिसत नाही ते शेजाऱ्याच्याच डोळ्यांना. आपला तो बाब्या, लोकाचं ते कार्टं हे एकीकडे तर दुसरीकडे शेजाऱ्याची बायको सुंदर. (त्याच चालीवर शेजारणीचा नवरा गरीब!) घर की मुर्गी दाल बराबर म्हटलं की कोणाची दाल मुर्गीबराबर ते सांगायला नको! म्हणून तर म्हणतात, स्वैंपाक करावा शेजारणीचा बघून अन् शिणगार करावा सवतीचा बघून. एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरू मारू नये. किंवा एकीनं सरी घातली म्हणून दुसरीनं दोरी बांधू नये हे शहाणपण दोन शेजारणींनाच सांगितलं गेलंय. गांजलेल्या सासुरवाशिणीची समजूत घालताना ‘चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे’ असं शेजारीणच म्हणाली असेल. सतत ठोकत राहणारा म्हणून ‘तांबटाचा शेजार अन् वर्षभर आजार’ असा वैतागणारा शेजारीच. ‘गरीब की बीबी सबकी भाभी’ म्हणून राबवून घेणाराही तोच. पाण्यात राहणाऱ्यानं माशाशी वैर करून चालत नाही हे माशांना थोडंच सांगितलंय? ताकाला जाऊन भांडं लपवायचं शेजाऱ्यांकडेच. आणि दाभण मागायला गेली नि सहा महिन्यांची गाभण होऊन आली हा धोका शेजार नसता तर निर्माणच झाला नसता.

शेजाऱ्यांच्या भाषेचे नमुनेही ऐकण्यासारखे असतात. त्यांच्या मते आपल्याला वस्तू नेहमी महाग पडलेली असते. त्यांच्या महागड्या वस्तूत दर्जा आणि चोखंदळपणा दिसतो. शेजारणीचं वय आपल्यापेक्षा नेहमीच कमी असतं. कोणतीही शाळा पाच वर्षं झाल्याशिवाय दाखला देत नसली तरी तिला मात्र एकोणिसाव्या वर्षीच पदवी मिळालेली असते. दाखवलेल्या पहिल्या ठिकाणीच तिचं लग्न झालेलं असतं. मोलकरणीही तिच्यावर खुश असतात. एखादी तरुण बाई एकटी राहत असेल तर सी.बी.आय. नि आय. एस.आय.लाही मागे टाकतील इतके तिचे शेजारी जागरूक असतात ! शेजाऱ्यांची स्तुती ही नेहमीच व्याजस्तुती म्हणून घ्यायची असते. ‘अजिबात वायफळ खर्च न करता संसार करावा तुम्हीच’ ह्याचा अर्थ अगदी चिकट आहे, हातून एक पैसा सुटत नाही असा घ्यायचा.

पण सगळेच शेजारी असे नसतात. ‘काकू, आज तूच माझी वेणी घाल!’ किंवा ‘मावशी आज शेंगा उकडल्या का?’ असं म्हणत ते आपल्या पोटात शिरतात, मनात घर करतात. आपल्या परदेश दौऱ्याची बातमी ऐकून हातावर साखर ठेवतात. ‘हे दुखणं आता मला घेऊनच जाणार. तुम्ही नुसत्या थोडावेळ जवळ बसा!’ असं म्हणतात. तेव्हा आपल्याला वाटतं आपण त्यांचं मरण मागे रेटलं.

अनुक्रमणिका

कधी आपलेच दिवस फिरलेले असतात. नशिबाच्या फटक्यांनी आपण जायबंदी असतो. तेव्हा सारं काही माहीत असनूही काही न विचारता, बोलता मूकपणे सुचवतात, ‘बाई, सारं सोसण्यातच शहाणपण आहे. दुसरा इलाज नाही.’ ही मूकभाषा ही खऱ्या शेजाऱ्याची भाषा. यालाच गुजराती ‘पहिला सगा पडोसी’ म्हणतात. पाठचा किंवा पोटचा येण्याआधी उभा राहतो तो शेजारी.

अनुक्रमणिका

एकेकाचा काळ

....

जन्मभर पुरणारी भाषा माणूस पाच वर्षांचा होईपर्यंत शिकतो. वयाची अकरा-बारा वर्षं उलटल्यावर व्याकरणात वाक्यांचे काळ, अर्थ समजून घेतो . आयुष्याची निवडलेली वाट आणि व्यक्तित्व यांना धरून कोणतातरी एक काळ तो जास्त वापरत असतो.

आजूबाजूला जरी कान दिला तरी हे लक्षात येईल. ऑफिसातल्या सुनीलला काही काम सांगितलं की तो तत्परतेनं 'हो करतो' म्हणतो. कधी पुढे करीन नाही की, केलं असं येऊन सांगण्याची गरज नाही. त्याचा आपला सदैव वर्तमानकाळ. उलट अधीक्षक भाट्यांचा करू, बघू, होईल असा मोघम भविष्यकाळ. फक्त भविष्यकाळ तळ्यात मळ्यात असा अनिश्चित असतो. 'मैं मायके चली जाऊँगी' मध्ये कायद्यातला पोकळपणा स्पष्ट आहे. 'सांग सागं भोलानाथ' हे त्याचं उत्तम उदाहरण. पण मग निश्चित काळ कोणता? 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच!' वर्गात हे वाक्य ऐकताच एकजण म्हणाला, 'दॅट साउन्डस डेफिनेट!'

साधारणपणे दुसऱ्यांकडून कामं करून घेतात त्यांच्या जिभेवर आज्ञार्थाची तबकडी असते. उलट वेळेवर काम न करण्यासाठीच धंदा घातलेला शिंपी 'करतोय, होतंय' अशा अपूर्ण रचनेतून सुटत नाही.

गद्धेपंचविशीत तरुण 'मी यंव करीन त्यंव करीन' म्हणतो. आणि माणसं 'होतं झालं' म्हणायला लागली की ओळखावं त्यांची साठी उलटली.

थोर थोर साहित्यिकही याला अपवाद नाहीत. चक्रधरांच्या महानुभाव मराठीत 'घेया हो, राहागा' असा दिलखुलास आज्ञार्थ दिसतो. मोरोपंतांची मात्र सर्व क्रियापदं ग्रांथिक वळणाची. ज्ञानेश्वरीची रचना मुळातच श्रोत्यांपुढे झाली. स्वतः ज्ञानेश्वरांची भूमिका 'जै जगा धाकुटे होइजे' अशा नम्रपणाची. त्यामुळे त्यांचा आज्ञार्थ 'घेइजोजी, देईजे' असा आर्जवी असतो. रामदासांना लोकाश्रय आणि राजाश्रय दोन्हीचं भान होतं. ते 'भक्तिपंथेची जावे', 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' या विध्यर्थाचा पंथ धरतात. थेट आज्ञा नाही. भाषेतल्या सर्व रचना मुक्तपणे वापरणारा कवी म्हणजे तुकाराम. प्रत्येक रचना थेट - रोखठोक. 'जळो जिणे लाजिरवाणे' असो किंवा 'हाकारोनी सांगे तुका नाव घेता राहू नका' अशी. नकारार्थी आज्ञाही खुंटा हलवून घट्ट केलेली.

एखादी रचना अशी भेटते की, व्याकरणानं तिथं पायात सापळा टाकलेला असतो. अक्टिव्ह आणि पॅसिव्ह व्हॉइसनं शाळेत केलेला छळ आठवावा. ब्रिटिशांनी दीडशेतली सव्वाशे वर्षं ही रचना आपल्या माथी मारली. आता आपणही 'सरकारकडून प्रत्येकी दहा हजार रुपये सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आले' ऐकून घेतो. ज्याला दिले त्याला उडवून लावतो.

या रचनेतही एकदा ठिणगी दिसली. कारण रघुवंशातली सीता. लक्ष्मणानं रानात नेऊन सोडल्यावर आणि त्यामागचं कारण सांगितल्यावर ती म्हणते, 'वाच्यस्त्वया मद् - वचनात् स राजा' (त्या राजाला माझ्या शब्दात तुझ्यामार्फत सांगितलं जाऊदे-) रथात बसताना ज्याला आर्यपुत्र म्हटले तो आता 'स राजा' आहे. 'मद्वचनात' ही पंचमी. व्याकरणात तिचं कारक अपादान. म्हणजे सुटण्याचा बिंदू. आता तिथे काही नाही. तू सांग असंही नाही. तुझ्याकडून सांगितलं जाऊदे असं सीता अक्षराअक्षरातून तोडत

जाते. ज्याच्याबरोबर सुखापेक्षा दुःखंच जास्त सोसली, अग्निदिव्य करायलाही ज्यानं समक्ष सांगितलं; त्यानं हा परोक्ष घाव घातला. सीतेची व्यथा व्याकरणानं इथे पुरतेपणी पेलली आहे.

मुनी म्हणतात, 'यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम्' बाळा, कितीही शिकलास तरी व्याकरणाचा अभ्यास ठेव!

अनुक्रमणिका

आपुले मरण

....

स्वातंत्र्यापाठोपाठ पश्चिम भारतात निर्वासितांचे लोंढे आले. गोरे, नाकेले, सुरमा घालणारे आणि अंगाला सरसूचं तेल लावणारे हे लोक. महाराष्ट्रात पाहता क्षणीच 'इथले नसलेले' वाटत. खूप निळीतले कच्छी कशिद्यातले पांढरे कपडे, नाकातला लाल लोलक आणि उलट्या घट्ट वेण्या घालणाऱ्या बायकांबद्दल कुतूहल वाटे. फाळणीचा वर्मी घाव झेलून जगण्यासाठी ते सिंधुभूमी सोडून आले होते.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आल्यादिवसापासून त्यांनी कधी कोणापुढं हात पसरला नाही. अगदी सानुग्रहसुद्धा अनुदान घेतलं नाही. पाकिस्तानात गेलेल्या मुहाजिरांनी तिथल्या पर्यायी हवेल्या, जमिनी बळकावल्या. पण सिंध्यांनी कोणाची चिंधी हडप केली नाही. रक्तातल्या व्यापारी पेशींवर भरोसा ठेवून ते मुळं पकडायला लागले. एकदा सिंध गेल्यावर त्यांनी 'सारा हिन्द सिन्ध' मानला; आपल्या मागचं 'निर्वासित' हे नाव सहज पुसून टाकलं. गेल्या पन्नास वर्षात आपली घरं सोडाच, त्यांनी उभ्या केलेल्या धर्मादाय संस्था, गृहनिर्माणसंस्था आणि रुग्णालयं पाहिली तर डोळे दिपून जातील.

या सोन्याच्या मुलाम्याखाली आपल्या हातून किती निसटून गेलं याचा हिशेब मात्र आज मावळती पिढी करू लागली आहे. माझ्यासारख्या सिंधीच्या शेजाऱ्यालाही ते जाणवतं आहे. एका दुकानात बापाच्या गादीवर बसलेल्या तरुणाला सिंधी बोलता येत नाही हे पाहून मी अवाक् झाले. सिंधी अभिजनांना 'आम्हाला सिंधी येत नाही.' असं सांगण्यात भूषण वाटतं. काही सिंधुपुत्र आपली मातृभाषा इंग्लिश सांगतात. 'रामायण आधी मग झाला राम जानकीवर' सारखा हा प्रकार. संगमरवराच्या शाळा बांधू शकणाऱ्या या समाजात सिंधी माध्यमातून उच्च शिक्षण घेणारे, साहित्याचा आणि भाषेचा अभ्यास करून पीएच.डी. मिळवणारे विद्यार्थी मिळत नाहीत. फाळणीच्या दाहातून लिहिलं गेलेलं साहित्य वाचणाऱ्यांची संख्या तुटपुंजी आहे. परंपरागत पर्शोअरेबिक लिपी लिहिता-वाचता येणारे सिंधी घटत चालले आहेत. नागरी आणि अरेबिक अशा दोन लिप्यांमध्ये छपाई करण्याचा घाट्याचा सौदा या व्यापाऱ्यांना करावा लागतो. एकीकडे भाषाप्रभुत्व नाही म्हणून आपल्याच भाषेबद्दल लोकांची उदासीनता, तर दुसरीकडे तीच भाषा टिकावी अशी सामाजिक निकडही निर्माण होत नाही. भाषावार प्रांतरचनेत प्रांत न मिळालेली भाषा म्हणून तिला सरकारी खुराकही नाही. साऱ्यामुळे बळी जातो आहे तो भाषेचा आणि तिच्यावर पोसलेल्या संस्कृतीचा.

एकभाषी देशांमध्ये मुख्य प्रवाह धबधब्यासारखा जोरदार असतो. तिथं बाहेरून जाणाऱ्यांची भाषा दुसऱ्या पिढीत संपून गेली तरी आश्चर्य वाटायला नको. अरेरिकेनं असा सांस्कृतिक गणवेश सर्वांना चढवला आहे. पण भारतात, संस्कृतीतली विविधता आणि पोटातले साम्य दोन्ही टिकून राहतं. इथं माणसाची ओळखच भाषेनं होते. म्हणू केवळ एका पिढीच्या अंतरात होणारा सिंधी भाषेचा ऱ्हास भयावह वाटतो.

आर्यावर्तात सर्वात प्राचीन अशा सिंधू संस्कृतीचे हे वारसदार. त्यातही बद्धिजीवी, सुसंस्कृत सिंधी भारतात आले. शाह आणि सामीपासून अयाज, नारायणश्यामपर्यंत समृद्ध साहित्यिक परंपरा या भाषेला आहे. पण दूरदर्शनवर आणि चित्रपटात पैशाला लालचावलेल्या मूर्ख सिंधी माणसाची प्रतिमा उभी करणाऱ्यांना हे काय ठाऊक? रेशमाच्या स्वरात पंजाबीच्या बरोबरीनं सिंधी गीतं लोकप्रिय आहेत. पण ती आमच्या कानी नाहीत.

अनुक्रमणिका

सिंधुभूमीसाठी शिरं अर्पण करणाऱ्यांची कुठे वाण आहे?' असली तेजस्वी वाणी विझलेल्या सिंधी मनात काय चेतवणार? मरणोन्मुख भाषेला ताजं रक्त साहित्यिकांची लेखणी पुरवते. पण स्वतःचा चेहराच हरवलेल्यांना त्याचं काय? आपण बुडतो आहोत, मरतो आहोत याचं भान वातानुकूलित सिंधबंधूंना नाही.

आपल्या समोर 'बुडती हे जन' अशी स्थिती आहे. आपले डोळे उघडले नाहीत तर ते जात्यात आणि आपण सुपात आहोत याचं भान आपल्याला तरी आहे का?

अनुक्रमणिका

बोलाफुलाची गाठ

....

गुरुदेव रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनात छोट्या मुलांसाठी फुलं वेचून आणायचा एक तास असे. वर्गाबाहेर भटकून मुलं ढीगभर फुलं आणत. एकदा एका पाहुण्यानं विचारलं, 'याचा मुलांना काय उपयोग?'

'ती आता फुलं वेचतील, पुढे कवितेत ते शब्द वाचतील तेव्हा त्याचा सुगंध त्यांना शब्दातून जाणवेल.' गुरुदेव म्हणाले. बोलाफुलाची गाठ पडावी ती अशी सहज.

फुलांची नावं फुलांइतकीच मोहक आहेत. त्यांचेही वर्ग आहेत. साधा एक चाफाच घ्या. दक्षिणेत 'संपिगे' आणि उत्तरेत 'चंपक' असा फक्त उच्चाराचा फरक. आपल्याकडे भुईचाफा, देवचाफा, सोनचाफा, लवंगी चाफा, नागचाफा, हिरवा चाफा, कवठी चाफा असे कितीतरी प्रकार आणि तेवढेच शब्द. मोगऱ्यातही पोटजाती मुबलक. बटमोगरा, हजारामोगरा, वेलाचा, एकेरी, दुहेरी असा मोगरा फुलून आलेला. शेवंतीही त्यात मागे नाही. पिवळी शेवंती, बटण शेवंतीपासून आपण येऊन ठेवतो झिपऱ्या शेवंतीपर्यंत. बिचाऱ्या फुलाला झिपरी म्हणून आपण काय साधलं? याच शेवंतीला असमिया भाषेत इंद्रमालिनी असं स्वर्गीय नाव आहे.

क कमळातला आपण सर्वांनीच गिरवलेला, पण मध्यरात्री क्वचितच कधीतरी फुलणाऱ्या फुलाला ज्यानं 'ब्रह्मकमळ' नाव दिले तो खरा कवी. 'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी' या वचनाची इथं आठवण होते. सारं जग झोपलेलं असताना पाकळ्यांच्या पापण्या उघडून चैतन्याचा आविष्कार करणारं हे परमहंस फूल.

चित्रात किंवा अंकलिपीत सहसा न दिसणारं एक कमळ आहे, ते म्हणजे कृष्णकमळ. ज्यांनी ते पाहिलं असेल त्यांना या शब्दाबरोबर नजर खिळवणारं त्याचं निळं-जांभळं रूप, नाजूक रेषांचा गेंदेदार आकार आणि भुरळ घालणारा गंध आठवेल. कृष्णाच्या व्यक्तिमत्वात जे जे आहे ते सर्व या कृष्णकमळात आहे. कोणाला बरं सुचला असेल हा शब्द?

फूल तेच पण मराठी बोलणाऱ्यातही त्याला बोल किती निरनिराळे! देशावर ज्याला सुपारीचं फूल म्हणतात त्याला कोकणात 'भुतांबी'. लालभडक जासवंदीला कानडी वळणाच्या मराठीत 'द्राशाळी' म्हणतात. सुकली तरी सुगंध न हरवणाऱ्या बकुळीचं नाव कालिदासानं सखीला दिलं. पण तीच बकुळ खानोलकर, दळवींच्या साहित्यात 'ओवळी' होते! इतक्या नाजूक, सुंदर फुलाला ओवळी बनवण्याचा सोवळेपणा कोणाचा बरं?

हस्तनक्षत्राच्या दिवसात फुलणाऱ्या फुलांना दक्षिण महाराष्ट्रात हादग्याची फुलं म्हणतात. त्यांची गुंफलेली माळ रोज हादग्याला (भोंडल्याला) वाहतात. इंदिरा संतांनी त्यांचाच शेला विणला आहे पण वेगळ्या नावानं.

'थंड गुलाबी कार्तिकातला,
हवाहवासा स्पर्श तयाचा
सुगंध त्याला नाजुक मादक,

अनुक्रमणिका

नव्या उमलत्या बूच फुलांचा.'

बेळगावातली ही बुचाची फुलं धारवाडात 'आकाशमोगरी' होऊन जीएंच्या लेखनात अवतरतात.

फुलांत मोडत नसला तरी गुलमोहोर आपण फुललेलाच मानतो. मे-फ्लॉवर या रुक्ष इंग्लिश नावाला एखाद्या बेगमेचं वाटेल असं हे पर्शियन नाव आलं कुठून? यवनांची गावांची नावं बदलली तशी झाडांचीही बदलली काय? तांबडालाल गुलमोहोर आणि पिवळाधम्म घोसांचा बहावा यांना ओडियात 'कृष्णचुडा' आणि 'राधाचुडा' अशी छान देशी नावं आहेत.

'घाणेरी' नावानं दोष तेवढा पकडण्याचा मराठीपणा आपण दाखवून दिला. हिन्दीत त्यालाच लाल-पिवळ्या रंगांमुळे 'सुहागफूल' हे समर्पक नाव दिलेलं काका कालेलकरांनी नोंदवलंय.

'तुमच्या भाषेत या फुलांना काय म्हणतात?' तंजावरला अबोलीचे गजरे घेताना मी शेजारच्या बाईला विचारलं. ती म्हणाली,

'कनकांबरा.'

'सुंदर नाव आहे.' मी म्हटलं, 'सोन्याची वस्त्रं ल्यायल्यासारखा रंग म्हणून कनकांबरा!'तिनं मराठी नाव विचारलं. अबोली हा शब्द समजल्यावर ती म्हणाली,

'हे जास्त अर्थपूर्ण आहे. सुगंध ही फुलांची बोली, तीच या फुलाला नाही!'

दोन घटकांचं आयुष्य असतं, पण त्या फुलालाही बोली हवी. आपण तर शंभर वर्षं जगण्याची उमेद बाळगून असतो!

अनुक्रमणिका

भ्र विरुद्ध ब्र

....

त्याच्याविरुद्ध ब्र काढायची सोय नाही किंवा कोणाची हिंमत नाही असे उद्‌गार आपल्या कानांवर सतत पडतात. त्यातला ब्र काढणे हा वाक्‌प्रचार परधार्जिणा आहे. ज्याच्याविरुध्द खरं म्हणजे बोलायला हवं त्याची तो पाठराखण करतो. ज्यानं बोलायचं त्याची मुस्कटदाबी करतो. मुळात ब्र हेच अक्षर का? ळ किंवा ढ काढायची सोय नाही असं का म्हणत नाहीत? त्यालाही कारण आहे. कितीही बोबडी वळली असली तरी भीतीनं ओठ थरथर कापताना माणूस ब्र - ब्र इतकं तरी उच्चारु शकतो. म्हणूनच संस्कृत ब्रूही म्हणजे बोलणे. पण तितकंही बोलायची मोकळीक नाही असा याचा अर्थ. बरं, याचं वाक्य नेहमी नकारार्थी. ‘मी जरूर या विरुद्ध ब्र काढीन. तूही ब्र काढ!’ अशी वाक्यं या वाक्‌प्रचाराची होत नाहीत. अजिबात, बिल्कुल, मुळीच, कधीही, या नंतर जसं हमखास नकारार्थी नाही येतं तशीच ब्रसाठी नकारघंटा वाजवावी लागते. शब्द आपल्यावर कशी सत्ता गाजवत असतात. ब्र काढायची सोय नाही हे आपल्या जिभेवर, विचारशक्तीवर इतकं बिंबलं आहे की जिथे बोंबाबोंब करायला हवी तिथंही आम्ही तोंडावाटे ब्र काढत नाही.

या वाक्‌प्रचाराचा प्रवाह बदलायची वेळ आता आली आहे. निदान ‘भ्र’ पुढेतरी आता ब्र काढायलाच हवा. ‘भ्र’ भ्रष्टाचाराचा हा आज मंत्र झाला आहे. टिळकांनी सर्वात आधी आपल्याला ‘स्व’ मिळवून दिला आणि स्व-स्वराज्याचा हे शिकवलं. गांधींनी अ-अहिंसेचा दिला. नेहरूनी श-शांतीचा दिला. आणि आता सर्वांनी सहकारानं भ्र-भ्रष्टाचाराचा दिला आहे. सुखराम शर्मांसारख्यांनी शरमेशी आपला औरस संबंध नाही हे सिद्ध केलंच, पण आपलं नावसुद्धा सार्थ केलं!

मलयाळम् भाषेत एक कोशकार होऊन गेला. जन्मभर तो प्राथमिक शिक्षक दरिद्रीच होता. आयुष्यात एक साधी छत्री घेणं काही त्याला जमलं नाही. कोशात ‘सुख’ या शब्दाच्या अर्थच्छटा लिहून झाल्यावर त्यानं अन्यत्र लिहिलं, ‘सुख या शब्दाबद्दल मी ऐकलं पण त्याचा चेहरा मी कधी पाहिला नाही.’ सुखराम शर्मांपुढे प्रत्येक भौतिक सुखानं रामअवतार घेतला. त्यांच्यापुढे ब्र न काढणे हा वाक्‌प्रचार आता बदलायला हवा. ब्र काढता येत नसेल तर भ, भा काहीही काढा, पण काढा !

अत्याचार निमूट सोसायला लावणारे वाक्‌प्रचार मराठीत थोडे नाहीत. आपण मारे ही लढवय्यांची भाषा वगैरे म्हणतो पण हूं की चूं न करणे मूग गिळून राहणे, तोंड दाबून बुक्क्यांचा मार, पाठीवर मारा पण पोटावर मारू नका, मान तुकवणे, जुवाखाली मान देणे, उखळात शिर देणे अशी यादी कितीतरी लांबेल. उलट प्रतिकारासाठी तोंड देणे, दोन हात करणे यासारखा एखाद-दुसराच वाक्‌प्रचार सापडतो. धैर्यासाठी वाक्‌प्रचारांचा ठणठणाट आहे. फार तर डोंगरासारखा, कड्यासारखा अशी उपमेची मदत घ्यावी लागते. तेच घाबरण्यासाठी कितीतरी वाक्‌प्रचार आहेत. ततपप करणे, बोबडी वळणे, पाचावर धारण बसणे, (पुरुषसुद्धा) गर्भगळित होणे, अवसान जाणे, पाय लटपटणे, डोळ्यांपुढे काजवे चमकणे, तोंडचे पाणी पळणे, पळता भुई थोडी होणे, दातखीळ बसणे असे आणखीही कितीतरी मिळतील. शेळपटपणासाठी असलेल्या ग्राम्य शब्दांची यादी अलाहिदा! यावरून स्पष्ट होणारी गोष्ट एकच की मराठी ही रणमर्दांची भाषा आहे हे विधान शंकास्पद आहे. पुरावे सांगतात की या भोषेत अन्याय सहन करणे, भिणे, घाबरून पळून जाणे यासाठीच शब्द जास्त आहेत. भाषेची इतकी धन आपल्या पराक्रमापोटी झाली असं नाही. जी गोष्ट भाषेत नाही ती जीवनात आहे असं कसं म्हणता येईल?

अनुक्रमणिका

तात्पर्य, आपल्या शब्दांची साक्ष आपल्या विरुद्ध जाते. आता साक्ष बदलायची तर शब्द फिरवायला हवेत. आपल्या विरुद्ध कोणी ब्र काढणार नाहीत या भ्रमात जे असतील त्यांच्या विरुद्ध अवश्य ब्र काढायला हवा.

अनुक्रमणिका

कोणाच्या पाठीवर

....

अलीकडेच एका पाठामुळे तेली समाजाच्या भावना दुखावल्या, म्हणजे कशाचंतरी राजकारण करायची कुवत असलेल्या काही म्होरक्यांच्या हाती काही निमित्त मिळालं आणि पुस्तकातून तो पाठ त्यांनी मुख्यमंत्र्यांना काढायला भाग पाडलं.

साधारणपणे भूगोलाच्या पुस्तकांवरून आणि नकाशांवरून वाद निर्माण होतात पण ते वरिष्ठ आंतरराष्ट्रीय पातळीव. चीन, पाक आपले वाढीव नकाशे छापतात आणि आपण सवयीनं छापील निषेध-खलिते त्यांना पाठवतो. स्थानिक वादासाठी मात्र इतिहास आणि प्रामुख्यानं भाषेच्या पाठ्य पुस्तकांचा आखाडा बनवला जातो.

मेकॉले साहेबांच्या काळापासून शाळांसाठी बुकं निघाली. त्यात गणित, विज्ञानामुळं गदारोळ उठल्याचं ऐकिवात नाही. गळक्या हौदांची, वाहणाऱ्या नळांची एवढी गणितं त्या पुस्तकांमधून होती पण त्यामुळे प्लंबरांच्या, गवंड्यांच्या भावना दुखावल्या जाऊन त्यांनी काळे झेंडे मिरवल्याचं पाहिलं नाही. विज्ञानात भाज्या-फळांच्या अस्वच्छतेची माहिती दिली म्हणून कोणी मंडई बंद ठेवली नाही. पण इतिहासाची आणि विशेषतः मराठीची पुस्तकं ही दुखरी, आंधळी बोटं झाली आहेत. पुनःपुन्हा ठेच त्यांनाच लागते.

भावना दुखावून घेणारे समाज ही एक विचित्र गोष्ट आहे. लेखनावर जातीयवादी शिक्का मारणारे हे लोक जातीला समाज असं नाव देऊन त्याच झेंड्याखाली विरोधासाठी एकत्र येतात. निवडलेला उतारा संतवाणीतला असला तरी तो त्यांच्या लेखी हिंसक असतो. इसवीसनही जन्माला आले नव्हते तेव्हापासून कुंभार कुंभ घडवत आले. मग त्यांचा 'कुंभार' हा उल्लेख जातिवाचक कसा होईल? कबीरासारखा एखादा परभाषीय अपवाद सोडला तर चौदाव्या शतकात विविध जातींच्या संतमंडळानं केलेली काव्यरचना हा भाषेच्या दृष्टीनं अभिमानाचा विषय व्हायला हवा. देवापुढं संतांनी जात लपवली नाही, शब्दांपुढंही नाही. 'आम्ही वारीक वारीक करू हजामत बारीक', 'देवा तुझा मी सोनार, तुझे नामाचा व्यवहार' असा तो खुला प्रपंच आहे. 'मन बुद्धीची कातरी, राम नाम सोने चोरी' हे सांगायला नरहरी कचरत नाही. हा निकोपपणा आपण समजून घेतला पाहिजे. जातीच्या नुसत्या उच्चारानं ज्यांना शकां येतात त्यांनी तुकाराम अवश्य वाचावा. 'जातीचे हे वाणी' असं निस्संगपणे विठ्ठलासमोर उभा राहून तो सांगतो. आपली किंवा दुसऱ्याची जात न चोरता तुकारामनं वैष्णवांचा धर्म स्थापन केला.

साहित्यात आढळणाऱ्या काही उल्लेखांना तात्कालिन संदर्भ असतात हे आपण विसरतो. मी सूतपुत्राला वरणार नाही हे द्रौपदीचे उद्‌गार कितीही अवमानकारक असले तरी ते आजच्या मोटारचालकाला किंवा मेकॅनिकला लागायचं काही कारण नाही. साहित्य जेव्हा स्थलकालाच्या सीमा ओलांडतं तेव्हा असले कालबद्ध निर्देश तळाशी बसतात. ते धोपटण्यासाठी ऊठसूट दंडुके बाहेर काढले म्हणजे आपण सांस्कृतिकदृष्ट्या फार पुढे गेलो असं सिद्ध होतं का? मग भीष्माशी सौदा करणारा धीवर होता म्हणून समस्त कोळ्यांनी महाभारत समुद्रात बुडवायला हवं. सीतेची निंदा धोब्यानं केली म्हणून धोब्यांनी रामायणकर्त्याच्या तोंडाला डांबर फासायला हवं. फार काय मर्चन्ट ऑफ व्हेनिसमधल्या शायलॉकसाठी समस्त ज्यूंनी शेक्सपियर वाचणाऱ्यांची कत्तल करायला हवी.

अनुक्रमणिका

माणूस लिहायला लागला तो इतिहास इ. स. पूर्व तीन हजार वर्षांइतका जुना आहे. इतक्या वर्षात साहित्यातले शाश्वत काय नि अशाश्वत काय हे जर आपल्याला निवडता येत नसेल तर या साक्षरतेला अर्थ काय उरला?

जिवंत भाषा ही नदीच्या वाहत्या प्रवाहासारखी असते. पडणारा केरकचरा काठावर फेकत पुढे जाण्याची तिची उपजत प्रवृत्ती असते. भाषेची पाठ्यपुस्तकं तयार करताना विचार फक्त भाषेचाच असावा. पाणी गढूळ करण्यासाठी कसलंतरी माजवण टाकणाऱ्या लोकांना पाठ्यपुस्तकांनी दूरच ठेवलं पाहिजे. प्रत्येकानं आपल्या संकुचित विचारांची गाठोडी पुस्तकांवर लादायची असं ठरवलं तर पाठ्यपुस्तकाची व्याख्या केवळ पाठीवर वाहायची पुस्तकं एवढीच राहील.

भाषागंगेंत दूषित प्रवाह सोडणारे हे नाले कोण बंद करणार?

अनुक्रमणिका

राजश्रिया विराजित

....

आपल्या हातात पडलेला नेमणुकीचा आदेश वाचून एक मराठी तरुण चक्रावला आहे. मजकूर असा आहे,

'या उमेदवारास लघुलेखक (निम्नश्रेणी) या ओपन पदावर प्रथमतः एक वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीसाठी व त्यानंतर तीन वर्षे संविधानात्मक करार पद्धतीने नियुक्त करावे.' यावरून आपल्याला नोकरी मिळाली आहे एवढाच बोध त्याला झाला. त्यातल्या त्यात दिलासा ओपन या इंग्रजी शब्दाचा. कारण तो चटकन समजतो. थोडक्यात लघुलेखक म्हणून आपल्याला कोणत्या प्रकारचं मराठी लिहावाचायचं आहे याचा झटका त्याला मिळाला.

इंग्रजीच्या जागी प्रशासनात प्रादेशिक भाषा आणण्याचा अभिनिवेश स्तुत्यच. पण अभिभाषण, अभिस्वीकृती, अभिलेख, अभ्यर्थता, अभिरंजन अशी माळ कुठे घेऊन जाईल हे सांगता येत नाही. भाषा प्रतिष्ठित दिसावी आणि एका शब्दासोबत अनेक शब्द बनवता यावेत या दृष्टीनं संस्कृतचा आश्रय घेतला गेला पण त्यातला अतिरेक कोणाच्या लक्षात आला नाही. धनगरांसाठी, शेतकऱ्यांसाठी तयार करायच्या माहितीतही केवळ संस्कृत कोशातच शोधावे लागतील अशा शब्दांची भरती झाली. परिणामी मूळ इंग्रजी शब्द कळतो पण मराठी (?) शब्द बुचकळ्यात पाडतो ही स्थिती आहे. सेन्सॉर - अभ्यवेक्षकः; कोलॅटरल- सांपार्श्विक; फ्रीफिशिंग – मुक्तमत्स्यग्रहणाधिकार; इलस्ट्रैटिव्ह- विशदीकरणात्मक; एजन्ट - अभिकर्ता; शॉर्ट सर्किट लघु परिपथ; वेस्ट वेअर - उत्प्लवबांध; रेक्लमेशन - पुनःप्रापण; ऑथेनिकेशन - अधिप्रमाणन; ॲप्रोचेबल उपागम्य; असे शब्द शासकीय कोशात जागोजागी सापडतात. निवृत्तिवेतनार्ह वेतन म्हणजे काय हे आधी विचारावं लागतं. पेन्शनेबल पे ऐकल्यावर ते समजतं.

अशा योजनेसाठी शब्दांची टांकसाळ खोलावी लागते, ते शब्द लोकांच्या गळी उतरवावे लागतात हे खरं आहे. पण त्यामागे दृष्टी हवी.

कल्चरला भारतीय शब्द रवीन्द्रनाथांना हवा होता. तो आपल्या इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांनी 'संस्कृती' म्हणून दिला होता. रेडिओची 'आकाशवाणी' हिन्दीतले सुप्रसिद्ध कवी सुमित्रानन्दन पन्त यांच्या प्रतिभेतून झाली. मेयरचा 'महापौर' स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केला नि तो तळागाळात पोहोचला. रोजची वर्तमानपत्रं असे कितीतरी शब्द रुळवत असतात.साहेबाचा सोवळ्यातला खेळ क्रिकेट, त्याचं मराठीकरण किती झपाट्यानं झालं.

फार दूर कशाला, शिवाजी महाराजांनी अखंडलक्ष्मीअलंकृत राजश्रिया विराजित म्हणून पत्रं मराठीत लिहायला सुरवात केली. 'राज्यव्यवहारकोश' करून घेतला. फारसी शब्द दिसला की ठेच असंही केलं नाही. पण एकूण भाषाव्यवहार उभयतांना समजाणारा होता. 'घर अलंगा करुनु द्याल त्या पावसानें आजार न पावे असा करुनु देणे. नाहींतरी सजवज करुनु द्याल.'. 'या उपरि रयतेस कोणी जेवा, तुप, कोंबडें मागो नयें.' हे प्रशासकीय मराठी कोण म्हणेल? याचं कारण म्हणजे स्वतः राजा मावळ्यांची भाषा बोलत होता. संतवाणी ऐकत होता. राजे जहागीरदार पुत्रांमध्ये मिसळत नाहीत ही त्यांच्याविषयी तक्रार होती. आजचे राजपुत्र थंड हवेत शिकतात. लोकांची भाषा त्यांच्या कानांवरही पडत नाही.

अनुक्रमणिका

शिवकालीन मराठी पेशवाईतही चालू राहिली. खाजगी पत्रात किंवा दप्तरात अनेक ठिकाणी मार्मिक भाषा दिसते. 'लोक करकचले. हिरमोड होऊन काम थंडावले अन्यथा वसई होती व फिरंगी आगीचा पुतळा होता.' हे चिमाजी अप्पाचे शब्द किंवा 'आमचे दौलतीच्या तणावा तुटत चालल्या होत्या' ही माधवरावांची व्यथा भाषेमुळेच मनाला भिडते. ज्यांच्यासाठी लिहायचं त्यांना समजलं पाहिजे हे लोकशाहीत सांगायची गरज का पडावी? देवानां प्रिय प्रियदर्शी सम्राट अशोकाचे शिलालेख विस्तीर्ण भागात सापडले. त्या सर्वांची भाषा एकाच छापील स्वरूपाची नाही. तिच्यात प्रादेशिक भेद आहेत.

इंग्लंडच्या प्रधानमंत्री मार्गारिट थॅचरनी 'मला सचिव काय म्हणतात ते नको, लोक काय म्हणतात ते समजलं पाहिजे!' असं म्हणून फायली परत पाठवल्या होत्या.

तीनशे वर्षांची भाषिक गुलामगिरी छत्रपतींनी तोडली. मधल्या दीडशे वर्षांच्या इंग्रजी बेड्यांमधून आपण कधी मुक्त होणार? मराठी भाषेचा मराठी शिवाजी पुनःकधी घडणार?

अनुक्रमणिका

मावशी उरो-

माझ्या सुंदरीचं लगीन,
वऱ्हाडी कोण कोण येणार?
बाप म्हणे मी बाप, देईन हुंडा लाख…
माझ्या सुंदरीचं लगीन…
आई म्हणे मी आई, करीन मांडवात घाई…
चुलता म्हणे मी चुलता, करीन मांडव परता …
चुलती म्हणे मी चुलती, येईन चोळीपुरती …
मामा म्हणे मी मामा, येईन कामाधामा …
मावशी म्हणे मी मावशी, पुरविन सगळ्या हौशी …

असं एक जुनं गाणं होतं. बऱ्याच नातेवाईकांची माळ अशी सुंदरीच्या लग्नाला चालली होती.

आता आजूबाजूला कान दिला तर नात्यांवरही इंग्रजीचा वरवंटा फिरतोय. समर्थांनी 'बापासी बाप न म्हणे तो मूर्ख' म्हटलं. बापाला बाप आपणही म्हणत नव्हतो. पण आता ऐकावं तिकडे आता ओठाओठावर लारीलप्पा लारीलप्पाच्या चालीवर ओठाओठावर मम्मी-पप्पा. थोड्या फार फरकानं पापा, ममा किंवा मुलं मॉड असतील तर पॉप्स्, मॉम्स्! आई-बाबा, पप्पा-मम्मी, पापा-ममा, पॉप्स्-मॉम्स् हे खरं तर चढते सामाजिक वर्ग झालेत. आधुनिकात मोडण्यासाठी मुलांना हट्टानं पप्पा-मम्मी म्हणायला लावणारे निरक्षर पालकही दिसतात. अशा एका चिडलेल्या मुलानं गर्दीत 'ये मम्येऽ' अशी हाक मारलेली मी ऐकली होती.

कशासाठी हा अट्टाहास? आपण पारतंत्र्यात होतो तरी आपल्या आई-बाबांना धक्का लागला नव्हता. स्वातंत्र्य मिळालं आणि आमचे आई-बाप पप्पा-मम्मी झाले. ज्या गोष्टी इथं नव्हत्या, बाहेरून आल्या त्यांना शब्दही बाहेरचे येणार हे रास्त आहे. मिक्सर तो मिक्सर आणि बल्बही बल्बच. पण आई-बाबा? इंग्रजांशी ओळख होण्यापूर्वी आपण काय बिना आईबापांचे होतो? आई-बाबा म्हणणं काहींना जुनाट वाटतं. पण मराठीचा जन्म आठव्या शतकातला तर इंग्लिशचा त्याआधीचा. मग जुनाट काय?

या पप्पा-मम्मीनं आई-बाप मोडीत काढले नि काका-मावश्यांवर एक 'अंकलआंटी' चा सार्वजनिक शिक्का मारला. आधीच एक-दोन मुलांच्या जमान्यात चुलत दीर, मावस काका आपोआप रोडावत गेले. यातल्या प्रत्येक नात्याला प्रेमाचा एक वेगळा रंग आहे. काकाएवढा हक्काचा कोणीच नसतो. 'मामाच्या गावाला जाऊया' ही ओढ अंकलमध्ये कशी असेल? 'मावळण तशी भाची' म्हणताच मागच्या पिढीच्या माहेरवाशिणीला पुढची माहेवाशीण जोडली जाते.

आताशा बायका सासरच्यांचीही नावं टाकायला लागल्या. मामंजी, वन्स कानांवर पडून वर्षं लोटली. सासूबाईंची अगोदर 'अहो आई' झाली नि आता मम्मी! सासूला अहो आई म्हणणारी पहिली सून मोठी धूर्त असली पाहिजे. म्हणजे आई म्हणून साखरपेरणी आणि अहोनं अंतर! 'सासू म्हनता म्हनता गेला तोंडाडून वारा, अन् माय म्हनता म्हनता होठ होठालागी भिडे' हा फरक बहिणाईच जाणे.

नात्याचे शब्द आणि त्यांच्या हाकांच्या बाबतीत इंग्रजीपेक्षा मराठीसह साऱ्याच भारतीय भाषा खूप समृद्ध आहेत. सिंधीत नातेवाचक शब्द सर्वात जास्त म्हणजे 74 आहेत. चुलत भाऊ, मावस भाऊ, आते

भाऊ, पुतण्या यांना सौटु, मासानु, फुफाटु, डेरटु असे एकेक सुटे शब्द या भाषेत आहेत. आता इंग्रजीचा खराटा या शब्दांवरही फिरतोय. कुटुंब एकत्रची विभक्त आणि आता मायक्रो व्हायला लागली. त्यांचा परिणाम भाषेवरही दिसायला लागला. नातेवाईकच दुरावले तर हाकातरी कोणाला मारायच्या?

आपल्यांची ही कथी तर परक्यांना कोण विचारतो? ओळखीच्या किंवा अनोखळी स्त्रीपुरुषांना कसं संबोधताता ते पहावं. सोपानदेवांचे मित्र त्यांच्या आईला 'बहिणामाय' म्हणायचे. मित्राची आई ती आंटी नव्हे, तीही मायच. जपानीत ओकासान, ओतोसान अशी आई-वडलांना हाक मारतात. परकाही त्याच शब्दांनी विचारपूस करतो. आपल्या आई-वडलांचा उल्लेखमात्र हाहा-चीची असा करायचा. हे बारकावे ते कटाक्षानं जपतात. भारतीय भाषांची समानता अशी की असमिपासून गुजरातीपर्यंत अनोळखी बाईला मावशीच म्हणतात. म्हणूनतर पुतना मावशी. आंटी जाऊन हरेकांची मावशी उरो, कारण मायबोली जिवंत असल्याची ती खूण आहे.

अनुक्रमणिका

खात्यापित्यांची भाषा

....

'में एक बिलाडी पाळी छे, ते रंगे वहु रूपाळी छे.' असं एक गुजराती बालगीत कानांवर पडलं. पाळलेल्या मनीचं ते वर्णन होतं. तिच्या आवडीत 'घीतो चपचप चाटी जाए-' वाचून मी चकित झाले. मुळात मांजर तूप खातं हेच मला माहीत नव्हतं. हे मराठीत म्हटलं तर विचित्र, असंभव वाटतं. मराठी मांजरांना फार तर सांडलेलं दूध लपलप प्यायला मिळतं. दोन भाषांमधले असे समांतर उद्‌गार शोधायला गेलं की भाषेची सगळी मुळं नि पारंब्यांसुध्दा समाजाच्या प्रत्यक्ष जीवनात कशा घट्ट रुजलेल्या असतात याची कल्पना येते.

गुजरातीत कशाला, हिन्दीवालेही चांगली खात्यापित्यांची भाषा बोलतात. तुझ्या तोंडात साखर पडो असं आपण म्हणतो, पण त्यांच्याकडे नुसती साखर नाही तर घी-शक्कर. नववधूला आशीर्वाद 'दूधो नहाओ, पूतो, फलो!' असा. आपण दुधानं अंघोळ कर अशी वाचेनंही उधळमाधळ करत नाही. 'मन ही मन में लड्डू फूटे' ऐवजी मराठीत काय फुटतात तर 'उकळ्या', कशाच्या? देव जाणे! 'पाँचो उँगलियाँ घी में' साठी आपण म्हणून म्हणून काय म्हणणार? मजा आहे, चंगळ आहे! पाची बोटं तुपात बुडतील असं माप आपल्याकडे मुदलातच नाही तर भाषेत कुठून येणार?

गुजराती संभाषणांतून असं गोडधोड कानांवर पडत असताना लक्षात आलं की ही समृद्ध प्रदेशाची भाषा आहे. सुपीक जमिनीमुळे दुधा-तुपाच्या नद्या वाहणाऱ्या प्रदेशातले लोक खाण्यापिण्याचे शौकीन आहेत. वऱ्हाडाला खिचडीत वाढलेलं तूप वाहत जाऊन थिजलेल्या तुपानं नाले पांढरे झाले तरच ते 'वाढणं' असं मानणारे हे लोक. गोविंदप्रभूंच्या विवाहातही 'साचोकारे तुपे पन्हीवे वाहावीले' असा उल्लेख आढळतो. दोन फ्रेंच मद्याविषयी बोलताना, दोन सारस्वत मत्स्यपुराण लावताना, तशा दोन गुजराती प्राध्यापिकाही काहीतरी 'खावानी बहु मजा आवी' चा रुळ सोडत नाहीत.

खाण्यापिण्याबाबत खरं तर महाराष्ट्र दरिद्रीचं. गावाकडे माणसं 'भाकर खाल्ली का?', 'पेज पियालास रे?' अशी विचारपूस करतात. त्यात दुधा-तुपाचा लेश नाही. कशाचंही माप कोकणात नखभर आणि देशावर थेंबभर. गुर्जर हात असा आखडता नाही. आपण आगीत तेल ओततो पण गुजरातीत बळतामां (जळत्यात) घी होमतात. आपण एखाद्याला गोत्यात आणू पण तिथे पेचमां लेववुंसुद्धा रेवडी ना! आपला देशच दगडांचा. त्यामुळे आपले दोन्ही डगरींवर पाय. गुर्जर बंधूंचे मात्र 'दूध अने दहीमां पग'. दह्यादुधात बोट बुडवणं कितीतरी मराठ्यांना दुरापास्त. तिथे पाय बुडवणं कसं शक्य आहे? आमिष म्हणून आपण फार तर गाजर दाखवू, उलट हे सधन लोक लाडू-लापसी पिरसतील. साक्षरतेसंबंधात एक वाक्य आहे, 'जे वांचे चोपडी (पुस्तक) ते चोपडी (चार पदरी चपाती) चोपडी (तुपानं चोपडून) खाय!' थोडक्यात विद्या मिळवायची तीही तुपासाठी.

या भाषेतल्या वाक्प्रचारात खांड, गोळ, माखण, गोळपापडी, लापशी, लाडवा, मलीदो, कढी अशी खाण्यापिण्याची रेलचेल आहे. नुकसान झालं तेही फायदेशीर झालं असं म्हणायचं झालं तर 'घी ढळ्युं तो पण खिचडीमां' म्हणतात. याच्या जवळपास येणारा एकही वाक्प्रचार मराठीत नाही.

दुधापासून तर किती शब्द घडले. दूध अने डांग बन्ने राखवां, दूधमां एरियो (दुधात मिठाचा खडा), पैसा दुधे धोईने आपवुं (प्रामाणिकपणे परत करणे), दूधे मेह बरसवां (दुधाचा पाऊस पडणे)

अनुक्रमणिका

या सर्वांच्या बरोबरीनं दुधात पाल पडावी असा एक वाक्प्रचार गुजरातीत आहे,तो म्हणजे ‘दूधपीती करवुं.’ याचा अर्थ तान्ह्या मुलीला दुधात नाक-तोंड बुडवून घुसमटून मारणे. हुंड्याच्या भयानं मुलीला जन्मल्याबरोबर मारण्याची रूढी होती, हे ऐकून आपल्या अंगावर काटा येतो. असलं विषारी दूध मराठीत आलं नाही हे आगरकर आणि सावित्रीबाई फुल्यांचे उपकार म्हणायचे.

सुदाम्याच्या पोह्यांसाठी द्वारकेचा कृष्ण अपूर्वाईनं धावला यामागे मित्रप्रेम आहे असं कोणी म्हणोत. मला वाटतं, मिठाया पक्वान्नांची तोंडाला मिठी बसली म्हणून तो धावला! इंद्राला ताक दुर्लभ, दुसरं काय!

अनुक्रमणिका

उचलली जीभ....

....

'मग काय सुनील, जेवणाचं काय करतोस?' शिक्षण संपवून पहिल्याच नोकरीच्या गावी गेलेल्या बावीस वर्षाच्या सुनीलची त्याचे मोठे मेहुणे चौकशी करत होते.

'बाई ठेवली की!' त्याचं तत्पर उत्तर.

त्याच्या उत्तरानं मेहुणे उडालेच! असं घडलेलं आपण अनेकदा पाहतो. उत्तर देण्याच्या घाईत मागचा पुढचा विचार न करता आपण जीभ उचलतो आणि लावतो टाळ्याला. नोकरीवर रुजू झाल्या दिवशी तिथले कार्यवाही शिपायाला म्हणाले, 'जा रे, बाईंना त्यांची जागा दाखव!' पहिल्याच दिवशी आपल्याला अशी जागा दाखवली जाईल याची मी अपेक्षा केली नव्हती. एका वयोवृद्ध इतिहासाकारांना राष्ट्रीय पुरस्कार दिल्याची घोषणा दूरदर्शनवर हिन्दी समाचारमध्ये झाली. ती ऐकून त्यांची नात सांगत सुटली की, अजोबांना एक लाख रुपये आणि अंगवस्त्र देणार आहेत! हिन्दी अंगवस्त्राचा मराठी अर्थ इंग्लिश माध्यमात शिकणाऱ्या त्या चिमुरडीला काय माहीत?

ही सगळी उदाहरणं पाहताना एक गोष्ट लक्षात येते की, बोलणाऱ्याच्या मनात तो अर्थ नाही. पण ऐकेल त्याला मात्र वेगळाच अर्थ पोचतो. विशेषतः दोन अर्थ होत असतील तिथे हा धोका जास्त संभवतो. फार कशाला, एखादा माणूस कुठे गेला हे न सांगता,निसटतं 'ते गेले' एवढंच सांगितलं तरी समोरच्याच्या तोंडावर प्रश्नचिन्ह दिसतं. हळहळत तो विचारतो, 'कसे? कधी?' ओंकारेश्वर, वैकुंठ हे शब्द अगदी पत्ता सांगण्यासाठी उच्चारतानाही ऐकणारा भलता अर्थ घेणार नाही याचा काळजी घ्यावी लागते.

काही वेळा माणसं त्या शब्दाच्या मूळ अर्थाकडे ठार दुर्लक्ष करूनच बोलतात. 'काय हा माझा गलथानपणा!' असं स्वतःवर चिडत पण वडीलधाऱ्यांसोर बोलणाऱ्या बाईचं लक्ष मूळ शब्दाकडे नसतं. शिव्या किंवा अपशब्द सोडून दिले तरी सभ्यपणे उच्चारलेल्या शब्दांचा अर्थही 'अश्लील' किंवा 'अशुभ' होऊ शकतो हे बोलताना लक्षात येत नाही.

चपला एका बाजूनं झिजल्या म्हणून 'तिचं पाऊल वाकडं पडतं' म्हणता येत नाही. बाहेर बूटमोजे आणि घरात सपाता घालून वावरतो म्हणून एखाद्याचे पाय पांढरे स्वच्छ असतील. पण त्याचा उल्लेख 'पांढऱ्या पायाचा' असा करून कसं चालेल?

कधी आपलं बोलणं संभावित, शोभिवंत दिसावं म्हणून संस्कृत शब्द वापरण्याची काहींना उबळ येते. एका बाईंच्या व्याख्यानाआधी त्यांची ओळख करून दिल्यावर 'आता आपण सर्वजण त्यांच्या अधरामृतपानासाठी उत्सुक झाला असाल ..' असं संबंधित वक्ता म्हणाला. दुर्दैवानं बाईंचा नवरा व्यासपीठावरच हजर! बिचाऱ्याची काय अवस्था झाली असेल?

बोलण्यापेक्षा थोडा अधिक विचार माणूस लिहिताना करतो असं आपण मानतो. लेखकाचा मजकूर पक्का मसुदा करण्यापूर्वी पुनः पुन्हा लिहिलेला असतो. छपाईच्या वेळी तो अनेकांच्या नजरेखालून जातो. तरीही काही वेळा अनवधानाचा बळी ठरलेलं लेखन अचानक नजरेसमोर येतं. एका विदुषी प्राध्यापिकेबद्दल लिहिताना याच महिन्यात एकानं लिहिलं होतं, 'स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीडपणा त्यांच्या अंगी ठायी ठायी

असल्याचे त्यांच्या बोलण्यातून जाणवते,' आता त्यांच्या अंगी ठायी ठायी म्हणजे नक्की कुठे असं विचारलं तर अनवस्था प्रसंग येईल! ते आहे 'ठायी ठायी जाणवणे'. पण सुटलं ते विचाराचं अवधान. कधी अनवधान तर कधी अज्ञान. त्याच लेखात, 'स्वातंत्र्याची मूल्ये तत्कालीन समाजाच्या विणेत दिसत नव्हती' असं एक वाक्य होतं. कापडाची वीण आणि डुकराची वीण हे दोन्ही शब्द सारखेच दिसले तरी प्रत्यय लावण्यापूर्वी पहिल्या शब्दाचं रूप 'विणीचं' आणि दुसऱ्या शब्दाचं रूप 'विणेचं' हे माहीत नसल्यामुळे अर्थ विनाकारण भलतीकडे गेला.

आपण अपघात टाळण्यासाठी विजेची बटणं लहान मुलांचा हात पोहोचणार नाही अशी उंचावर ठेवतो. ईश्वरानंही जिभेची खरी कळ अशी उंच जागी म्हणजे मेंदूत बसवली. लिहिण्याच्या हातापासून ती आणखी दूर ठेवली. कारण जी जाणती माणसं विजेची बटणं हाताळतात ती सुरक्षिततेचं भान ठेवतात असं आपण गृहीत धरतो.

अनुक्रमणिका

न भिजणारा तिळ

....

शशाप च महातेजाः सर्वलोकेषु च स्त्रियः।
न गुह्यं धारयिष्यान्ति दुःख समन्वितः ॥

महाभारताच्या अखेरी धर्मराजा आपल्या पितरांना तर्पण करत असताना 'कर्ण तुझा थोरला भाऊ होता, त्यालाही तू तर्पण कर!' असं कुंतीनं प्रथमच सांगितलं. महासंहार झाला तरी कर्णजन्माच्या रहस्यावर लावलेली मौनाची मोहोर तिनं तोडली नव्हती. जन्मभर ज्याला आपला अधिकार मिळाला नाही त्याला मरणानंतर काही देणं नशिबी आलं या विचारानं युधिष्ठिर शोकव्याकुल झाला आणि त्यानं आईसह अवघ्या स्त्रीजातीला शाप दिला, 'यापुढे जगभर कुठेही, कसलंही रहस्य स्त्रिया लपवून ठेवू शकणार नाहीत!' संस्कृतातली ही शापवाणी मराठीत 'बायकांच्या तोंडात तीळ भिजणार नाही' या रूपात अवतरली.

बायांच्या उतावीळपणाचं दर्शन पुरीच्या जगन्नाथाविषयी असलेल्या एका दंतकथेत होतं. हे मंदिर बांधलं जात होतं तेव्हा 'महोदधी' च्या समुद्रकिनाऱ्यावर एक मोठा ओंडका वहात आला. राजा इंद्रद्युम्नाला स्वप्नात दृष्टान्त झाला की 'या ओंडक्यापासून माझी मूर्ती घडव आणि तिची प्राणप्रतिष्ठा कर!' ताबडतोब राजाज्ञा सुटल्या आणि काष्ठशिल्पीचा शोध सुरू झाला. साक्षात् विश्वकर्मा म्हाताऱ्याचं सोंग घेऊन हे काम करायला अवतरला. हो ना करता करता हे काम त्याच्यावर सोपवलं गेलं. पण म्हाताऱ्यानं एक अट घातली. 'एकवीस दिवस माझं दालन पूर्ण बंद राहिलं पाहिजे!'त्याचं काम सुरू झालं. राणी गुंडिचादेवी रोज बाहेरून कानोसा घ्यायची, पण आतून कसलाच आवाज येत नव्हता. अखेर चौदाव्या दिवशी तिचा धीर संपला आणि तिनं दार उघडायला लावलं. विश्वकर्मा अंतर्धान पावला आणि तिच्यासमोर अर्धवट घडवलेल्या जगन्नाथ, बलभद्र, सुभद्रेच्या मूर्ती पडल्या होत्या. या जगन्नाथाला हात, पाय, कान काहीही नव्हतं. धडावर चेहरा आणि मोठे वाटोळे डोळे. देवाच्या सुबक मूर्तीपेक्षा 'बड ठाकूर'चं रूप अतिशय वेगळं. 'माझे नृसिंहत्व लेणे जेयाजिये महिमे' असं ज्ञानेश्वरीत एक वचन आहे. भक्तीमुळे नरसिंहाच्या भीषण अवताराला देवत्व प्राप्त झालं. गुंडिचादेवीमुळे अपंग मानवी देहाला जगन्नायकत्व मिळालं.

धर्मराजाच्या शापापासून बायकांवर वाचाळपणाचा शिक्का बसला. त्यांच्या या अवगुणाची सतत निंदा होत आली. पण अचानक त्याचा एक ठळक फायदा नजरेस आला. सर रिचर्ड बर्टन हा बहुभाषाविद ब्रिटिश अमदानीत होऊन गेला. त्याला पंचवीस भाषा आणि पंधरा बोली उत्तम अवगत होत्या. एक ऑस्ट्रेलिया सोडल्यास पृथ्वी पायाखाली घातलेल्या ह्या माणसानं 'अरेबियन नाइटस्' या सुरस आणि चमत्कारिक कथा प्रथम जगापुढे आणल्या. मक्केच्या यात्रेकरूंमध्ये सामील होऊन कोणालाही कळू न देता थेट दर्शन घेऊन येण्याइतकं त्याचं अरबी भाषेवर प्रभुत्व होतं. त्यानं लिहून ठेवलं आहे की भाषा शिकण्यासाठी पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक चांगल्या. त्यातही वेश्यांकडून भाषा उत्तम शिकता येते. पन्नास भाषा शिकण्याचा अनुभव गाठीला असलेल्याचं मत खरं मानलंच पाहिजे. ब्रिटिशांनी भाषा शिक्षणाचे वर्ग चालवण्याचं काम पण्यांगनांना दिलं नव्हतं हे उघड आहे. सरसाहेबही सदर स्त्रियांकडे जाताना भाषा शिकण्याच्या हेतूनं गेले नसावेत. कारण त्यांच्या ग्रंथसंपदेत वात्स्यायनाच्या कामसूत्राचं भाषांतरही समाविष्ट आहे. त्यांच्यावर गैरवर्तनाचा आरोप होऊ नये म्हणून त्यांच्या पत्नीनं काही हस्तलिखितं जाळून टाकली होती. अशा साहेबमजकुरांना ज्या वारांगनांनी भाषा शिकवून पंडित केलं, त्या धन्य होत!

परक्याला भाषा शिकवण्यासाठी भाषेचं उत्तम ज्ञान आणि तिच्या विज्ञानाचीही जाणकारी असावी लागते. शिवाय विद्यार्थ्याला भाषा उत्तम येण्यासाठी गुरुशिष्यांमध्ये अनौपचारिक, खेळीमेळीचं नातं असावं

अनुक्रमणिका

लागतं. पदार्थविज्ञानासारख्या विषयासाठी ते असलंच पाहिजे असं नाही. मुख्य म्हणजे भाषाशिक्षक चांगला बोलका असावा लागतो. घुम्या भाषा काय शिकवणार?

आपल्या वाक्चातुर्यानं ज्या ललनांनी सर रिचर्ड बर्टनसारखा भाषाविद् तयार केला त्या सर्व नगरवधू उत्कृष्ट भाषाशिक्षिका म्हणून मला वंदनीय आहेत.

अनुक्रमणिका

आड येणारी नावं

....

'महाराष्ट्र में हर एक के पीछे 'कर' क्यों लगाते हैं? बताइए!' बरीच मराठी आडनावं करान्त असतात त्यासाठी हा प्रश्न होता. मूळ गावावरून 'त्या गावचे' या अर्थानं कुलनाम पडण्याची पद्धत खरी दाक्षिणात्यांची. आडनावावरून उत्तर आणि दक्षिण भारत असे सरळसरळ आडवे दोन भाग पडतात. दक्षिणेत नाव पूर्ण आणि आद्याक्षरातलं मूळ गावाचं नाव आडनावासारखं मानायचं. त्यामुळे व्ही. एन. गाडगीळ आणि टी. एन. शेषन यांच्या इंग्रजी आद्याक्षरांचा अर्थ एक नाही.

उत्तरेत गोरखपुरी, देहलवी असे अपवाद वगळता जात, धंदा, उपाधी वगैरेंना आडनावात जास्त महत्त्व.द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी आडनावांचे बरेच निर्वेदी तिकडे भेटतात. ब्रिटिशांनी पायघोळ बंगाली आडनावांचे संकोच केले. बंधोपाध्यायचं बॅनर्जी, मुखोपाध्यायचं मुखर्जी झालं. त्यावर चॅटर-जी, मुकर-जी अशा कोपरखळ्याही आल्या. तरी साहेब आगरकर - सावरकरांचे आगर्जी, सावर्जी करायला टरकला हेच खरं. त्याला ठाच्या उच्चारातला ठोही येत नसल्यामुळे रवींद्रनाथ ठाकूर टागोर झाले. म्हणून नंतर गांधी, नेहरू, बोस, पटेल अशा सोप्या आडनावांचे पुढारी झाले.

आडनावांमध्ये भारतीय विविधतेचे रंग दिसतात. एकेका प्रांतात एकेकाची चलती असते. असममध्ये सैकिया डेका, ओरिसात पट्टनायक, महंती, आंध्रांत राव, रेड्डी. हिन्दीत तर सक्सेना इतकं सक्सेसफुल की दर हिन्दी चित्रपटाचा नायक सक्सेना. सिंधी आडनावाला 'णी'चं झाकण तर पारश्यांना 'वाला'चं सील. बाटलीवाला, घीवाला हे असले उद्योग करण्यापूर्वी कोण होते बरं?

मराठी आडनावांमध्ये काय नाही ते विचारा! केवळ गंधर्वांनाच शोभेल असं राजहंस किंवा मनोहर, देखणे अशी देवगणाची आडनावं अगदीच विरळा. बाकी देव, संतच्या बरोबरीनं चोर, आगलावे आहेत.. राजे, प्रधान, मंत्री आहेत तसे ससे, कोल्हे, लांडगेही आहेत. नुसते फुलेच का म्हणून? भोपळे, पडवळांचीही हजेरी आहे. खोकले, हगवणे या शरीराच्या व्याधी आणि दर्प, उत्पात असे भावनिक आक्रमण अनेकांना कायमचं चिकटलं आहे. त्यातून काळे, गोरे रंग सुटले नाहीत. (प्रत्यक्षात त्यांचा माणसांशी छत्तीसचा आकडा). कावळे, घारेपासून तांबे, पितळे, लोखंडे कशाचंही आपण धरून आडनाव घडवलं. इथे हिन्दी लेले आणि मराठी नेने एकाच गटात सापडतात. आपण पोटदुखे, डोईफोडे असल्याची जाहीर कबुली असते. कधी कोणा मूळ पुरुषाची कर्तबगारी पाचपुते, सातपुते, बारपुते होऊन वंशजांना चिकटते. सर्वात जोखमीचं आडनाव सहस्रबुद्धे. स्वतःला सहस्रबुद्धे म्हणवून घ्यायची हिम्मत आपल्यात नाही.

असे हे आडनाव सुरू झालं वंश-कुळ दाखवण्यासाठी पण घट्ट चिकटलं आहे जातीला. प्रमाणपत्रात विद्यार्थ्याच्या वडलांबरोबर आईचं नाव लिहिण्याच्या ताज्या घोषणेचं स्वागत करताना पुढचं पाऊल आडनावं दृष्टीआड करण्याचं टाकायला हवं. डॉक्टर कुमार सप्तर्षींचा मुलगा असं नाव लावतो. आडनावंच गेली की हा नवबौद्ध, हा एकारांत कोकणस्थ हे सर्व जाईल. महाराष्ट्रातले काही प्रशसाकीय अधिकारी अनुपकुमार, संजीवकुमार अशी फक्त आपली नावंच लावतात. आडनावांचा वास घेत माणसं जातीवर जातात म्हणून त्यांचा आडनावांना विरोध आहे. मुलींनीही अखेरपर्यंत आपल्या आई-वडलांचं नाव लावण्याचा पायंडा पडायला हवा. दोन-दोन आडनावांनी आपल्यावरची दुहेरी मालकीच व्यक्त होते ना! स्वयंपूर्णता हवी तर या दोन्ही कुबड्या टाकायला हव्यात. लग्नानंतर आपला विचारही न घेता बदललेलं नाव, त्याला जोडलेलं नवऱ्याचं नाव आणि आडनाव हा कितीजणींना अभिमानाचा विषय वाटत असेल?

अनुक्रमणिका

नवऱ्याची अवहेलना, मारहाण, प्रतारणा सोसणाऱ्या पीडितांनी आणि परित्यक्त्यांनी कैद्याच्या बिल्ल्यासारखं ते आडनाव कशाला ठेवावं?

आडनावामुळेच 'बंधू' जोडण्याची भावना होते. नोकरीपासून राजकारणापर्यंत आपले- त्यांचे हा भेद सुरू होतो. वरचे-खालचे हा डाग तर जाता जात नाही. 'म्हणौनि कुळजातिवर्ण। हे अवघेचि अकारण।' समजून आडनावं अडगळीत टाकायला हवीत. माणसानं नाव कमवावं, नाव राखावं. आडनावात काय आहे?

अनुक्रमणिका

अर्पण

....

'वाचक हो!
आपसे मेरी नहीं बनी! मेरी खुदसे नहीं बनी!'

आजवरच्या अर्पणपत्रिकांमध्ये मला आवडलेली अर्पणपत्रिका आहे ही. 'तुमच्याशीच काय, माझं स्वतःशीही कधी पटलं नाही!' लेखकाच्या या उद्गारात लेखकाला पोषक असा असंतोष आहे. आत्मसंतुष्ट लेखक शब्दा-शब्दातून फक्त ढेकरच देत असतो.

पुस्तक उघडताच अर्पणपत्रिका पहायचा मला चाळा लागला आहे. पुस्तकं छापली जायला लागली तशी कॉपिराइट, प्रथम आवृत्ती, किंमत या सारखं अर्पणपत्रिका हेही नैमित्तिक होऊन बसलं. याचा अर्थपूर्वी अर्पणपत्रिका नव्हत्या असं नाही. गीतेचा प्रत्येक अध्याय श्रीकृष्णार्पण आहे. भवभूतीनं कधीतरी कुठेतरी जन्मणाऱ्या समानधर्मीयाच्या नावे आपलं लेखन केलं आहे. महामहोपाध्याय वाचस्पतिमिश्र बारा वर्षं ग्रंथ लिहीत होते. त्या काळात निमूटपणे सेवा करणारी आपली बायकोच होती हे त्यांना लेखन पूर्ण केल्यावर समजलं. त्यांनी आपलं नाव पुसून ग्रंथाला तिचं नाव दिलं. तीच संस्कृतातली प्रसिद्ध 'भामती' टीका. हे अर्पण नाही - समर्पण! सर्वात भव्य अर्पणपत्रिका ज्ञानेश्वरीची.

'मियां ओविया फुले मोकलीं । अर्पिली अंघ्रियुगुली विश्वरुपाच्या!'

अशी ती शेवटी येते. नऊ हजार ओव्यांची फुलं विश्वरुपाच्या पावलांच्या आंगठ्यांवर अर्पण केली हे दृश्य डोळ्यांपुढे आणावं. दिसतात ते फक्त आंगठे. त्यावर सर्व अव्यक्त, निराकार, नजरेत न मावणारं. ही भव्यता त्रिलोक व्यापते.

पुस्तकाचा विषय भले शास्त्रीय विवेचनाचा असो, अर्पणपत्रिकेचा संबंधमात्र लेखकाच्या खाजगी नात्यागोत्यांशी असतो. साधारणपणे पहिलं पुस्तक तीर्थरूप आई-वडिलांच्या सेवेसी असतं. पुढे लेकी, सुना, इष्टमैत्रिणीचं वुर्तळ वाढत जातं. शंभरावर पुस्तकं लिहिणाऱ्याला आपला मित्रपरिवार नाइलाजानं बरोबरीत ठेवावा लागतो. काही बेरकी लेखक '-स' किंवा 'तुलाच' अशी गुगली अर्पणपत्रिका लिहितात. हुळहुळत्या वयाच्या तरुणींना किंचित् गुदगुल्या होण्यापुरत्या त्या कामी येतात. मराठीत जी. ए. आपल्या कथांइतक्याच वैशिष्ट्यपूर्ण अर्पणपत्रिका लिहितात. आप्तांच्या बरोबरीनं त्यांनी बेळगावसारख्या गावाला उद्देशून लिहिलेली अर्पणपत्रिका स्वच्छ पाण्याच्या टाक्यासारखी आहे. अन्यत्र स्वतःला लपवणाऱ्या या लेखकाचं नितळ अंतरंग त्यात दिसतं.

अर्पणपत्रिकांची ही अभिजातता मूळ इंग्रजीतली. इंग्रजीत लिहिलेली एका मराठी स्त्रीची अर्पणपत्रिका जगभर मान्यता पावली. इरावती कर्व्यांनी भारतीय नातेसंबंधावरचा आपला ग्रंथ नवऱ्याला अर्पण केला आहे. बायका नवऱ्याचा उल्लेख इकडून - तिकडून, स्वारी असा करत तेव्हा बाई 'अरे दिनू' अशी सर्वांसमक्ष हाक मारायच्या. खुद्द पुण्यात जर्मन बुलेट चालवायच्या. पण अर्पणपत्रिकेत 'हिन्दू परंपरेनुसार तुमच्या पावलांवर मस्तक ठेवून मी तुमचे आशीर्वाद मागते!' असं त्यांनी लिहिलं. पश्चिमेकडे त्यांच्या विषयाच्या विभागात सांस्कृतिक नमुना म्हणून ही अर्पणपत्रिका लावली होती. ही झाली हिन्दू बायकोची गोष्ट. विद्याधर पुंडलिकांनी 'अर्थात रागिणीस' अशी जगातल्या समस्त नवऱ्यांची प्रातिनिधिक

अर्पणपत्रिका लिहिली. अशोक केळकरांनी बायकोला म्हणजे पर्यायानं स्वतःलाच हे अर्पण असल्याचं जाहीरपणे मान्य केलं. हे असलं ‘अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणम्’ वाचून अनेकांना त्यांच्या भाग्याचा हेवा वाटला.

साधारणपणे आपण समजतो की, अर्पणपत्रिका ही लेखकाच्या नम्र कृतज्ञतेची पावती असते. अनेकदा ते खरं असतंही. काहींच्या बाबतीत मात्र ते हलवायाचं बाहेरून शोभिवंत दुकान असतं. आतला भटारखाना वेगळाच असतो. आई-वडिलांच्या चरणी पुस्तक अर्पण करणाऱ्यानं त्या चरणांना घरात थाराच दिलेला नसतो. आईला पुस्तक अर्पण करण्याची शक्ती त्याच्या लेखणीत असते पण रुग्णशय्येवर खितपत पडलेल्या म्हातारीची शुश्रूषा करण्याचं बळ त्याच्या हातात नसतं. आपल्या बायकोला पुस्तक अर्पण करणारे काही जण दुसरीकडे पडाव टाकतात. अर्पणपत्रिककेचं एक पण तिच्याही तोंडाला पुसून पुनः पाठ फिरवून निघून जातात.अर्पणपत्रिकेतल्या माणसांना त्यांच्या आयुष्यात काय स्थान असतं? संपूर्ण कोऱ्या सोडलेल्या पानावर ती चार अक्षरं लिहायला जागा लागते, बस, तेवढंच! कधी काळी चलनात असलेल्या शब्दांच्या मागे उरतात त्या फक्त छापील अक्षरातल्या काळ्या सावल्या.

अर्पणपत्रिका कधी कधी फसव्या असतात. वाचलांना त्या चकवतात. ज्यांना अर्पण केलं त्यांच्या त्या नसतात. आणि लेखकाला त्या चक्क उघडा पाडतात.

अनुक्रमणिका

फार फारशी

....

'पढे फारसी, बेचे तेल' आणि हाथकंगन को आरसी क्या और पढ़े-लिखे को फारसी क्या' अशा म्हणी हिन्दीत रूढ आहेत. आपल्याला जशी संस्कृत, इंग्रजांना जशी लॅटिन तशी हिन्दी - उर्दूवाल्यांना फारसी आणि अरबी. हातात रक्तापिपासू तलवारी आणि जिभेवर या भाषा घेऊन आक्रमण प्रथम वायव्यमार्गे उत्तर हिन्दुस्थानात आले. विंध्य ओलांडून त्यांनी १२९६ मध्ये महाराष्ट्रात पाय रोवले. त्यांची भाषा ही जेत्यांची भाषा म्हणून पाश आवळून बसली. तशी प्रत्येक भाषेला शेजाऱ्यांची किंवा आल्यागेल्यांची हवा लागते. पण सत्ताधाऱ्यांच्या भाषेचं आक्रमण व्यापक असतं; विळखा मजबूत असतो. दीर्घकाळ राहिल्या तर या बेड्या अवयवच बनून जातात.

आज वापरात असलेले कितीतरी शब्द मुळात फारसी आहेत याची आपल्याला जाणीवही नसते. *रोज, चश्मा, गुलाब, दोस्त, दारू, हवा, रजा, जमीन, हाल, थंड, गरम, बाजू* हे शब्द मराठी नाहीत असं कोण म्हणेल? त्यातल्या त्यात काही शब्द आपण आपल्यापरीनं शुद्ध करून घेतले. मुल्क... मुलूख, कत्ल - कत्तल, बेमुरव्वत - बेमुर्वत, बिलाशक - बेलाशक, खुराफात - कुरापत, खूप - खूप करत करत त्यांच्या नाजूक किमाचा आपण पार खिमा करून टाकला. फारसीत ट, ठ, ड, ठ, ण नाहीत, त्याचप्रमाणे महाप्राण नाहीत. आपण त्यांच्या शब्दावर आपले शिक्के मारले, झालं! मराठी आणि फारसी जाणणारे माझे स्नेही म्हणतात, 'उच्चारांची अशी मोडतोड करून तुम्ही आक्रमकांवर थोडाफार सूड उगवलात!'

आपली खरी अडचण आली ती त्यांच्या नुक्त्यात. अरबीत एका 'ज' चे पाच उच्चार आहेत. फारसीत क, ग, ज, फ, ख नुक्त्याचे आणि बिन-नुक्त्याचे वेगवेगळे आहेत. खून, कीमत, आफत, गैर, जख्म यातला नेमका उच्चार दाखवायची सोय मराठीत नाही. परिणामी नुक्त्याचा ख (खयाल) घशातून काढायला कित्येक लोक नुसतेच खाकरे काढत असतात. फारसीत फ इंग्रजीसारखा ओठाच्या फटीतून वारं सोडून म्हणायचा असतो. आपण थोबाड फोडून ठेवीन मधला फ म्हणतो. उर्दूत एखाद्या गोष्टीला प्रत्यक्ष पुरावा, प्रमाण पाहिजे यासाठी 'हम तो बस नुक्ता ही देखेंगे' म्हणतात. नुक्ता दिसला तर हो नाहीतर अमान्य! आपल्याला नुक्ता नाही म्हणून मग 'आला खानदानवाले' आपल्या हिन्दी-उर्दूला 'दाल-चावल की बू आती है' असं नाक मुरडून म्हणतात.

फारसीची खरी गंमत येते त्यांच्या मल्लिका - ए - हिन्दुस्ताँ (सम्राज्ञी-ची- हिंदुस्तान), महम्मद-बिन-कासीम, दीवान-इ-गालिब, अर्जे हुनर या शब्दांनी. आपले शब्द दशरथपुत्र,विश्वसुंदरी, वाल्मीकिरामायण असे डावीकडून उजवीकडे जातात. उर्दूभाषी सहकाऱ्यांना मी म्हणते, तुम्ही उजवीकडून डावीकडे लिहिता, म्हणून तुमचे समास असे उलटे. आर्य, रोमन आणि ब्रह्मी लिप्या डावीकडून उजवी दिशा धरतात. अरेबिक वंशाच्या सर्व लिप्या वामपंथ्याकडे जातात. चिनी-जपानी वरून खाली येतात. खालून वर कुणी लिहितात का? पहायला हवं!

कवी माधव ज्यूलियनांनी उमर खय्यामची वारुणी मराठीत आणली. त्यांनी फारसीमिश्रित मराठी 'बेगमेचें विरहगीत' लिहिलं. काणेकरांनी शिवाजीचं त्या पत्राला उत्तर तयार करून,

'जरी या मराठमोळ्या शिवबास बोध व्हावा
तरी फारसी-मराठी मज कोश पाठवावा'

अशी त्यांची टोपी उडवली होती.

अनुक्रमणिका

पण ‘मराठीत गजल फक्त माधवरावांनाच समजली’ अशी एका अरबी पंडितानं त्यांच्या फारसीवरच्या प्रभुत्वाची तारीफ केली होती. आपण गजलेची कठोर गझल केली. त्याहीपेक्षा अनेक जण तो गझल म्हणतात. अरे अरे!

आपण किती धोपटू म्हटलं तरी युरोप आणि आशियातल्या भाषांचं मूळ एक आहे. व्युत्पत्तींचा अभ्यासच तसं सांगतो. डॉक्टर कालेलकरांच्या मते ‘खुदा’ हा शब्द संस्कृत स्वधा म्हणजे इंद्र. जुन्या सिंधीत आणि आजही वसाहतीतल्या बोलीत अल्लाचा अर्थ आई असा आहे. आपण आईग म्हणतो तसं सिंधीत ‘अयिअल्ला’ म्हणतात. म्हणून आपल्या भाषेत आक्रमकांच्या भाषेचा जो प्रवाह मिसळला त्याला सामावून घेणंच हिताचं. मराठीप्रमाणे सामान्यरूप झालं की तो शब्द मराठी. स्टेशनचं स्टेशनात झालं की गाडी मराठीत शिरली. ही भाषेची उसनवारी नसते; पचवण्याची, सामावण्याची शक्ती असते.

भाषा या घडामोडी आपोआप करत असते. त्यातून वाहिलं ते पाणी आणि राहिलं ते गंगाजल मानावं.

अनुक्रमणिका

कटुभाषितं

....

पांडित्य, सद्‌गुण, चारित्र्य यांची महती गाणारी कितीतरी संस्कृत सुभाषितं आपण बालपणी घोकली. जिभेला वळण लागावं, स्मरणशक्ती वाढावी म्हणून असं पाठांतर घ्यायची पूर्वी रीतच होती. अल्पाक्षररमणीयता हे सुभाषितांचं ठळक वैशिष्ट्य. 'दुर्लभः स्वजनप्रियः' किंवा 'कलासीमाकाव्यं' सारखे तुकडेही त्याच्या बंदिस्त रचनेमुळेही आपल्या सहज लक्षात राहतात.

कधी कधी मनाला चटका बसावा अशा रचनाही आढळतात.

'कायस्थेनोदरस्थेण मातुर्मांसं न भक्षितम्।

न तत्र करुणाहेतुः हेतुस्तत्र अदन्तता॥

(गर्भातल्या कायस्थानं आईचं मांस खाल्लं नाही याचं कारण त्याला आईची दया आली हे नसून त्यावेळी त्याला दात नव्हते हे आहे.) कोणीतरी तळतळून शापवाणी उच्चारावी तसे हे उद्‌गार! कोणाचे असतील बरं? हा कायस्थ जातिवाचक असल्यापेक्षा व्यवसायवाचक असण्याची शक्यता जास्त. 'काळे करूनि मुख जो वर होय लेखी.' असा बोरू ज्याच्या हातात तो कायस्थ. हिन्दीत त्यांना मासीजीवी म्हणजे शाईवर जगणारे म्हणतात. या कलमबहाद्दरानं कोणा अडलेल्या माणसाला गांजलं असेल. कितीही भर केली तरी याचं पोट भरत नाही, असं पाहून रंजिस आलेल्या माणसाच्या मनात हा विचार आला आणि त्यानं तो शब्दात बांधला. सरकारच्या प्रसूतिगृहापासून ते स्मशानापर्यंत जिथे जिथे कागदासाठी माणसाला खेटे घालावे लागतात तिथे हाच अनुभव येत नाही का?

भवभूतिसारखा नाटककार 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनाः' म्हणाला ते कशामुळे? पाणवठ्यापासून पारापर्यंत भले-बुरे सगळेच एखाद्या स्त्रीबद्दल (तसंच साहित्यरचनेबद्दल) बोलायचं झालं तर 'ती नाऽ' अशी कुत्सित सुरुवात करतात. माणसांच्या जिभेवरचं विष भवभूतीनं पचवलं, तेच शब्दांतून बाहेर पडलं. हे शब्द अगदी साधे, थोडे पण त्यातली हळहळ व्याकुळ करणारी आहे.

तुम्हा - आम्हा प्रापंचिकांचं गाडं ज्या धनावर रेटलं जातं त्या विषयीही अगदी सर्वसामान्यांचा अनुभव काही ठिकाणी सापडतो. कोणी 'आये दुःख व्यये दुःखंधिगर्थः कष्टसंश्रयः' म्हणतो. (आला तरी दुःख, गेला तरी दुःख, साठवणं तापदायक अशा त्या पैशाचा धिःकार असो.) हे इतक्या कमी अक्षरात म्हटलं तरी म्हणणाऱ्याचा अनुभव पिकलेल्या वयाचा आहे. भर्तृहरीनंही 'दायादाः स्पृहयन्ति' या श्लोकात भाऊबंद हाव धरतात, चोर लुटून नेतात, अग्नी क्षणात भस्मसात करतो, पूर वाहून नेतो, भूमिगत यक्ष गिळून टाकतात इत्यादी धोके सांगून सरतेशेवटी दुर्वृत्त मुलं संपवून टाकतात (नयन्ति निधनम्) त्या धनाचा धिःकार केला आहे. बापाचा पैसा संपवून त्याला मरणाआधी मरण अनुभवायला लावणारे कुलांगार पाहूनच त्यानं हे लिहिलं ना?

हर कार्यालयात सापडणाऱ्या दोन जातींबद्दल असंच मार्मिक भाष्य एका श्लोकात सापडतं. चहाला जाणे, झोपा काढणे, दुसऱ्यासमोर बसून अखंड गप्पा मारणे, रंगभूषा वेशभूषेचं प्रदर्शन भरवणे यातलं काहीतरी केल्याबद्दल पगार घेणारा एक वर्ग असतो. मानेवर खडा ठेवून पैन्‌पैचा सवाई मोबदला कामाच्या रूपात द्यायचा असं ईश्वरसाक्ष मानणाऱ्या अल्पसंख्यांचा दुसरा. त्यांच्याविषयी श्लोक आहे -

'गुणानामेव दौरात्म्यात् धुरिः धुर्यो नियुज्यते।

असञ्जाकिणस्कन्धः सुखं स्वपति गौर्गलिः॥

अनुक्रमणिका

(गुणी असण्याचं दुरात्मेपण ज्याच्या अंगी आहे, त्याच्याच मानेवर जू ठेवलं जातं. ज्याच्या खांद्याला साधा ओरखडाही नाही असा बैल सुखानं गोठ्यात झोपा काढत असतो.) बैलाचं उदाहरण रोजचं असलं तरी 'गुणानामेव दौरात्म्यात्' या शब्दांना असणारी धार भेदक आहे. कामचोरांचा इतका परिणामकारक अधिक्षेप क्वचितच कोणत्या भाषेत प्रकटला असेल.

आयुष्यातले कटु अनुभव, चटके इतक्या प्रभावी शब्दात व्यक्त करणाऱ्या असल्या रचना मला गुळगुळीत सुभाषितांपेक्षा जास्त आवडतात. माणसाच्या रोजच्या जीवनाला त्या जवळच्या असतात. देवेंद्र, देव, देवगण, देवमाणूस अशांच्या वर्णनातला निर्जीवपणा त्यात नाही. वखवखलेला अधिकारी, साध्वीलाही बाजारबसवी ठरवणारे कुचाळ, बापाला भिकेला लावणारी मुलं, कामाकडे ढुंकूनही न बघणारे निर्ढावलेले कर्मचारी ज्यांना मुकाट पहावे लागतात त्यांचं हे शब्द म्हणजे सांत्वनच आहे. आणि शब्दांइतकं शाश्वत सांत्वन कोण करू शकेल?

अनुक्रमणिका

सरळ नसलेलं रूप

....

'अरेच्या, हा *सदरा* या *सदरात* गेला वाटतं. आता हे *सदरेवर* जाईल!' गंमत म्हणून म्हटलं तरी ऐकणाऱ्याला समजायला वेळ लागणारच. हा सदरा, हे सदर आणि ही सदर अशा तीन धान्यांचं हे कडबोळं आहे. त्यातून ऐकणारा जर नव्यानं मराठी शिकलेला असेल तर सदरहू वाक्य त्याला जन्मभर समजणार नाही. ही घोटाळ्याची किमया केली आहे मराठीतल्या सामान्य रूपांनी. आम्हा भाषा शिक्षकांसाठी शिकणाऱ्यांच्या हे सगळं गळी उतरवणं म्हणजे एक दिव्यच असतं.

आधीच पाची बोटं सारखी नसतात हे आपण हा आंगठी, ही करंगळी, हे बोट असं म्हणून दाखवून दिलं. चहा-कॉफी-सरबतापासून शंका-उत्तरापार्यंत हा की ही कळल्याशिवाय परभाषिक जीभच रेटू शकत नाही. कारण चहा घेतला, कॉफी घेतली, सरबत घेतलं आणि प्रश्न विचारला, शंका विचारली तर उत्तर विचारलं. त्यात पुनः सामान्य रूपाची धोंड! नामांची तीन लिंगं, दोन वचनं आणि सहा अन्त्यवर्ण. या सर्वांच्या मर्जीप्रमाणे हे सामान्यरूप बनतं. त्याच्या किती तऱ्हा असतील? आताच्या चालू भाषेत मोजून पन्नास आहेत.

मराठी मातृभाषाच असणारे सुखी लोक या जंजाळातून आपोआप वाचले. पण फळावर, फळीवर, फळ्यावर अशा तीन गावांना जाणाऱ्या पाट्या वाचून नवशिका भांबावणार नाही? पुनः घोडा, घोडी, घोडं या सर्वांचं अनेकवचन घोड्यांवर असं एकच ! मूळ शब्द माणसानं ओळखावा कसा? त्यांचेही दामटून नियम केले तरी नियमात बसणारी दोन आणि न बसणारी तीन अशी स्थिती आहे. ऊ-जाऊ-सासू जास्त झाल्या तर उवा, जावा, सासवा इथवर ठीक. पण सासूसामेर आणि सास्वेसमोर असे दोन-दोन नमुने आले तर घ्यावा कोणता? सरळ रूपाला सामान्य करताना ही मोडतोड कमी म्हणून त्याची आणखीही छाटणी करावी लागते. वकील- वकिलाचा. पण उंदीर, पाटील मात्र उंदराचा, पाटलाचा असे छोटे करावे लागतात. कुलूप 'कुलपा' झाल्याशिवाय त्यात किल्ली शिरत नाही अशी ही हेकट सामान्य रूपं.

हे दुखणं फक्त नाम-सर्वनामांपुरतं असतं तर गोष्ट वेगळी. गोडाचं तिखटाचं प्रमाण, शेजारच्या - खालच्या बायका, उठण्या-बसण्याचा डौल अशा सर्व ठिकाणी त्याचा संचार आहे. विशेषणं, क्रियाविशेषणं, क्रियापदं यांच्यासह शब्दांच्या आठातल्या सात जातींना हे सामान्य रूपाचं ग्रहण लागलेलं आहे. त्यातून सुटली अरेरे, अबब असली केवल प्रयोगातली अव्ययं.

कर्ण जसा जन्मतः कवचकुंडलं धारण करून आला तसे मराठीत काही शब्द उपजत प्रत्ययासह सामान्यरूप घेऊन आले. 'भारतीय संघानं *निकराचा प्रयत्न* केला.' हा निकराचा म्हणजे कशाचा? हा शब्द निकराची, निकरावर असाच वापरतात. सरळ रूपात नाही. 'खर्च जरा *आटोक्यात* ठेवा!' हा आटो काही कुठे दिसत नाही. 'मी *दुग्ध्यात* पडलो' मधला दुग्धाही असाच. नियम उलटा केला तर मुळात दुग्धं, दुग्धी, दुग्धा असेल तर दुग्धात होईल. पण शब्दाचा जन्मच कपडेलत्ते घालून झाला आहे.

अमका बुचकळ्यात पडला, पुरता कचाट्यात सापडला, फाट्यावर मारीन, सामना अटीतटीचा झाला, गुन्हा उघडकीस आला, बाककोला वठणीवर आणलं, त्याला ताळ्यावर आणा, दिमतीला चार नोकर आहेत, घर मोडकळीला आलं या सर्वांमधले सरळ शब्द मराठीत कधीच वापरले जात नाहीत.

अनुक्रमणिका

स्वभाषिकांना त्यांच्या अर्थाचा खुलासा करावा लागत नाही, पण जेव्हा परभाषिकाला त्याचा अर्थ सांगायची वेळ येते तेव्हा प्रत्यय वेगळा काढून उरलेला शब्द आणि त्याचा अर्थ सांगता येत नाही.

ही सामान्य रूपं टाळताही येत नाहीत. कुठेही बदल करावा लागत नाही अशी नामं शोधू गेलं तर किती सापडतील? लांबड लावली मधल्या ‘लांबड’ सारखं एखादं किंवा अशीच विरळा. सोळा वर्षं या खडकावर डोकं फोडून माझं मत झालंय - मराठी ही सरळ रूपांची भाषा नाही. ती सामान्य रूपांचीच भाषा आहे. त्यांना *सामान्य रूपं* म्हणत असले तरी ते सापळे असमान्य आहेत.

अनुक्रमणिका

बाई मी मुलखाची मराठी

....

‘वर्तमानपत्रात माझं टिपिकल मराठी मुलगी वगैरे वर्णन झालंय ते काही मला मान्य नाही. मराठी, मध्यम वर्ग असल्या काही गोष्टी मी मानत नाही. मला आवडत नाहीत. मला धड मराठी बोलताही येत नाही.. हाती सत्ता आली तर मिश्र समाजसंस्कृतीनं नटलेल्या या महानगरीला मुंबई हे नाव साजेसं नसल्यानं आपण पुनः मुंबईचं बॉम्बे करू.’ हे जाहीर उद्‍गार कोणा व्यक्तीचे हे महत्त्वाचं नाही. ते ज्या प्रवृत्तीचे आहेत तिचं मात्र थोबाड फोडायला हवं. हीच वृत्ती असंही म्हणेल, ‘आमची नावं मराठी आहेत, शी! आमचे बाप मराठी आहेत याची आम्हाला लाज वाटते. त्यांचेही बाप दुर्दैवानं मराठीच असल्यामुळं त्यांची आडनावं आम्हाला चिकटली. वैताग! ही माणसं सोलापुरात राहणारी हे तर फारच असह्य. त्यांनी आम्हाला न्यूयॉर्क, पॅरिसला जन्म न देता दहिसरात दिला याची त्यांनाही शरम वाटली पाहिजे.’

खरं आहे बायांनो! तुम्हाला शक्य असतं तर तुम्ही सुखरामच्याच पोटी जन्म घेतला असता. किमान पक्षी जुहू-पेडर रोडवर अंबानी, हर्षद मेहता, दाऊदच्या घरात जन्माला आला असतात तर तुम्हाला कोणी मध्यमवर्गीय मराठी मुलगी म्हटलं नसतं. तुम्हाला अव्वल यश मिळालं म्हणून केवळ कौतुकापुरता वाटेकरी होणारा समाज तुम्हाला आपला वाटत नाही. तुमची सध्याची मातृभाषा बोलणाऱ्यांनी तुम्हाला नागरिकत्वही नाकारलं तरी ते तुम्हाला चालतं.

‘तुम्ही आमच्या मुलींना मराठी शाळेत घातलंच नाही; कारण त्यांच्या पुढच्या शिक्षणात अडथळा नको.’ असले तारे तोडणाऱ्या तुमच्या आयाही थोर आहेत. मुलीचे मॉडेलचे कचकडी पाय बालवाडीत घालतानाच जिला दिसले तिचं स्थान जिजाऊच्याही नक्कीच वर! तुम्ही यशस्वी मॉडेल (माफ करा, मॉडेलला मराठी शब्द ‘नमुना’ तुम्हाला आवडणार नाही.) झाल्यामुळे त्या शिक्षणतज्ज्ञही झाल्या. आनंद आहे. पण आपल्या मतांचा पुनर्विचार करण्यासाठी तुम्हाला नसलेली थोडीफार माहिती द्यायला हवी.

मुंबईचं बॉम्बे विविधरंगी भारतीय समाजानं केलं नाही. ते केलं ब्रिटिशांनी! मुंबईचे गुजराती, पारसी, खोजा पहिल्यापासून मुंबईच म्हणत आहेत. ब्रिटिशांनी मथुरेचं मुन्ना केलं, तेही तुम्हाला शिरोधार्यच असेल का?

बायांनो, दोष तुमचा नाही. ज्यांनी पृथ्वी रुपयाएवढी केली त्या व्यापारी संस्कृतीचा आहे. म्हणून तर फायदा वाटेल तेव्हा, ‘आमची माती आमची माणसं’ आणि ‘मुंबईचं बॉम्बे’ अशी केवळ चटपटीत विक्रेत्याच्या जिभेवर असणारी तुमची भाषा. तुम्ही मराठीपण नाकारता ते विवेकानंद - ज्ञानेश्वरांच्या विश्वबंधुत्वाच्या भूमिकेतून नाही. हवाई प्रवास, प्रकाशाच्या झगमगाटाचे झोत आणि डॉलर्सच्या चळतीच्या बंधुत्वासाठी हपापून! पण मग तुम्हाला पाव खाण्याचा का बरं कंटाळा यावा? तुमचं जेवण भारतीय असतं की काय? शी!

अणुस्फोटापेक्षा स्फोटाची राख जास्त घातक असते असं म्हणतात. खरं आहे. प्रत्यक्ष पारतंत्र्यापेक्षा माणसाच्या मनाबुद्धीवर बसलेली त्याची राखच भयंकर आहे. आपलं मूळ, आपली ओळख विसरण्याची ही चढाओढ कुठे नेते हे विकसित पाश्चात्य राष्ट्रांमधल्या लोकांना कळून चुकलंय. ते पुनः आपली मुळं धंयाच्या, टिकवण्याच्या मागे लागले आहेत. एके काळी धर्म आणि वंश ही ओळख लोकांना एकत्र बांधून ठेवत होती. तिची पकडही मजबूत होती, पण अखेर ती माणसाला महायुद्धांकडे घेऊन जाते. आज संस्कृतीसह भाषा

अनुक्रमणिका

हीच माणसाची विधायक ओळख होऊ शकते. तीच साहित्य, कला, विज्ञानाच्या क्षेत्रात भरीव कार्य हातून घडवते. स्वभाषेत रचना करणाऱ्या अंधारातल्या कवयित्रीला शोधत नोबेल पारितोषिकही तिच्यापर्यंत पोचतं.

सत्तर-ऐंशी वर्षांच्या आयुष्यात जास्तीत जास्त दहा वर्षं करता येणाऱ्या मॉडेलिंगच्या व्यवसायाची एक बाजारपेठ. तिथल्या छनछनाटासाठी कोणी आपली ओळख नाकारली याचं मराठी माणसांना समाधानच वाटायला हवं. जे पैशासाठी आपल्या आईबापांचे नाहीत, ते कुणाचे कोण? त्यांना कळणाऱ्या भाषेत एकच सांगायला हवं, 'डिजोनिंग सेल्फ-आयडेंटिटि इज हाराकिरी!'

अनुक्रमणिका

देसभासा मणोहरा

....

सन ७७९ मध्ये उद्योतनसूरीनं अर्धमागधी भाषेत 'कुवलयमाला' लिहिली. तिला 'चंपू' म्हणजे गद्यपद्यमिश्रित रचना म्हणतात. ही कथा जरी कुवलयचंद्राची असली, तरी त्या काळातल्या भारताचं सांस्कृतिक दर्शन घडवण्याच्या दृष्टीनं फार महत्वाची आहे. निरनिराळे प्रदेश, पेहराव, बोलींचं कवी वर्णन करतो. उद्योतनाची निरीक्षणशक्ती कॅमेऱ्याला लाजवील अशी आहे. नेमकं वेचून मोजक्या शब्दात गुंफण्याची त्याची हातोटी विलक्षण आहे. मनोहर देशीभाषांचा तो पुरस्कर्ता आहे. एका ठिकाणी त्यानं अठरा देशी भाषांचे नमुने दिले आहेत. कुवलयचंद्र दक्षिण किनाऱ्यावरच्या विजयापुरी' या महानगरीत येतो. तिथल्या बाजारपेठेत काही समारंभ असतो. तिथे त्याला देशी भाषा बोलणारे निरनिराळ्या प्रदेशातले देशवाणी दिसतात. कवीनं एकेका ओळीत त्यांचं चित्रमय वर्णन भाषेच्या नमुन्यासह दिलं आहे. आश्चर्य म्हणजे बाराशे वर्षांपूर्वीचं हे वर्णन आजही प्रत्येकाला बहुतांशी लागू पडतं. मराठ्यांचंच पहा ना, कवी म्हणतो -

'दढमडह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसीले य।

दिण्णले गहिल्ले। उल्लविरे तत्थ मरहट्टे॥'

म्हणजे सुदृढ, सुंदर, श्यामल अंगाचे, सोशिक, अभिमानी, कलहशील; दिलेले, घेतलेले असं बोलणारे ते मराठे. मराठ्यांच्या या गुणविशेषांत आजतागायत काडीचाही फरक पडलेला नाही. इतरांचंही असंच मार्मिक चित्र सापडतं. फरक इतकाच की, त्या काळातल्या प्रदेशांच्या सीमा आजच्यापेक्षा थोड्या वेगळ्या होत्या. हे वेगवेगळे लोक कवीला कसे दिसले?

गोल्ल म्हणजे गोंड, काळे, निष्ठुरवचनी, बहुसमर भोगलेले, अलज्ज असून त्यांच्या बोलण्यात अड्डे शब्द येतो. मध्यदेश म्हणजे आजच्या कुरुक्षेत्र, अलाहाबादजवळचे लोक 'तेरे मेरे आउ' बोलतात. ते न्यायनीतिज्ञ, संधिविग्रहपटु म्हणजे मुत्सद्दी, बडबड्या स्वभावाचे आहेत. मगधातले लोक पोट सुटलेले, रंगानं वाईट, रतिक्रीडेची इच्छा करणारे; त्यांचं बोलणं 'एगे ले' असं. अंतर्वेदीतले म्हणजे आजच्या गंगा-यमुनेच्या दुआबातले लोक तांबूस रंगाचे,पिंगट डोळ्यांचे, गोड बोलणारे 'कित्ता किम्मा' बोलणारे, भोजन आणि गप्पा मारणे एवढी दोनच कामं त्यांना येतात. कीर म्हणजे काश्मीर-कांगड़ातले. लांब आणि मोठ्या नाकाचे, कनकवर्णी, भारवाही आहेत. त्यांची भाषा 'सरि पारि' अशी. ढक्क किंवा टक्क देश म्हणजे आजचा पंजाब. त्यांची बोली 'एहं तेहं' ची. कवी त्यांना दक्षिणा, दान, पौरुष, विज्ञान, दया मुळीच नसलेले (विवर्जितसरीरे) म्हणतो. उलट सिंधी मात्र त्याला सललित, मृदू, मार्दवक, गंधव्वपिए म्हणजे गानप्रिय,स्वदेशाकडे चित्त लागलेले, सुभग दिसले. त्यांचं 'चउइय मे' आजच्या सिंधीत 'चयुइमि' (तो मला म्हणाला) असं वापरतात.

मरुभूमिवासी 'अप्पा तुप्पा' बोलणारे, वाकडे, बुद्धीनं जड, बावळट (जडे य जड्डे), बहुभोजी म्हणजे खूप खाणारे, कठोर, जाडजूड अंगाचे असे आढळले. गुर्जराचं वर्णन तूप, लोणी खाऊन पुष्ट झालेले, धर्मपर, संधिविग्रहनिपुण म्हणजे डावपेचात हुशार असं आहे. त्यांचं 'णउरे भल्लऊ' 'नथी रे भलुं' ला जवळचं. लाटदेश म्हणजे दक्षिण गुजरात आणि उत्तर महाराष्ट्र. इथले लोक स्नात, चंदनभस्म-विलेपित, भांग पाडलेले, सुशोभित, सुगात्र. त्यांच्या बोलण्यात 'अम्हं काउ तुम्हं' येतं. माळव्यातले 'भाउय भइणी तुम्हें' बोलणारे, सडपातळ, सावळे, सुंदर शरीराचे, कोपिष्ट, मानजीवी, रुद्र असे दिसले. कर्नाटकी व्यापारी उत्कटदर्पे, प्रियमोहन, रुद्र, पतंगासारखे चालणारे 'अडिपॉंडी मरे' हे आजच्या कन्नड शब्दांचे खापर-पणजे. ताजिक देशाचे पठाण कापसाची वस्त्रप्रावरणं वापरणारे, मांसरुची, (मद्य) पानमदनाचे लोभी,

अनुक्रमणिका

'इसीकिसीमिसी' असं बोलत होते. कोसल म्हणजे अयोध्या प्रांतीय सर्वकलाप्राप्त, मानी, प्रियकोपी, कठीण देहाचे, 'जल तल ले' बोलत. 'अटि पुटि रटि' बोलणारे आंध्रवासी प्रियमहिलासंगमी, सुंदर गात्राचे, भोजनप्रिय आणि रुद्र दिसत होते.

खरपारसादि अठरा भाषांचं हे वर्णन आजही मनोरंजक वाटतं. स्वतः प्राकृत भाषेत लिहिणारा हा कवी देशी भाषांची वकिली करतो. ज्यांना देशी भाषा येतात ते सुसंस्कृत असं त्याचं ठाम मत आहे. बाणभट्टाच्या 'कादम्बरी' तही उज्जैनी नगरीचं असंच वर्णन आहे. तिथले पौरजन 'सर्वदेशभाषालिपिज्ञ' म्हणजे सर्व देशी भाषा आणि त्यांच्या लिप्याही जाणणारे होते.

आजच्या मुंबईचं असं वणर्न करून ठेवलं तर? हजार-दोन हजार वर्षांनी तोही किती महत्त्वाचा भाषिक पुरावा होऊ शकेल!

अनुक्रमणिका

टाकलेल्या पाट्या

....

‘चक्का चोवीस रुपये किलो’ अशी ठळक पाटी पाहून माणसं अधीरपणे पुढे गेली की, रुपये आणि किलोमध्ये बारीकसा १/२ आकडा दिसावा ही युक्ती दुकानदाराची की पाट्या रंगवणाऱ्याची?

पुण्याच्या ससून हॉस्पिटलसमोर झाडाभोवती असलेल्या जाळीवर लटकवलेली
‘बाबू कांबळे - प्लास्टिक सर्जरी’
अशी पाटी. ही सर्जरी रुग्णालयातली नाही. प्लास्टिकच्या फुटक्या बाटल्या, चपला जोडून द्यायची! अशी ही सर्जरी. कधी मुळातला मजकूर ‘धूम्रपान करून ये’ किंवा ‘कुमारी बाळंत आसव काढा’ असा वाचायला मिळतो. पिठाच्या गिरणीच्या वीतभर फळीवर ‘येथेपि ठाचीगि रणीचा लूआहे’ अशी सोय लावलेली असते. पाटीवाल्यांच्या प्रतिभेचे असे गमतीदार खेळ अनेकांना चांगले माहीत आहेत.

रंगाऱ्यांच्या कुंचल्यांचे स्वैर फटकारे मराठी शुद्धलेखनाच्या मोडतोडीत जास्त दिसतात. निवडणुकीच्या काळात रस्त्यांनी किती पाट्या माळलेल्या असतात. त्यातली नावं ज्यांची असतात त्यांनी तरी ती बरोबर द्यावीत? गिरीष, दिपक, सुनिल, सुशिलकुमार, चारुशिला, रविंद्र, निळकंठ असं सार्वजनिक लेखन अशुद्ध. हमी मात्र शुद्ध सार्वजनिक चारित्र्याची! वस्तूंचं तेच! टँकरपासून पिशवीपर्यंत बहुतेक ठिकाणी दूध ऱ्हस्व. सरकारी दूध तर हमखास आटलेलं! किराणा दुकानापुढे यादी पाहावी. मुगडाळ, तुरडाळ, उडिदडाळ असा आखडता हात. पिवळा गूळ लिहिता लिहिता ‘पीवळा गुळ’ होतो. गहू, तांदूळ दीर्घ लिहिले तर वजनात जास्त द्यावे लागतील, अशी दुकानदाराला भीती वाटत असावी. जाहिरात भांडी घासायच्या पावडरीची असो किंवा साबणाची, पितांबरी, दिप्ती, उज्वल, अशी हमखास दांडी मारलेली. उलट मंदीर दीर्घ लिहून प्रशस्त वाटतं! पाणपोईवर ‘पीण्याचे पाणि नागरीकांसाठी’ खुलं असतं. कधी साजरं दिसावं म्हणून ऋषीकेश, शरश्चंद्र, मेघःश्याम अशा सुधारणाही असतात. उपहारगृह वाचून पोटाला भेटवस्तू देत आहोत असं समजूनच आत जावं. मग ईडली - इडली, दोसा - डोसा, साबुदाणा - शाबूदाणा, उपीट - उप्पीट अशी द्वैतं आपला पिच्छा पुरवतात. या मऱ्हाष्ट देशी, मराठेशाहीत कुठेही जा, बिनचूक लिहिलेला पदार्थ एकच - वडापाव!

‘नॉव्हेल्टी स्टोअर्स’ सारख्या इंग्रजी गद्याच्या मराठी अवतारात इंग्रजी -मराठीची खरी कुस्ती बघायला मिळते. उच्चारच चुकल्यामुळे ॲटो, ओव्हरऑइलिंग, सुपरीटेन होतं. हौसिंग सोसायटी हौसेनं राहणाऱ्यांची होते. किचनची की दीर्घ आणि कीचेनची ह्रस्व असा घोटाळा होतो. रोमन लिपीत स्वर आणि व्यंजनांसाठी सुटी अक्षरं आहेत. शब्दात ती एकापुढे एक येतात. शास्त्रीय भाषेत देवनागरी सिलॅबिक म्हणजे व्यंजनात स्वर मिसळून होणाऱ्या अक्षरांची लिपी आहे. ऱ्हस्व, दीर्घ आणि प्रसंगी तीन-तीन व्यंजनं जोडण्याच्या पद्धतीमुळे ती जटिल आहे. **Exclusive** इंग्रजीत लिहिताना अक्षरं एकापुढे एक ठेवली की झालं. नागरीत एक्स्क्लुसिव्ह गुंत्याचं. इंग्रजी पाट्या रंगवणाऱ्याला सव्वीस अक्षरं आली की भागतं, मग भले स्पेलिंग कितीही नाठाळ असो. अरेबिक लिपीही स्वल्पविरामांचा आणि टिंबांचा वापर करणाऱ्या फक्त सव्वीस अक्षरांची आहे. तेवढेच आकार घोटल्यामुळे या लिपीतलं सर्वांचंच लेखन सुबक दिसतं. मराठीत पन्नास अक्षरं ए-ऑसह त्यांच्या चौदाखड्या आणि संभाव्य जोडाक्षरं असे किती आकार होतात? त्यात रफाराचे पाच फेरे. भरीत भर विद्या, त्रास, श्रम, हत्ती अशी खास टांकसाळीतली अक्षरं. त्यांच्या सुलेखनात अच्युत पालवसारख्या चित्रकाराची प्रतिभा प्रतिसृष्टी निर्माण करते हे खरं, पण दुकानाच्या पाट्या रंगवणाऱ्या सामान्यांचं काय?

अनुक्रमणिका

इंग्रजी पाट्या बऱ्याच अंशी बिनचूक असतात त्याचं कारण त्या भाषेचा धाक. स्पेलिंगच्या बडग्यामुळे मजकूर लिहिणारा कोशात पाहतोच, चूक झाली तर शब्दच कळणार नाही. ब्यूरो इंग्रजीत लिहिणारा 'रो' वर अडतो. मुकाट्यानं **buro** असं न लिहिता **bureau** लिहितो. मराठीत 'ब्युरो' किंवा 'ब्यूरो' लिहिलं म्हणून बिघडत नाही. लिहिणाऱ्याला फिकीर नसते, आणि वाचणाऱ्यांचं तरी काय जातं? चारचौघात कपड्यावर एकही डाग, सुरकुती आपल्याला चालत नाही, असंच भाषेबद्दल आपल्याला का बरं वाटत नाही?

पाट्या रंगवणं म्हणजे खरं तर दिल्या मजकुराची कॉपी करणं, मग ती बिनचूक करावी! कशातरी पाट्या टाकून कलाही गेली नि धंदाही बिघडला.

अनुक्रमणिका

वर्ग-संवाद

....

जंगलात शिरलेला शिकारी हा श्वापदांच्या दृष्टीनं आणखी एक प्राणीच असतो. तिथं भेटणाऱ्या लहान-मोठ्या पशूंना पाहून होते तीच प्रतिक्रिया या माणसाला पाहून खरं तर व्हायला हवी, पण प्रत्यक्षात मात्र शिकारी दिसताच धूम ठोकून जीव वाचवणं, आणीबाणी पुकारून स्वकीयांना सावध करणं किंवा आक्रमण करून त्याचा जीव घेणं हेच जंगली जनावरं करतात. याचं कारण शिकारी सांगतात की माणसाच्या दिसण्यात, आविर्भावात एक प्रकारचा आक्रमक दर्प असतो. *'आपण इतरातलेच आहोत!'* असा सर्वसामान्य भाव दाखवण्यात माणसाला कमीपणा वाटतो. माणसा-माणसातही आपण इतरेतर समासातले हे दाखवून देण्याची एक शैली असते. उच्चभ्रू अभिजनांच्या सर्वांगावर फवारलेल्या शिष्टपणामुळं गरीब-गुरीब त्यांच्याशी बोलायला कचरतात. या वर्गभेदामुळं परस्पर संवादाची दारंच बंद होतात. स्वतःच्याच एका अनुभवावरून मी अंतर्मुख झाले.

खाजगी आरामगाडीनं प्रवास करताना मधल्या एका ठिकाणी एक खेडूत म्हातारी बसमध्ये चढली. तिला जवळच उतरायचं होतं, पण तेवढ्यासाठी पडणाऱ्या दोन-तीन रुपयांच्या फरकासाठी ती चुटपुटत होती. थोड्या वेळानं ती म्हणाली,

'मावशी, तुमाला कुठं जायाचं?'

ती माझ्याशी बोलेल अशी माझी अपेक्षाच नव्हती. उत्तरेपर्यंत वेळ काढायचा तर तोंडाचे चार टाके उसवणं हा सोपा मार्ग. बरं, माझ्यापेक्षा वडीलधारी असूनही ती मला चांगली आदरेखून बोलत होती. पण आपणहून तिची विचारपूस करायला माझी जीभ रेटली नव्हती. मला माझ्या भोवतीच्या अदृश्य भिंतींची लाज वाटली.

माणसाची आर्थिक स्थिती सुधारत जाते तसतसा त्याचा लोकांशी संपर्क आकसत जातो. त्याची प्रवासाची साधनं एकेकट्याची होतात. गर्दीची हाट-हाटेलं तो टाळतो. मित्रांचं वर्तुळही वातानुकूलित होत जातं. वाहनांच्या काळ्या काचांतून लोकांची भाषा त्याच्या कानांवर पडत नाही. निकोप समाजासाठी आवश्यक असं शब्दांचं अभिसरण त्यामुळं थांबतं.

रायगडावर तकियाची विहीर आहे. शिवाजी महाराज दुपारच्या वेळी तकियाशी जाऊन बसत. विहिरीवर धुणी धुवायला येणाऱ्या सासुरवाशिणी माहेरवाशिणींची विचारपूस करत. त्यांच्या मुलांच्या हातावर फळं, मेवा ठेवत. या जनसंपर्कामुळे त्यांना राज्याची आतली स्थिती कळे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी भाजी आणायला स्वतः मंडईत जात. त्यांचं हे काम दुसऱ्या कोणीही केलं असतं. पण ते म्हणत, 'तेवढीच माणसं भेटतात. बोलणं होतं.

रिक्षावाला असो की पोस्टमन, त्याच्याशी चार शब्द बोलल्याशिवाय डॉक्टर कालेलकरांचा व्यवहार पुरा होत नसे. भाषेचा व्यापार हाच ज्याच्या अभ्यासाचा विषय आहे त्यानं सर्व प्रकारची भाषा कानांवर घेतलीच पाहिजे. ज्याला अनेकांसाठी लिहायचं आहे, त्याला अनेकांशी संवाद साधता आला पाहिजे.

अनुक्रमणिका

एका संपादकानं 'मी समाजप्रबोधन करण्यासाठी लिहीत नाही' असं म्हटलं तर आश्चर्य वाटेल. डॉक्टरनं 'रोगी बरा व्हावा म्हणून मी औषध देत नाही!' म्हणावं; इंजिनियरनं 'लोकांनी रहावं म्हणून मी घरं बांधत नाही' असं म्हणून हात झटकावेत; इतकंच काय, 'कुणी जेवावं मी रांधत नाही' असं गृहिणीनं म्हणण्यासारखंच आहे. 'कुणी वाचावं म्हणून मी लिहीत नाही.' असं कवी म्हणू शकेल, कारण तो कलावंत आहे पण रोज लाखोंशी थेट संवाद साधणारा संपादक? तो श्रेष्ठ अर्थानं व्यावसायिक संवादक आहे.

वर्गसंघर्षामध्ये फक्त आर्थिकच कारणं असतात असं आपण मानतो, ते तितकं खरं नाही. दक्षिण महाराष्ट्रातल्या जाळपोळीविषयी लिहिलेल्या पुस्तकांमधून याची साक्ष पटते. सरंजामदाराच्या लाथांपेक्षाही त्याची भाषा शोषितांवर जिव्हारी घाव घालते. मालकाच्या गुढग्याएवढ्या पोरीनं साठीच्या गड्या-रयताला अरे-तुरे करून शिवीनं हाक मारणं ही संवादाची भाषा नाही. दोन विरुद्ध वर्गांमध्ये कित्येकदा संवादच नसतो. एकमेकांचा विश्वास वाटेल अशी भाषेची मोकळी देवाण-घेवाण नसते. काही वेळा आपलं म्हणणं नेमकं, परिणामकारक करून मांडण्याची हातोटी आपल्याकडे नसते. परिणामी वाटाघटींच्या वेळी *'तोंड संभाळा! जिभेला आवर घाला!'* असं एकमेकांना सुनावलं जातं. विचारांना आवर घाला ! मतं संभाळा !' असं म्हणायची वेळ येत नाही. अखेर फिसकटतात ती बोलणी!

यासाठी प्रसंगी वादविवाद, विसंवाद झाला तरी दोन वर्गांतल्या संवादाला पर्याय नाही. 'अलौकिक नोहावे लोकांप्रती' हे घमेंडखोर घुम्यांनी थोडं स्मरावं.

अनुक्रमणिका

वाणी स्त्रीरूपिणी

....

'ऋषींणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति' (आद्य ऋषींच्या वाणीमागोमाग अर्थ धावत असतो) हे उत्तररामचरितकर्त्या भवभूतीचं वचन अनेकांना माहीत आहे. वाचा आणि अर्थ हे स्त्री-पुरुषांसमान म्हणून अर्थामागं खाली मान घालून जाणारी ती सर्वसामान्यांची वाणी. पण ज्यांच्या वाणीला तपश्चर्येचं सामर्थ्य लाभलेलं आहे ते ऋषी जेव्हा बोलतात (किंवा लिहितात) तेव्हा अर्थ वाणीच्या मागं आज्ञाधारकपणं धावत असतो. त्यांना मनातला भाव व्यक्त करताना योग्य शब्दांसाठी अडून बसावं लागत नाही. बोलून झाल्यावर अर्थाचा झालेला अनर्थ पाहून *'मला असं म्हणायचं नव्हतं'* अशी सारवा-सारवी करायची वेळ त्यांच्यावर येत नाही.

वाणी आणि अर्थ यांचं अद्वैत ज्ञानेश्वरांनी थोडं वेगळं मांडलं.

अर्थु बोलाची वाट न पाहे। तेथं अभिप्राओचि अभिप्रायाते विये।
भावांचा फुल्लौरा होतु जाए। मतिवरी॥

['अर्थु बोलाची वाट पाहे' असाही पाठ काही जण घेतात.]

इथे एक मति सोडल्यास सगळे शब्द पुरुषी आहेत. दुसऱ्यांच्या मनापर्यंत पोचण्यासाठी अर्थ शब्दांची वाट पाहत खोळंबून राहत नाहीत. इथे एका अभिप्रायातून दुसरा विचार जन्म घेतो. पूर्ण विकसित अशा भावांचे घोसच जणू बुद्धीवर बहरलेले दिसतात. या कल्पनाही चित्रमय आहेत. सुंदर आहेत. पण वागर्थाविव संपृक्तौ असं ते पार्वतीपरमेश्वरासारखं अद्वैत नाही.

भवभूतीनं त्याच्यापुढं एक पाऊल जाऊन 'यं ब्रह्माणं यं देवी वाग्वश्या इवानुवर्तते' असं म्हटलं आहे. इथंही वाणी पावलावर पाऊल टाकून 'जेथे राघव तेथे सीता' सारखी जाते खरी. पण ती *वश्या इव* म्हणजे एखाद्यामागं झपाटल्यासारखी, चेटुक झाल्यासारखी त्याची गुलाम होऊन जात असते. वाणी पूर्णपणं त्याच्या कह्यात असते. त्याला सर्वार्थानं वश होते. भाषेवर इतकी हुकूमत मिळवणाऱ्यांची साधना किती थोर असेल!

त्याच्याही मागं गेल्यास ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात वाणीविषयी एक ऋचा आहे. ती खरोखरच अपूर्व आहे.

उत त्वः पश्यन्न ददर्श वाचम्
उत त्वः श्रृणोत्येनाम्
उतो त्वस्मै तत्वं विसस्त्रे
जायेव पत्य उशता सुवायाः॥

तो तिला (वाणीला) पाहतो पण खऱ्या अर्थानं पहातच नाही. तिला ऐकतो. पण खरोखरी तो ऐकतच नाही. पण त्याच्यापुढे वाणी आपलं पूर्ण सौंदर्य प्रकट करते, जशी सुंदर वस्त्रांनी नटलेली पत्नी पतीसमोर आपलं लावण्य खुलं करते तशी.

अनुक्रमणिका

अगदी मोजक्या शब्दात वाणीचं हे थक्क करणारं रूप वर्णन केलं आहे. अलौकिक रूपवतीचं रूप सर्वांसमोर असलं तरी ते प्रत्येकाला दिसतंच असं नाही. रूपाचा, मधुर स्वराचाही साक्षात्कार व्हावा लागतो. नुसतं दर्शन पुरेसं नसतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे इथे वाणी स्वतःच रचनाकर्त्यावर आसक्त असते. ती ज्याच्या प्रेमात पडते त्याला आकर्षून घेण्यासाठी ती मोहक वस्त्रांनी सजते. आपली काया शोभिवंत वसनांनी लपेटून झाकून घेते. तीही त्याच्याचसाठी. आणि संगमोत्सुक क्षणी त्या वस्त्रांची आवरणं उतरवून खुशीनं दिव्य रूपाची दौलत बहाल करते तीही त्यालाच. इथं रचयित्याला काहीच करायचं नाही. सर्व पुढाकार तिचाच आहे. अनंत जन्मांची पुण्याई म्हणून तिच्या प्रीतीला पात्र ठरण्याच्या अहोभाग्याचा तो धनी आहे. स्वयंवरात इंदुमतीचं वर्णन कालिदास 'संचारिणी दीपशिखेव' असं करतो. ज्या राजपुत्रापुढे सखीसह ती येईल त्याचा चेहरा दिव्याची ज्योत पुढे धरल्यासारखा उजळून निघायचा, ती आपल्याला माळ घलेल का या आशेनं! ती पुढे गेली की मात्र काळवंडून जायचा. माळ घालेल ही नुसती आशा जर एवढं वेड लावते तर वाणीसारखी ज्याच्यावर ती स्वतःला लुटून देत असते त्याचा हेवा किती करावा! वाट पहायची ती असा भाग्यवंत होण्याची. तिचा अनुग्रह व्हावा म्हणून जीव पाखडण्याची तयारी हवी. जो तिच्याबद्दल उदासीन आहे, त्याला तिची प्राप्ती कशी होणार? कारण आपल्या प्रेमाचं दान कुणाला द्यावं हे का तिला समजत नाही? स्त्रीरूपिणी वाणी आणि भाषाप्रभू यांच्या प्रेमाची रीत ही अशी.

जटाभस्मरुद्राक्षधारी अरण्यवासी मुनींनी ही अफलातून कल्पना शब्दांत मांडली आहे.

हॅटस् ऑफ टू देम!

अनुक्रमणिका

दर्पोक्ती

....

एकदा काय झालं! आधीच इंद्र तशातही सोम प्यायला. वास्तविक सोमरस म्हणजे मद्य नाही. ते उत्तेजक अपेय नसून उत्साहवर्धक पेय आहे. साधा वनस्पतीचा निरुपद्रवी रस, पण तो गेला इंद्राच्या पोटात. मग काय, तोही बरळायला लागला. 'हन्ताहं पृथिवीमिमाम्, नि दधानीह वेह वा। कुवित्सोमस्यापामिति।' ऋग्वेदातल्या या ओळींचा अर्थ आहे, अरेच्या, आता सोमरस प्यायलेल्या मी ही पृथ्वी कुठे ठेवावी? इथे की तिथे? ज्याचं स्वतःचं आसन घडोघडी डळमळायला लागायचं तो विट्टी कोलवावी तशी पृथ्वी कोलवू पहात होता. शिरायचीच तर एखाद्याच्या डोक्यात हवाही शिरते. पण बहकवणाऱ्या मादक द्रव्यात सत्तेचा क्रमांक सर्वात वर लागतो. ही अशरीरिणी वधू बहुदा अपात्रांनाच वरते. मग त्यांच्या दर्पोक्तीचाच इतिहास बनतो. पांडवांसाठी राज्याची न्याय्य वाटणी कृष्णानं मागितली तेव्हा दुर्योधन उन्मत्तपणे म्हणाला, 'यावद्धि सूच्यास्तीक्ष्या विध्येदग्रेण माधव। तावदप्यपरित्याज्यं भूमेर्नः पाण्डवान्पृति।' सुईच्या तीक्ष्ण अग्रानं टोकरली जाईल एवढी जमीनही मी पांडवांसाठी देणार नाही. ही दर्पोक्ती त्याला खूपच महागात पडली. माणसासाठी ईश्वरानं नेमून दिलेली जमीन तेवढी त्याच्या वाट्याला आली.

मराठ्यांच्या इतिहासात असा उन्मत्तांचा शिरोमणी जावळीत सापडतो. इथल्या मोऱ्यांना आदिलशहानं चंद्रराव किताब दिला होता. दत्तक कृष्णाजी बाजीला चंद्ररावाच्या गादीवर बसवण्यासाठी शिवाजी महाराजांनीच पुढाकार घेतला, पण तो मातला. राजांनी त्याला चापलं तेव्हा उलट फणकारून तो लिहितो, 'तुम्ही काल राजे जाहला. तुम्हास राज्य कोणी दिधले? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावरी कोण मानतो? येता जावली जाता गोवली. पुढे मनुष्य जिवंत राहणार नाही. तुम्हामध्ये पुरुषार्थ असला तर उदयिक येणार तर आजच यावे. येथे उपाय कराल तो अपाय होईल. यश न नेता अपयशास प्राप्त होऊन जाल.'

निर्वाणीची जरब दिल्यावरही त्याची मस्ती उतरली नव्हती. तो म्हणतो, 'दारूगोळी महझूद आहे. काही बेजवाबास हिते घालून लिहिले ते कासीयास ल्याहाविले?' थोर समर्थ असो!'

असाच ताकदीचा अहंकार अफलजखानालाही झाला होता. बडी बेगमसमोर विडा उचलताना तो म्हणाला, 'सिवा सिवा म्हणजे बिशाद काय? चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो.' परिणामी दोघंही एकाच वाटेनं गेले.

अलीकडच्या काळात असा मद जर्मनीच्या आडोल्फ हिटलर ह्या हुकूमशहाला चढला होता. श्रेष्ठ जर्मन वंशाच्या शुद्धीचं कार्य ईश्वरानं आपल्याला दिलं आहे या समजुतीनं त्यानं महायुद्ध पेटवलं. खुद्द त्याच्या जर्मन वंशीयत्वाची साक्ष इतिहास धडधडीतपणे देत नाही. पण १ मार्च, १९४१ च्या भाषणात त्यानं घोषणा केली, 'हे युद्ध कितीही काळ चालो, मध्ये काहीही घडो, अखेरीस ज्यूंच्या निर्दालनातच या युद्धाची परिणती होणार आहे याबद्दल मला संदेह नाही!' ३० एप्रिल, १९४५ ला स्वतःच्या मस्तकात गोळी झाडण्यात त्याची परिणती झाली.

१९७१ साली भारत-पाक युद्धाच्या वेळी पाकिस्तानचे तेव्हाचे प्रधानमंत्री जुल्फकार अली भुट्टो महाशयही असेच तारे तोडत होते. 'आम्ही भारताबरोबर हजार वर्षं युद्ध करू!' या वल्गनेच्या फोलपणाचाच

आता रौप्यमहोत्सव साजरा होत आहे! आपली अदब विसरून इंदिराजींचा उल्लेख 'ती बया' असा ते करत ते काय शुद्धीवर होते म्हणून?

दर्पाचं भिंग डोळ्यावर चढलं की आपण स्वतः काहीच्याबाही थोर नि समोरचे कस्पटासमान दिसायला लागतात! म्हणून तर साहित्यिक हे आपल्या धर्मादाय पांजरपोळातले बैल आहेत अशा समजुतीनं सत्ताधारी बोलत सुटतात, 'झक मारली आणि यांना पेंड घातली! (ती जनतेच्या बापाची पेंड असली तरी तो आमचाच घास होता!' असं त्यांना वाटतं!) जगाच्या इतिहासात वल्गनांना तोटा नाही. दोष दर्पयुक्तांचा नाही. अविवेकालाही कारणं घडतात.

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला, झाला तशातही वृश्चिकदंश त्याला झाली तयास तदनंतर भूतबाधा. चेष्टा वदू कितिक त्या कपिच्या अगाधा?

कोणी तद्वातद्वा वागायला लागला, कारण त्याला भुतानंच झपाटलं होतं. बिचाऱ्याला त्या आधी विंचू चावला होता. इंगळी डसण्याआधी बापड्यानं दारू ढोसली होती. यात त्याचा काय दोष? त्यातूनही तो मर्कट नसता तर हे सारं घडतं ना!

या गोष्टींचा परिणाम काय होतो ते समजून त्यांच्यापासून दूर रहायला तो जातीचा माणूस थोडाच आहे?

अनुक्रमणिका

ठकी ते बाऽबी

....

वीतभर उंचीच्या बार्बी बाहुलीची शेकड्यातली किंमत ऐकून धक्का बसतो, पण ती किती सुंदर असते! तिच्या बुटांपासून कपड्यांपर्यंत मोहक सुबकपणा असतो.

खेळण्यांनी भरलेली इंद्रधनुषी दुकानं पाहिल्यावर निदान या बाबतीत तरी 'आमच्या वेळीऽ' म्हणून पूर्वरम्य आठवण्याचं कारण नाही हे नक्का! अशी काय खेळणी असायची पूर्वी? मुलींसाठी ठकी आणि मुलांसाठी विटीदांडू.

पिवळ्या रंगाची, त्रिकोणी लाकडाची, केवळ रंगीत रेघांनी हात-पाय दाखवलेली ठकी भिंतीला टेकवल्याशिवाय उभीही रहायची नाही! तिचं लग्न लावणं नकटीच्या लग्नापेक्षाही महाकर्मकठिण! कारण कपडे, दागिने, मुंडावळ्या तिच्या देहावर चढणं अशक्य. भातुकलीतली चूलबोळकीही मातीची असत. (आता हॉकिन्सचा प्रेशर कुकरही मिळतो खेळायला!) या शिवाय गजगे, काचकवड्या,ठिकरी, उड्यांची दोरी असली जंगम मालमत्ता आणि झोपाळा ही सामायिक स्थावर मालमत्ता.

मुलांना चेंडू, भोवरा, लगोरी असा थोडा सवता सुभा असायचा. अचूक नेमबाजी करुन दहाच्या भांडवलावर मिळवलेल्या काचेच्या हजार गोट्या आमच्या भय्यानं आजही जपून ठेवल्या आहेत! छतापर्यंत गजगा उडवून झेलणं, भोवरा तळव्यावर फिरत ठेवणं हे त्या क्रीडामधलं कौशल्य असे.

एवढी साधनं सोडली तर लगंडी, लपंडाव, सूरपाट, हुतुतू असे बिन भांडवली खेळही बरेच होते. चार-पाच भावंडांच्या काळातही आमच्या खेळण्यांवर पालकांना दोन आकडी रुपयेही खर्चावे लागत नव्हते. ते खेळताना *चिरडीची रडी, आवळ्या आवळ्या गुपचूप, फुंक्शो, खंडा, राज्य आलं* वगैरे वापरलेली भाषा आता आठवावी लागते इतकी विसरून गेली. खेळण्यांचं राज्यच बदललं. तिथे भाषा कुठून राहणार?

खेळणी आठवता आठवता असे अडगळीत गेलेले किती प्रकारचे शब्द आठवले. विहिरीवरच्या मोटा जाऊन पंप बसले ते नवीन शब्द घेऊनचं. घरातलं जातं जाऊन गिरणी आली-जातावरच्या ओव्या लोपल्या. वास्तुरचना बदलली आणि दिंडी दरवाजा, कोनाडा, आंबार यांच्याबरोबर माजघर नि बाळंतघरही गेलं. माणसांच्या जगण्याची तऱ्हा ही काही साचेबंद जखडलेली वस्तू नाही. ती बदलत राहते त्याप्रमाणे भाषाही बदलते. खाणं -पिणं, कपड्यालत्त्यातले बदल भाषेत खुणा ठेवून जातात. आता ओचे-पदर बांधून कामाला लागणं नाही, उभं लावणं नाही, सोवळं नाही, की कोणी सैल कासोट्याचा नाही. बाराबंदी, उपरणं, पगडी, पागोटं बासनात शिरलं.

आपल्या आहारात प्रांतोप्रांतीचे, देशोदेशीचे पदार्थ आले आणि जिभेवर भाषेच्या रूपात ठाण मांडून बसले. डोश्यानं पातोळे-पोळे-धिरड्यांची हकालपट्टी केली. सूप, पिझ्झा, नूडल्सनं आपल्या पोटाचा आंतरराष्ट्रीय विमानतळ केला. अनेकदा माणसांना कित्येकांच्या चुलीपाशी प्रवेश नसायचा, ती चूलच उखडली! शेगडी, स्टोव्ह, गॅस, मायक्रोवेव्ह असे तिचे दशावतार सुरू झाले. कुकर-मिक्सरचे रुकार रोटीमेकरपर्यंत मिळत गेले. राहणीतले बदल आणि त्याचप्रमाणे बदलणारी भाषा हे वाहत्या, जिवंत भाषेचं एक प्रमुख लक्षण आहे. ते स्वाभाविकही आहे. छकडा, सारवट, धमणीची चाकोरी पुसून यामाहा, सनी, सुमोची वहिवाट पडणं नैसर्गिकच! शरीरातल्या पेशी मरतात आणि नव्या जन्माला येतात तसं.

अनुक्रमणिका

जुनं साहित्य वाचताना असे किती तरी शब्द आढळतात. त्यातले काही फार सुंदर असतात. लीळाचरित्रात विधवेला 'हातरिती' (रिकाम्या हाताची) म्हटलं आहे. नवऱ्या मुलाला घरदार नाही हे सांगायला 'खुंटदावे' असा शब्द आहे. अगदी गेल्या शतकातल्या लक्ष्मुमबाईंची स्मृतिचित्रं वाचतानाही हा अनुभव येतो.

या बदलणाऱ्या पाण्याच्या तळाशी शाश्वत भाषेचा जिवंत झरा असतो माणसाच्या भावभावनांचा. दर दिवशी बाजारात नवीन खेळणं येत,त्याची नवी नावं येतात, पण मुलांची खेळणी कशी असावीत याचं इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात चरकसंहितेत केलेलं वर्णनमात्र कधीच अडगळीत जाणार नाही. 'क्रीडनकानि खलु कुमारस्य विचित्राणि घोषवन्त्यभिरामाणि चागुरुणि चातीक्ष्णाग्राणि चानास्यप्रवेशिनी चाप्राणहराणि चावित्रासानि स्युः। असं ते वर्णन आहे. मुलांची खेळणी रंगीबेरंगी, नाद निर्माण करणारी (खुळखुळे),सुंदर (असावीत), ती बोजड, टोकदार, तोंडात घालता येतील अशी जिवाला अपाय करणारी किंवा भिववणारी नसावीत.

भाषेत नित्यनवीन काय येत असतं आणि कधी जुनं न होणारं काय असतं याचा 'खेळणी' हा केवळ नमुना.

अनुक्रमणिका

श्रीगणेशाच का?

....

माझ्या लहानपणी बदलीवर येणाऱ्या बड्या अधिकाऱ्यांची मुलंही गावातल्या मराठी माध्यमाच्या शाळेत शिकायची. पण आता बड्यांची मुलं बडी म्हणून, मध्यमवर्गीयांची पुढे बडी होण्यासाठी आणि कनिष्ठ वर्गाची आपण मागे राहिलेल्या अपराधाचं परिमार्जन करण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये घुसण्यासाठी धडपडतात. भाषातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ सतत धोक्याच्या घंटा वाजवत आहेत; अशा वेळी लागलेल्या आगीवर आपणही बादल्या ओतायला हव्यात म्हणून हा प्रपंच!

मुलाच्या शिक्षणाची सुरुवात *'श्रीगणेशाय नमः'* असं लिहून व्हावी हा आपल्याकडचा संकेत. त्यातलं संस्कृत काढून आपण त्याची 'श्रीगणेशा' अशी छानशी हाक केली. अशी स्वभाषेतून शिक्षणाची सुरुवात कशासाठी करायची?

मुळात मूल बालवाडीत जातं ते गट्टी करण्याजोग्या ताई, खूपशी मित्रमंडळी आणि खेळ, खाऊ, गाणी या जगात. स्वतः अनुभव घ्यायची ही सुरुवात असते. इथेच मँगो म्हणजे आंबा. सिट म्हणज बैस या भाषिक नकला सुरू झाल्या तर घोकणं हेच शिकणं होतं. जन्मभर मग ती सवय जात नाही. घरातली मज्जा मित्रांना, ताईंना सांगणं आणि दोस्तांच्या , रिक्षावाल्या काकांच्या गोष्टी घरात सांगणं हे सगळं कुठलं मूल तिसऱ्या वर्षी इंग्रजीत सांगू शकेल? एका तान्ह्या मुलीच्या ओठांवर चिकटपट्ट्या, डोळ्यांवर पट्टी आणि हात-पाय दोरानं बांधलेले अशी एक जाहिरात पूर्वी दूरदर्शनवर यायची. परभाषेत सोडलेल्या मुलाचं हे असंच होतं हे आईबाबांना कधी समजेल का?

काही शाळांमध्येतर आवारात दुसरी भाषा बोलायला बंदी असते. परकी भाषा शिक्षकांकडून ऐकायची, जमेल तेवढी घोकायची. त्यात सारं कसं बोलता येईल?

पहिलीतला चेतन भुकेनं कळवळला तरी ओठ मिटून गप्प राहिला.
'अरे, पण तू बाईंना का सांगितलं नाहीस?' असं विचारल्यावर म्हणतो,
'मग माझ्या पोटात भुकेनं कावळे ओरडायला लागलेत हे इंग्लिशमधे कसं सांगणार?'

मुलाची भाषिक उपासमार वेळीच वडलांच्या लक्षात आली त्याची शाळा बदलली.

स्वभाषेतून शिकणारी मुलं पहिलीपासून भेंड्या, गाणी, नकला, कोडी असे कितीतरी भाषिक खेळ सहज करू शकतात. 'काकडी म्हण काकडी, तुझी शेंडी वाकडी!' ऐकलं की चलाख मूल दुसरे शब्द शोधायला लागतं. भाषेला फुटणारे हे धुमारे परभाषेतल्या तुटपुंज्या उसनवारीत कसे फुटणार? सर्वात घातक गोष्टही इथेच रुजते. आर्यांग्ल मुलांना नात्यातली मुलं, सवंगडी 'आपल्या बरोबरीचे' वाटत नाहीत. इतरांनाही ती आपल्यासारखी वाटत नाहीत. हळू हळू सर्व समाजापासून तुटण्यला सुरुवात होते; पुढे ती ग्रीनकार्डचा रस्ता धरतात.

पाचवीपासून शिकण्याची, वाचण्याची, समजलेलं व्यवस्थित मांडण्याची सवय व्हायला लागते. स्वभाषेतून शिकणाऱ्याला नवीन संकल्पना थेट समजते. 'दोन बिंदूंमधल्या कमीत कमी अंतराला सरळ रेषा म्हणतात' हे कानांतून थेट मनात जातं. इलट इंग्लिशमधून हे समजावून घेताना आधी शब्द लक्षात घ्या,

व्याख्या घोका, लिहिताना पाठांतरावर भरोसा ठेवा हे आलंच. त्यामुळे स्वभाषेतलं मूल नव्या ज्ञानासह वावरतं तेव्हा इंग्लिशमधून शिकलेलं मूल भाषेतल्या पिशव्यांमध्ये भरलेलं ज्ञानाचं सामान ओझ्यासारखं वाहत असतं. म्हणूनच पुढे चिंतन, मनन, संशोधन या उच्चशिक्षणाच्या गरजा भागवणं परभाषेला शक्य होत नाही. इंग्रजीतून शिकलेलेच पुढे मोठे होतात हा भ्रम आहे. तंत्रज्ञान, विज्ञान, कुठलेही मौलिक संशोधन, विशेष कर्तबगारी करून दाखवणारे 'श्रीगणेशावाले' आहेत असंच दिसतं.

इंग्लिश ही अनेक विषयांची ज्ञानभाषा आहे, ती शिकायलाच हवी. जपानी (तंत्रज्ञान), संस्कृत (आयुर्वेद), फ्रेंच (वास्तुकला, चित्रकला), पाली (बौद्धधर्म, तत्त्वज्ञान) याही ज्ञानभाषाच आहेत, पण अनेक विषयांचं प्रगत ज्ञान देण्याचं सामर्थ्य इंग्रजीत आहे. सोय करायची ती महाराष्ट्रातल्या प्तत्येक शाळेत ज्ञानभाषा म्हणून उत्तम इंग्रजी शिकवण्याची इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गोमूत्र शिंपडल्यासारखं मराठी नको आणि प्रत्येक पोर टेम्समध्येही बुचकळून काढायला नको.

शिक्षण खात्याला जर अजूनही खरोखर काही करायचं असेल तर माध्यमिक शिक्षणापर्यंतच्या इंग्रजी माध्यमाच्या सगळ्या शाळांना टाळी ठोकली पाहिजेत.

लेखनरीती

....

व्याकरणकारांचे मुनिश्रेष्ठ पाणिनी यांनी ‘अष्टाध्यानी’ ही रचना कशी लिहिली, याचं वर्णन पतञ्जलीनं आपल्या महाभाष्यात केलं आहे. *‘प्रमाणभूतः आचार्यः दर्भपवित्रपाणिः शुचावकाशे प्राङ्मुखः उपविश्य महता यत्नेन सूत्रं प्रणयति स्म! तत्राशक्यं वर्णेनाप्यनर्थकेन भवितुं किं पुनरियतासूत्रेण?’* म्हणजे आचार्य दर्भाचं पवित्रक (अंगठीसारखं वेढण) हातात घालून, पावन, निवांत समयी पूर्वेकडे तोंड करून बसून, अपार यत्नानं सूत्ररचना करीत. त्यातला एखादा वर्णही निरर्थक असणं शक्य नाही; मग सूत्रांची तर गोष्टच सोडा. अडीच हजार वर्षं उलटून गेली तरी पतञ्जलीचा हा विश्वास अपराजित आहे. भाषेच्या विश्लेषणाची ही चिरेबंदी रचना पाहून ब्लूमफिल्ड हा आधुनिक भाषावैज्ञानिकही भारावून गेला. Mounments of human intelligence! अरे गौरवोद्‌गार त्यानं काढले आहेत. शब्दसिद्धीच्या साधनेसाठी आयुष्य वेचलेल्या आचार्यांनी लेखनाची रीत ही अशी तपाला बसल्यासारखी होती.

आणखीही एका मुनींविषयी अशीच कथा आहे. ते स्नान करून, शुचिर्भूत होऊन ओलेत्यानंच पूर्वाभिमूख बसत आणि लिहायला सुरुवात करत. अंगावरचं वस्त्र पूर्ण सुकेपर्यंत त्यांचं लेखन चाले. या दोन्ही वर्णनात लिहिणाऱ्यांची शुचिर्भूतता ठळकपणे लक्षात येते. दुसरी गोष्ट पूर्वेकडे तोंड करून बसण्याची. प्रभातीची सूर्यकिरणं भूर्जपत्रावर थेट उतरलेली; लिहिण्याला साक्ष सूर्यनारणाची. मध्ये कोणाची सावली नाही असा तो वाग्यज्ञ.

विलक्षण सुंदर असं काही वाचलं की आपल्या मनात प्रश्न येतो की हे कसं लिहिलं असेल? त्यामागचं प्रतिभेचं स्फुरण गुप्त सरस्वतीसारखं जगाला कधी दिसत नाही. पण भागीरथी भूलोकावर अवतरावी तशी साहित्यकृती कागदावर कशी अवतरते; याचंही कुतूहल वाचकांना असतं. मराठीतला पहिला ग्रंथ ‘लीळाचरित्र’. चरित्रकार म्हाईंभटानं चक्रधरस्वामींच्या आठवणींचां अक्षरशः जोगवा मागितला. गावात भिक्षा मागून, नदीकाठी अन्न खाऊन त्यांनी लेखन केलं. शब्द न् शब्द नागदेवाचार्यांना दाखवून त्यांनी मानलं तेच ठेवलं. म्हाइंभटांचं लिहिणंही ‘महता यत्नेन’ होतं. दुसरा महाग्रंथ ज्ञानेश्वरी. सच्चिदानंदबाबांनी आदरें लेखकु होऊन लिहून घेतला.

या लिहिण्याच्या किती तऱ्हा! कोणी आपल्या घराची आढी, भिंती यमकांनी चितारून ठेवायचे. पोटमाळ्यावर गरिबीत राहून लिहिलेंल्या मिल्टनच्या महाकाव्यांना मध्यरात्री जाळलेल्या तेलाचा वास यायचा. हिन्दी भाषेतले प्रसिद्ध कथाकार मुन्शी प्रेमचंद आपल्या अंगणातल्या बाजेवर पालथं निजून कंदिलाच्या उजेडात, तक्क्याच्या आधारानं लिहीत. लोकमान्य टिळकांना इंग्रज सरकारनं ब्रह्मदेशातल्या मंडाले शहरात डांबून ठेवलेलं होतं तेव्हा ‘गीता रहस्याचा’ जन्म कृष्णासारखाच कारागृहात झाला. झाडाचा चीक आणि काट्याच्या टाकानं अंदमानाच्या कोठडीतल्या भिंतीवर ‘कमला’ काव्य लिहिताना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या हातात बेड्या होत्या. समर्थ रामदास शिवथर घळीत जनांचा प्रवाहो टाळून, श्वापदांच्या समूहात राहून लिहायचे. उलट ‘गीतरामायण’ कार ग. दि. माडगूळकरांना मुंबई-पुणे प्रवासात अनेक सुंदर गीतं स्फुरली! दासोपंत त्या काळच्या ढबू पैशाची शाई रोज लिहून संपवायचे. त्यांना लिहायला पासोडीही पुरेना. ज्ञानकोशकार केतकर प्रसंगी बसच्या तिकिटावर टिपणं काढायचे. पाठकोऱ्या कागदांवर तांबड्या बॉलपेननं शिरवाडकरांनी लिहिलेलं ‘नटसम्राट’ नाटक मी स्वतः वाचलंय! चंद्रशेखर अंधाऱ्या माडीत पाटीवर ‘कवितारती’ उतरवत. ना. धों. महानोर घनासारखी ओथंबून आलेली कविता विहिरीच्या

अनुक्रमणिका

सिमेंटच्या कट्ट्यावर पेरून ठेवतात. पावसाला फारच आवडली तर तोही कवितेचा चाटून-पुसून आस्वाद घेतो!

लिहिण्याविषयी एक झेन कथा आहे. क्योतोमधल्या ओकू मंदिराच्या प्रवेशद्वारावर ‘आद्य तत्त्व’ हे शब्द कोरलेले आहेत. आधी ते कागदावर रंगवले, मग लाकडावर कोरले. आचार्य कोसेन ते लिहीत असताना एक शिष्य पाहत उभा होता. ‘छे! जमलं नाही! हे तर पहिल्यापेक्षा वाईट आलंय!’ अशी त्याची शेरेबाजी चालू होती. चौसष्ट वेळा बोळे फेकून झाले, लिहून-लिहून दौतीतली शाईही तळाला गेली. शिष्य तत्परतेनं शाई’ बनवायला गेला. तेवढ्यात उरलेल्या थेंबभर शाईत एका फटकाऱ्यासरशी आचार्यांनी लिहून टाकलं. शिष्यानं आल्यावर ते पाहिलं आणि तो उद्‌गारला, ‘सर्वश्रेष्ठ कलाकृती!’ लिहिण्यात व्यत्यय नेमका कशाचा येतो हे या कथेत मार्मिकपणे सांगितलं आहे. कोणी नाक खुपसत असलं तर काय लिहिणार, कप्पाळ?

म्हणूनच पूर्वाभिमुख बसून लिहिणारे आचार्य कुणाची सावली पडू देत नसत. ते सूर्यसाक्षी तप त्यांच्या लिहिण्यातला सत्त्व मिळवून देत होतं. आणि लेखकाजवळ तप नसेल तर लिहिण्याची पत काय राहील?

अनुक्रमणिका

परंपरा आणि नवता

....

हे शीर्षक एका थोर समीक्षा ग्रंथाचं आहे. पण माझ्या मनात ते येण्याचं कारण म्हणजे पुनः भाषा. भाषा म्हणजे स्वभाषा. परंपरेनं मला मिळलेली स्वभाषा हे माझं मुख्य ज्ञानसाधन आणि प्रपंचसाधन आहे. जी ऐकताना किंवा वाचताना सहसा न अडखळता समजते, मनात आणि स्मरणात पक्की जाऊन बसते, आठवणीत ठेवण्यासाठी टिपून सांभाळावी लागत नाही किंवा घोकावी लागत नाही, अशी ती सवयीची झालेली सोय आहे. याच स्वभाषेमुळे माझ्या घरात आजी-पणजीशी आणि बाजारात रिक्षावाल्यांशी नि भाजीवाल्यांशी अगदी सुरळीतपणे सुखसंवाद घडू शकतो. स्वभाषेचा परंपरेनं वाहणारा हा सलग प्रवाह आम्हा सर्वांना जोडतो.

पण क्वचितएखाद्याशी बोलताना त्या प्रवाहात बेटांचे खंडित तुकडे निर्माण होतात. भाषाविज्ञानात पीएच. डी. करणाऱ्या एकाशी बोलताना मला हे जाणवलं. तो पूर्ण मराठी, खुद्द पुण्यातल्या कसबा पेठेत राहणारा. शिक्षण मराठीत झालेलं असूनही माझ्या भाषेतले काही संदर्भ त्याच्या मनाबाहेरून जात होते. आमची ओळख जुनी असूनही फटी पडत होत्या. मी शिकताना शाळेतल्या शिक्षिका किंवा पुढे विद्वान प्राध्यापक दोघांच्याही बाबतीत हा अनुभव मला आला नव्हता. ज्याची स्वभाषा मराठी आहे त्याला जन्मसिद्ध अधिकारानं जो भाषा-संचिताचा वारसा मिळायला हवा तो त्याला मिळाला नाही याचा मला खेद वाटला. इथंच नव्हे तर मास्कोच्या महाराष्ट्र परिषदेत महेश एलकुंचवार आणि मी दोघंही अशाच कारणासाठी हळहळत होतो. कारण ती पैठणातली आणि पैठणीतली मराठी आता आमच्या आज्यांबरोबरच लोपणार. आमच्या नातवंडांना आता 'रफ अँड टफ हो तो रफ अँड टप पहनो!' असं कुठल्यातरी परभाषेतच सांगावं लागणार!

सर्वात दयनीय स्थिती आहे ती अमराठीपुत्र-कन्यारत्नांच्या मराठी आईबापांची. इंग्रजी माध्यमातून शिकून आता त्यांना 'यंदा कर्तव्य आहे!' त्यांची अट एकच - 'लाइफ पार्टनर इंग्लिश मिडियममधूनच एज्युकेटेड हवा! नाहीतर डायलॉग (कम्युनिकेशनही) कसा होणार' म्हणून ते वरीड़ आहेत! अमेरिकन मुलांना मराठी शिकवणाऱ्या एक प्राध्यापिका लांब चेहऱ्यानं 'मी हे समजू शकते गऽ' असं म्हणतात. आम्ही उपवर होतो त्यावेळी कॉलेजात -

'काढ सखे, गळ्यातील तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे उभे दिवसाचे दूत'

ऐकून परिकथेतला नरोत्तम नरी कॉंट्रॅक्टर हे मलाच उद्देशून म्हणतोय अशी स्वप्नं रंगवायचो! (पारशी तिथं सरशी). पहायला आलेल्या मुलानं 'व्यक्ती आणि वल्ली' मध्ये काय आवडलं असं विचारताच नजर उचलून श्यामलानं 'नंदा प्रधान!' म्हटलं. आणि तिचं लग्न ठरलं.

आमच्या वेळी मुलांनी गुणगुणलेल्या गाण्यांवरून ती प्रेमात पडल्याचा सुगावा आई-बापांना लागायचा. इतकंच काय, विद्यार्थी शीळ घालत कुठलं गाणं म्हणतोय यावरून त्याचं सौंदर्यशास्त्र प्राचार्यांना बसल्या खुर्चीत समजायचं. 'यंदा कर्तव्य आहे का?' असं कोणी विचारलं तर अपेक्षा ठरलेल्या. मुलगा-मुलगी खुळी चालेल, पण सासू सुग्रण हवी, सासऱ्यांना बाजार करता आला पाहिजे आणि धाकट्यांना चव सांगता आली पाहिजे, असं घर बघून द्या. माझ्या आप्तांमध्ये वेदपाठकांच्या ज्येष्ठ गृहस्वामिनी लग्न

अनुक्रमणिका

ठरविण्यात जाणकार. त्यांचे ठोकताळे अगदी अचूक. मुलगी पहायला जायचं असल्यास पाचही सुनांना घसघशीत वाक (दंडातला सोन्याचा अलंकार) घालून व्हिक्टोरियातून जायचं. मग ते फणसवाडीतून गिरगावातच का असेना! मुलगी दाखवायला जाताना गोठपाटल्या उतरवून हिरवी काकणं, गळ्यात पोत, बिनजरीचं लुगडं नेसायचं! हिऱ्यांची कुडी काढून मोत्यांची घालायला विसरायचं नाही! कुणी मुलगी सांगून आलं तर ‘पहायची गरज नाही!’ असं गोड बोलायचं. ती आधी ऐकायची; मग जाऊन करून आणायची. मुलाचे सोबती बघायचे आणि मगच पाऊल घालायचं. अशा जुळलेल्या लग्नांची पुढेही मंगलारतीच असायची. सूनबाई स्वतःच ‘सासूबाई, माइन मुळांचं लोणचं घालूया का?’ म्हणाली की सासूचा चेहरा उजळायचा. असे साठा उत्तरांचे संसार स्वभाषेत त्यांनी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण केले.

आणि या इंग्रज अपत्यांच्या आया सुनांना डोहाळे लागले म्हणून नूडल्सची पाकिटं आणतात. उद्याच्या नातवंडांना रामायनाऽ, महाभारताऽ, आणि शिवाजी द ग्रेटच्या गोष्टी कशा सांगता येतील या काळजीनं ‘त्यांची ट्रान्सलेशन्स स्टेटस् मधून पाठव!’ असं स्टॅन्फर्डवासी सुनील देशमुखच्या महाराष्ट्र फौन्ड्रीला रिक्वेस्ट लेटर लिहितात, यू नो!

श्रीकान्ता कमलाकान्ता असं कसं झालं? असं कसं वेडं माझ्या कपाळी आलं?

अनुक्रमणिका

भाषा - नवराबायकोची

....

'हे म्हणाले की तुला रिंगाच चांगल्या दिसतात!' कार्यालयात चहाच्या सुट्टीत एक पुरंध्री लाडे - लाडे सांगत होती. 'हे मुळीच खरं नाही!' तिच्यापेक्षा अधिक जाणत्या बाई म्हणाल्या, 'लग्नाला अठरा वर्षं झाल्यावर सकाळी दाढी करताना एकही नवरा असं म्हणणं शक्य नाही. मी स्वतः बनारसी शालू नेसून नवऱ्यापुढून फलकारत गेले तर त्यांचं वर्तमानपत्रातलं डोकंसुद्धा वर होत नाही! आपणच धष्टासारखं विचारलं की *'कशी दिसते हो साडी?'* तर उत्तर असतं, *'अंऽऽ, हं!'* बिचारी रिंगावाली एवढ्या सज्जड पुराव्यापुढं निरुत्तर झाली.

बायकोत नसलेले गुण दिसण्याचे नवलाईचे दिवस असतात तेव्हा नवऱ्याची भाषा वेगळी असते. तेव्हा त्याच्या जिभेवर साखरेच्या गोणी असतात आणि बायकोच्या कटाक्षांना कातिलाना धार असते. गवारीच्या शेंगा मोडून चारीठाव स्वयंपाक करायचा कंटाळा आलेल्या एकीनं मोडलेल्या शेंगगांची आमटीच केली ताही वाटणघाटण किंवा अळण न लावता. नवरोजींनी पानात ते तीर्थ पाहिलं आणि ते करवादले, 'कोणी केली ही पातळ पुचकाय?' 'तुझ्याच बायकोनं बाबा!' सासू बोलली. बायकोनं एक तिरपा कटाक्ष टाकला एवढंच. बापडा खाल मानेनं म्हणाला,

'पातळ पुचकाय पण बरी हाय रुचकाय!' त्यांच्या लग्नाला दोनच महिने झाले होते; हे सांगणे न लगे.

काही नवऱ्यांवर हे मोहिनीअस्त्र आयुष्यभर असर करून असतं. आधीच कायस्थ त्यात थोड्या फार लेखिका, अशा कुटुंबात अर्थातच स्त्री राज्य होतं. तिथे श्रीमंतांच्या तोंडी एकच वाक्य होतं - 'हं, मग मीही तेच म्हणत होतो.' असं मम म्हणणारे नवरे तुरळक! बाकी जिथे मातीच्या चुली तिथे येता-जाता 'कळली तुझी अक्कल, तुमची अक्कल चुलीपुरती, थोबाड बंद ठेवा. बायकोच्या सल्ल्यानं वागणारा मी नाही!' (इति तृतीय श्रेणी कर्मचारी) अशा जिभेवर खाजकुयल्याच जास्त!

साऱ्याच नवऱ्यांची भाषा अशी प्लेटॉनिक नसते. 'ढोर गँवार पशु और नारी ये सब ताड़न के अधिकारी' असं तुलसी म्हणतो आणि. नवरे 'लाथ मारीन तिथे पाणी काढीन' या आवेशानं हे ब्रीद बायकोच्या बाबतीत सार्थ करीत असतात! एकदा बायको नवऱ्याला यथेच्छ बडवत्ये असं विलक्षण दृश्य प्रा. सिन्हांनी पाहिलं. ते सांगत होते, 'मर्द औरत को पीटता है तो अपनाही गुस्सा उतारता है, पर औरत पीटती है तो सारी औरत जात का गुबार निकालती है!'

एक वेळ हेही परवडलं. पण यशोधरा, दमयंती यांना झोपेत सोडून जाणाऱ्या आणि सुशील गृहिणीच्या उघड्या डोळ्यात धूळ फेकून तिच्याकडे पाठ फिरवणाऱ्या नवऱ्यांचा निःशब्दपणा बायकोला सर्वात अपमानकारक! कालिदासानं 'सवतींना प्रियसखीप्रमाणे वागव!' असं सांगून नवऱ्यांचीच सोय केली. नटसम्राट बेलवलकरही 'बायको म्हणजे बंदर असतं, नवरा नावाच्या गलबतासाठी!' म्हणतात. म्हणजे बंदर जागेला खिळून आणि गलबत मुशाफिरीला सतत मोकळंच! यामध्ये पुराणात दुष्यन्त, अग्निमित्र आणि इतिहासात शहाजीराजे अशी भलीभली माणसं आहेत! अवघा संसार एका निःश्वासानं फुंकून विझवणारी ही उपेक्षा. कावेबाज अबोला म्हणजे बायकोला जिवंतपणी जहर! एक जिजाऊच अशी निघाली की पतीनं पाठ

अनुक्रमणिका

फिरवल्यावर तिनं पुत्राला छत्रपती केलं. पण तिच्या पाठीचा ताठ कणा प्रत्येक परित्यक्तेला कुठून मिळायला?

तोडण्याचा अनुभव बायकोकडून नवऱ्याच्या वाट्याला येत नाही असं नाही. नवऱ्याचं दैन्य आणि इभ्रत बायको वेशीला टांगते तेव्हा इतरेजनांचा कळवळा त्याच्याही गळी उतरत नाही. अशी सोडून गेलेली बायको नवऱ्याच्या अंत्य दर्शनाला येते अशा प्रसंगाचं एक मार्मिक उर्दू काव्य आहे-

सुने जाते थे न तुमसे, मेरे दिन-रात के शिकवे
कफन सरकाओ, मेरी बेजुबानी देखते जाओ!

याच्या अगदी उलट 'बहुता सुकृतांची जोडी' म्हणून निरामय प्रपंचाचं अहोभाग्य काहींना लाभतं. तात्या आणि मावशी हे आमच्या परिवारातलं सर्वात ज्येष्ठ दांपत्य. त्यांचं सदुसष्ट वर्षांचं वैवाहिक जीवन देवीच्या आरतीसारखं मंगल आहे. तात्यांना गेली कित्येक वर्षं ऐकू येत नाही तर मावशींचा एक पाय नि डोळे जरा अधू झालेत. पण दोघांच्या कानाला एकच वॉकमन लावल्यासारखं त्यांना एकमेकांचं सगळं काही न सांगता ऐकू येतं, समजतं! मावशी घासाघासानं आपल्या कुंकवाच्या धन्याचं आयुष्य वाढवतात. तात्या फुरसतीच्या वेळी त्यांना 'उत्तररामचरितम्' किंवा 'गुड अर्थ' वाचून समजावून देत असतात. अशा हिमालयाचा आणि त्याच्या सावलीचा संवाद कुणाला हवाहवासां वाटणार नाही?

अनुक्रमणिका

कृषीवलांच्या उक्ती

....

पावसाळा सुरू झाला की बाबांच्या तोंडी नक्षत्रागणिक लोकोक्ती असायच्या. 'लागल्या चित्रा नि भात खाईना कुत्रा!' 'लागल्या मघा नि टकमक बघा!' अशा कोकणातल्या.

देशावरचे शेतकरी 'पडला हस्त शेतकरी जाला मस्त!' किंवा 'पडतील स्वाती तर पिकतील मोती!' असं बोलायचे.

वर्गात याबद्दल शिकवताना असमच्या रोमेन (रमण) सइकियांनी वर्ग संपताच माझ्या हातात एक कागद ठेवला. त्यातल्या असमिया कृषीवलोक्ती मी आज देणार आहे.

माघी सप्तमीत वरिषे देव
बेहा एरि कर नांगल सेव.

माघी सप्तमीला वरुणदेव बरसला तर इतर उद्योग बाजूला सारून नांगराची सेवा करा.

माघार मासत बरिषे पानी
तेवे अल्प वृष्टि आगे जानि.
माघात पाऊस पडला तर पुढे वर्षभर पाऊस हात आखडणार.
आषाढ नवमी शुक्ल पक्ष
यदि न बरषे भूमिर तलत.
हाल भूमि एरि चिंति देव
रजार घरत करा सेव.

आषाढ शुद्ध नवमीला जर पाऊस पडला नाही तर जमीन, नांगर टाकून देवाला साकडं घालून, राजाच्या वाड्यावर नोकरी मागायला जा!

उत्तरे गातिले जानिबा स्वर
दक्षिणे गाजिले मारिबा लर.

उत्तरेकडे ढग गरजतील तर नुसताच आवाज होईल, दक्षिणेकडे गरजले तर मात्र शिलावृष्टीनं (गारपिटीनं) कंबर मोडेल.

शाउणर पाणी रावणे खाय
भदीया पाणीये घर तर जाय.

श्रावणातल्या पुराची ओल लौकर सुकते पण भाद्रपदातला पूर मात्र घरं, शेती बुडवून नुकसान करून जाईल.

अनुक्रमणिका

अशा आणखीही काही आहेत.

तिकडे 'डाक' हा एक ग्रामज्योतिषी होऊन गेला. जन्मल्यावर चार घटकांच्या आयुष्यात त्यांनी केलेली भविष्यवाणी ती 'डाकवाणी'. त्यातली काही उदाहरणं सुंदर आहेत.

डाके बोले बापु शुना उपाय
बानिजर हल कृषित पाय.
डाक सांगतो, ऐका बुवा. व्यापाराआधी लाभ शेतीत आहे.

सोनारुपा किबा करि
भात ना खाले भोकत मरी.
सोनं-रूपं काय कामाचं? भात मिळाला नाही तर भुकेनं मरायची पाळी येईल.

नांगल बदल सवारे आश
यार नाइ तार सर्वनाश.
नांगर, बैल, वावर ज्याच्याजवळ नाही त्याचा सर्वनाश ठरलेला.

जेठ माह गल बिना नांगले
तार कृषि किमते फले?
ज्येष्ठ गेला तरी ज्याचं शेत नांगरून झालं नाही त्याचं शेत कसं पिकणार?

आहिन कातित राखिणा पाणी
येनेकै राखै रजाई राणी.
अश्विन-कार्तिकात शेतात पाणी असं राखलं पाहिजे, जसा राजा आपल्या राणीची व्यवस्था राखतो.

शाओनर कठिया नहत धान
अहिनर गोच बिफल जान.
श्रावणात भात पेरून उगवणार नाही आणि अश्विनात रोपं आवली तरी विफलच होतील.

जालुकत गोबर पाणत माटि
कलपुलि रुबा तिनबार काटि.
मिरीच्या मुळात शेण, नागवेलीला माती घालावी. केळ लहान असताना तीनदा जागा बदलून दुसरीकडे लावायची म्हणजे भरपूर पीक येईल.

भादर चारि अहिनर चारि
माह बवा थिमान पारि
भाद्रपद चतुर्थीपासून अश्विन चतुर्थीपर्यंत शक्य तेवढी पिकं घ्यावीत.

'शी' त सरियह 'मी' त माह
शरषत ने काटे बेट बाह.

अनुक्रमणिका

शीत म्हणजे एकादशी-द्वादशीला सरसू आणि मीत म्हणजे पंचमी-सप्तमीला कडधान्य पेरू नये. तसं संक्रांतीला वेत आणि वेळू काप नयेत.

अशा तऱ्हेच्या उक्ती अवधी, राजधानी, मलयाळम् आणि ओडियातसुद्धा सहजी मिळतात. सर्व इतक्या सारख्या आहेत की खात्री पटते-कुठेही जा, बेलाला / बोलाला पानं तीन!

अनुक्रमणिका

मिजाजे उर्दू

....

दफ़न तुझमें कोई फ़ख्रे रोजगार ऐसा भी है?
तुझपें पिन्हां कोई मोती आबदार ऐसा भी है?

जीवनातला अभिमान वाटावा असा कोणी या मातीत दफन झाला आहे का? असा आणखी एखादा पाणीदार मोती तुझ्यात दडला आहे का?

इकबालचे हे उद्‌गार गालिबविषयीचे आहेत. मिर्झा गालिबला जन्माला येऊन २७ डिसेंबर, १९९७ ला दोनशे वर्षं झाली.

अव्वल दर्जाच्या उर्दू काव्याचा परिचय आपल्याला भाषांतराच्या वाटेनं झाला असला तरी अद्यापही आमच्या लेखी ती आशुक-माशुकांचीच भाषा आहे. हुस्नोइश्क मुहब्बतच्या चार-दोन ओळी गाऊन श्रोत्यांची टाळकी डोलवणारी भाषा यापेक्षा आपण उर्दूला मोजत नाही.

पण विलक्षण संवेदनक्षम काव्याला अतिशय अनुकूल अशी ती भाषा आहे. उच्चारांची आणि शब्दांची जोडणी यामुळे खऱ्या अर्थानं ती कवितेचीच भाषा आहे. कमीत कमी शब्दांत ती व्यक्त करते, त्यांचं भाषांतर करताना हे लक्षात येतं.

'तू खुदाजू, खुदानुमा हूँ मैं!'

हृदय बुद्धीला म्हणतं, तू ईश्वराची आस बाळगणारी तर मी ईश्वरसदृशच आहे!' हा एक मासला आहे.

प्रणय आणि विरह हा उर्दू कवितेचा मुख्य विषय होताच होता. त्याशिवायही इतर अनेक विषयांवर या भाषेत जे व्यक्त झाले ते मनोरम आहे.

वेदना, शोक कोण्या कवीला चुकला?
'ग़म नहिं ग़म, रुह का एक नग्मा ए खामोश है!'
(दुःख हे दुःख नाही तर ते आत्म्याचं एक मूक गीत आहे.)

'कोई नहीं ग़मगसारे इन्सां (माणसाची दुःखं जाणणारा), क्या तलख है रोज़गारे इन्सां (माणसाचं जीवन किती क्लेशकारक आहे), ग़म सलामत है तो कर लेगा दिल पैदा, खुद मैं फरियाद हूँ मेरी कोई फरियाद नहीं.' असे मानवी दुःखाला त्यांनी पैलूदार शब्द दिले. त्यांनी मृत्यूची आस केली पण तीही आपल्या अंदाजमध्ये!

'ज़िन्दगी से मेरा जी इन दिनों बेजार है.
मरते हैं आरजू में मरने की
मौत आती है मगर आती नहीं.'

अशा अगदी साध्या पण दुथडी अर्थ वाहणाऱ्या ओळींमध्ये.

आपल्याला कल्पना नाही अशा विषयांवर उर्दूत काव्यरचना आहेत.

तल्वार का धनी था, शुजाअत में फर्द था,
पाक़ीजगी में जोशे मुहब्बत मे फर्द था !
(शौर्यात, पावित्र्यात, प्रेमभावनेत अद्वितीय होता.) हे वर्णन प्रभू रामचंद्राचं आहे.

अजिंठ्याच्या लेण्यांविषयी -
दिले कुहसार में महफूज अपनी दास्तां रख दी
जिगरदारों ने बुनियादे जहाने जाविदा रख दी.

(डोंगराच्या काळजात त्यांनी आपली कहाणी सुखरुप ठेवली. सह्रदयांनी चिरंतन सृष्टीचा पायाच घातला) असं या मुर्तिपूजक नसलेल्या इसरत मोहानी नावाच्या टिळकभक्त कवींनी लिहिलं: -

दिल् अहले सितम के बैठ गये,
वो बाल तिलक ने काम किया
बलवंत तिलक !
अय फ़ख्रेवतन बेजुर्म असीरे दामे मिहन

(अत्याचारांचा ऊर दडपावा असं काम टिळकांनी केलं. टिळक, तुम्ही देशाचा मानबिंदू, निरपराध असूनही तुम्ही तुरुंगवास भोगलात.) असे ओजस्वी उद्‌गार काढले आहेत.

शेक्सपिअरला इक्बालनं दिलेली मानवंदनाही दर्जेदार आहे.

हिफ्जे असरार का फितरत को है सौदा ऐसा
राजदां फिर न करेगी कोई पैदा ऐसा

आपली रहस्ये लपविण्याची निसगाची इतकी पराकाष्टा चाललेली असते की, ती जाणणारा (शेक्सपिअर) पुनः तो निर्माण करणार नाही.

या काव्यातल्या उपमाही अनोख्या असतात. अरुणोदय पाहून कवी म्हणतो,

'जिस तरह आहिस्ता आहिस्ता कोइ खींचता हो म्यान की जुल्मत से तेगे आबदार' (मान्याच्या काळोखातून पाणीदार तलवार निघावी.) हिमालयाला कवी' मतला ए अव्वल फलक जिसका हो वो दिवान है तू' (आकाश ज्याच्या आद्यचरण असा ईश्वरी काव्यसंग्रह) म्हणतो.

पारतंत्र्यात हे वतनपरस्त शायर 'ख़ाके वतन का मुझको हर जर्रा देवता है' अंस गात. फाळणीनंतर एका मुहाजिर कवीचे देशभक्तीपर गीत अफाट लोकप्रिय झालं. पाकिस्तानात मुहाजिर म्हणून विरोधकांनी त्याला धोपटले. अखेर तो म्हणाला, 'अर्जे हुनर वजह इ शिकायत हो गयी (हुनर दाखवण्याची इच्छाच तक्रारींचे निमित्त झाली.) छोटा था मुँह मुजसे बडी बात हो गयी.'

उर्दू कवितेचा विशेष हा की, बुडत्या पेशवाईचा, अव्वल इंग्रजी अमदानीचा काळ तिच्या निर्मितीचा उत्कर्षबिंदू होता. इंग्लिश रोमँटीक काव्याची उसनवारी करून तिनं आधुनिक कवितेचा श्रीगणेशा केला

नाही. उर्दूत वैचारिक गद्य फारसं नाही. पण कवितेतल्या अभिव्यक्तीच्या सर्व शक्यता पराकोटीच्या सुंदर बनविण्यातच तिचं सामर्थ्य आहे.

ही एखाद्या धर्माची किंवा देशाची भाषा आहे हा जाणूनबुजून विषारी बनवलेला निव्वळ प्रचार आहे. ती आहे फक्त शायरांची भाषा. म्हणूनच दाग़नं म्हटलं आहे -

उर्दू ही वो नही जो हमारी ज़बां नहीं.

अनुक्रमणिका

अशिक्षितपटुत्वम्

....

एका धनगराला शेरडांच्या कानांकडे पाहून येणाऱ्या पावसाचा अंदाज आला. त्यानं आपल्यासाठी निवारा शोधला. पण त्याच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून पुढे गेलेल्या हवामानतज्ज्ञाला मात्र पावसानं झोडपलं. आपली संशोधन-सामग्री वाचवता वाचवता त्याची त्रेधा उडाली, अशी एक गोष्ट सांगतात. शिक्षणातला फोलपणा सांगण्यासाठी ती आहे, असं नाही पण शिक्षणाला अनुभवाची जोड नसेल तर पढिकपणा, झापडं लावल्यासारखा आंधळेपणा येतो, त्याची ही टिंगल आहे.

भाषेनं आपल्या अवघ्या जीवनाला गवसणी घातलेली आहे, त्यामुळे शिक्षित - अशिक्षितातला फरक भाषेत फारच ठळकपणे दिसतो. शिकलीसवरलेली माणसं कशी *धन्यवाद, माफ करा, प्रत्यवाय नाही, दृष्टीत्पत्तीस आलं, निष्कर्ष काढला, निर्णयाप्रत आलो, तात्त्विक मतभेद, पुनर्विचार करा, कृपादृष्टी असावी* इत्यादी कसं पुस्तक चावल्यासारखं बोलत असतात. त्यांच्या भाषेला पुस्तकांचा एकच काळा-पांढरा रंग असतो. अशिक्षितांच्या भाषेचं तसं नाही. तिचा रंग माणसागणिक निराळा. नव्या घराची सतत घासपूस करणाऱ्या मालकिणीला एकदा म्हातारी मोलकरीण म्हणाली, 'बाई, तुमचं म्हंजी असं हाए, पाटलीण म्हनती मी म्हस घ्येतली न् म्हस म्हनती मी पाटलीण बटिक ठ्येवली!'

अशिक्षिताचं बोलणं त्याला त्याच्या अनुभवावर उभं असतं, ते भुईसपाट विधान कधीच नसतं. एका शेतकऱ्याला, 'भागीत शेती करूया का?' असं विचारताच त्यानं धुडकावलं. 'नग बाबा, पातीत धंदा आन् छातीत लात कशाला हवी?'

कसंही वागा, बोलणी खाणं चुकायचं नाही अशा माझ्या काकांबद्दल आमची आजी करवादायची, 'माझ्या मुरल्याचं पावसासारखं! आला तरी मेला अन् नाही आला तरी मेला!' एक हपिसरीण भाजी खरेदीची सूत्रं आपल्या हाती घेऊन हिंडत होती. नवरा पिशव्या सांभाळत अनुसरत होता. ते बघून मुंडासेवाला भाजीविक्या म्हणतो, 'बघ रं बाबा, जाळी फिरवती भवऱ्याला अन् बायकू फिरवती न्हवऱ्याला!'

अलंकारांचं शास्त्र ज्यांना यमक-प्रास म्हणतं ते सारं काही अडाण्यांच्या भाषेत असतं. पण कसं स्वयंभू, उखळीच्या बारासारखं फुटणारं. म्हणून तर 'ती फुलराणी' मध्ये मंजीचा बा 'अव, बायकू नटलीथटली तरी हौस कुनाची फिटली?' म्हणतो तेव्हा प्रेक्षकात आपटबार फुटतो. 'खिशात न्हाई आना नि मला पाटील म्हना!' 'तुमचं होतं धरण पन आमचं होतं मरण!', 'वरण खाऊन आलं मरण!', 'भुकंला केळं आन् उपासाला रताळं!' अशी कितीतरी चटकदार वाक्यं त्याच्या जिभेवर असतात. ही भाषा वाचनावर नाही तर बारीक निरीक्षणावर पोसते. 'भाजी बघावी देठात, पोळी बघावी काठात अन् बायकू बघावी व्हटात!' अशी ती मार्मिक नजर असते. 'सोनाराची बुद्धी फिरते ठोक्याठोक्यानं, शिंप्याची फिरती टाक्याटाक्यानं, अन् कुलकर्ण्याची टाकाटाकानं!' म्हणून 'सोनार-शिंपी-कुलकर्णी आप्पा यांची संगत नको रे बाप्पा!'

पोथ्यापंडितांच्या भाषेत ज्ञान असतं, माहिती असते. अडाण्यांच्या बोलण्यात जाणतेपण नि शहाणपण दिसतं. इरावतीबाई कर्व्यांच्या बजाबाईला वैधव्य येऊन वीस वर्षं झाली होती. एकदा तिच्या नव्या लुगड्याचं कौतुक करताना त्या म्हणाल्या , 'भाऊ अगदी चोज करतात तुझ!' त्यावर बाजाबाई एवढंच म्हणाली, 'बाई, काय करायची दिरा-भावांची पालखी, भर्तारावाचून नार दिसे हलकी!' 'दादा, गरीबाला बायकू चांगली असावी'. असं माणदेशचा अडाणी रघू म्हणतो तेव्हा जगण्याचाच तळ दाखवतो

ना? कारुण्यच कशाला, कितीतरी विनोदी कथांचा जन्म गावाचावडीच्या गप्पांमध्ये, राखण्यांच्या कहाण्यांमध्ये झालेला आहे. धावत्या बसमध्ये शेजाऱ्याच्या खांद्यावर हेलकांडणाऱ्या प्रवाशाला खेडूत सहज म्हणतो, ‘पाव्हणं, बशीत कसं कपावाणी अल्लाद बसावं!’ त्राकि चेहऱ्यानं शिष्टासारखं तो अंगही चोरत नाही अन् जीभही.

जात्यावरच्या ओव्या, मोटेवरची गाणी, उखाणे, कोडी, भारुडं असं किती अमोलिक धन अडाण्यांनी भाषेला दिलं आहे.मराठीत महदंबा, जनाबाई सोयराबाईपासून ते लक्ष्मुबाई टिळक, बहिणाबाई चौधरी अशा ललामभूत अशिक्षितांची परंपरा आहे. ‘विठ्ठलाचे नाम घेता न ये शुद्ध’ म्हणणारा तुकाराम कवित्वाच्या कळसाला पोचला. अडाण्यांनी भाषेला पुरी रास वोपली आणि समृद्ध केलं. वैचारिक लेखन करून भाषा सकस करण्याची जिम्मेदारी विद्याविभूषितांवर असते. तिथे मात्र सर्वांची तोंडं पश्चिमेला वासलेली दिसतात. हा देश नांगरधारी शेतकऱ्यांनी स्वयंपूर्ण केला; तंत्रज्ञ, डॉक्टर, इंजिनियर ह्यांनी नाही.

अनुक्रमणिका

उपसर्ग

....

'सुसुंदरीच्या सुसरी गळ्यात' अशी आचार्य अत्र्यांनी उपसर्गांच्या सोसाची खिल्ली उडवली होती. 'सुस्वागतम्' हे त्याचं ठळक उदाहरण. आगतम् मागे एक 'सु' लावला की येणाऱ्यामुळे होणारा आनंद, शिष्टाचार सर्व काही साधतं. पण आपण दोन 'सु' लावतो, उगीचच! सुप्रसिद्धचा कुप्रसिद्ध, उन्नतीची अवनती घडवणारी उपसर्ग ही काय भानगड आहे?

शब्दाच्या पुढे येतो तो प्रत्यय किंवा अव्यय, आधी येतो तो उपसर्ग. हा फरक एवढ्यावरच संपत नाही. अव्ययांना अर्थाची स्वायत्तता असते. समोर, वर, खाली स्वतंत्रपणेही वापरले जातात. जागा, दिशा इत्यादी दाखवण्याचं काम त्यांना दिलेलं असतं. प्रत्ययांचं तसं नाही, ते शब्दाचं व्याकरण सांगतात. क्रियापदांशी किंवा दुसऱ्या शब्दांशी असलेला संबंध प्रत्यय दाखवतो. व्याकरणात त्याला कारक म्हणतात. म्हणजे 'मुंबईला जातो' म्हणायचं कारण जाण्यासाठी 'ला' ची गरज आहे. 'भारतीय संघाने शिकस्त केली' म्हटलं की भूतकाळात जमा झालेलं कर्तेपण देणारा 'ने' मानायचा. 'माझं तिच्याशी मुळीच पटत नाही' म्हणताना 'शी' आपले कर्मभोग सुचवणार! याच कारणामुळे प्रत्यय कधी वेगळे नसतात.

उपसर्गही सुटे-सुटे वापरत नाहीत. पण त्यांचं स्थान व्याकरणापुरतं नाही. त्यांना अर्थाचा गडद, ओला रंग असतो; तो शब्दाला लागला की जाता जात नाही! शब्दाचा अर्थ होत्याचा नव्हता करणं, त्याचा तराजू खाली-वर करणं ही किमया उपसर्गांचीच! फक्त 'ना' किंवा 'अ' मुळे लायकाचा नालायक किंवा विश्वासाचा अविश्वास, मर्दाचा नामर्द असं काहीच्या बाही व्हायला लागतं!

'उप' हा उपसर्ग घ्या ना! हिन्दी, बंगाली, उडिया भाषेत भोग म्हणजे नैवेद्य. मराठीत मात्र 'जोगिणीने कृष्णाला भोग दिला' असं म्हटल्यास अनर्थ होईल! आपल्याकडे एक तर नशिबाचे भोग असतात किंवा निंद्य शारीर भोग. पण उपभोग म्हटलं की सर्व भाषांमधले भोग एकाच दावणीला बांधले जातात.

पोट भरण्याला अन्य भाषा जीविका म्हणतात, पण आपण उपजीविका म्हणतो, कारण मुख्य जीविका त्यापुढे असते. एक ललना आपला नवरा आणि मित्र दोघांसह उच्चभ्रूंच्या समारंभात शोभा आणत होती, तिसऱ्यानं चौथ्याला माहिती दिली, (मित्राचाच निर्देश करून) 'तो तिचा मर्द आणि (नवऱ्याकडे) हा उपमर्द!'

मराठीनं संस्कृत उपसर्ग वारसाहक्कानं घेतले पण सगळेच अबाधित राखले नाहीत. परोक्ष म्हणजे दृष्टिआडचा, पण आपण म्हणतो अपरोक्ष. आ चा अर्थ आपादमस्तक आणि आकंठ असा पासून-पर्यंत असा दोन्हीकडे खेचला आहे त्यामुळे आमरणही बरोबर आणि आजन्मही! नीता आणि सु किंवा अ जोडून मोजदाद केली तर निम्म्या बायांची नावं मिळतील, पण अनिता अवचट किंवा सुनिता देशपांडे सर्व निता (?) झाल्यामुळे बापड्या सुणि अ ला अर्थच उरला नाही. ज्यानं अभि आणि अधि उचलून थेट मंत्रालयात नेले तो खरा प्रतिभावंत! सरसकट सगळ्या पत्रांवर पोस्टात शिक्के मारतात तसे शासकीय भाषेत अभिभाषण, अभिवाचन, अभिमत, अधिसूचना, अध्यादेश असे सर्व शासनाधीन झाले! हे लोण जनातही आलं. नाट्यवाचन, काव्यगायन, कवितापठण आपल्याला समजतं, पण एखाद्या विस्मृत कादंबरीचं कुटुंबीयांनी केलेलं वाचन अभिवाचन कशामुळे होतं हे सांगणं कठीण.

अनुक्रमणिका

यावनी भाषेचा उपसर्गही मराठीला चांगलाच झाला. गैरवर्तन, गैरव्यवस्था ह्यात फारसी-संस्कृत तर विनापरवानात संस्कृत-फारसी ही दुहेरी वाहतूक मराठीत अखंड चालली. बेचा पाढा घोकूनही आपण बेअक्कल, बेपर्वा, बेईमान दुप्पट मानले नाहीत. बेची सवय इतकी की बिलाशकचा बेलाशक केला. बिलाकुव्वत, बिलाशकमधला बिला मराठीत उतरला नाही. पुढे जाऊन कोणी म्हणेन बिनशर्त, बिनदिक्कत आणि विनासहकार, विनाविलंब या दोन्ही उपसर्गांची कुळी एकच आहे.

एक गोष्ट खरी की इंग्रजीचं एवढं आक्रमण होऊनही अतिक्रमण झालं नाही. म्हणजेच सब्सूचना, प्रीतयारी,पोस्टमृत्यू असले शब्द घडले नाहीत हे नशीब!

उपसर्ग एखाद-दुसऱ्या अक्षरांचे वरवर निरर्थक वाटले तरी शब्दाच्या अर्थावर त्यांची हुकूमत असते. कोशात उपसर्गाचे अन्य अर्थ आजार, रोगात रोग, संकटांची माळ, दुःख, विघ्न, दुश्चिन्ह, उत्पात, भूतबाधा, ग्रहण, मरणचिन्ह असे दिलेले आहेत. त्यांच्या ताकदीचा एवढ्यावरून आपल्याला अंदाज यावा.

अनुक्रमणिका

आम्हा घरी आहे शब्दांचेच धन

....

गुलाबपाण्याच्या शिडकाव्यासारखी एक बातमी आहे - १४३ वर्षांची परंपरा असलेल्या धुळ्यातील गरुड वाचनालयाला अमेरिकावासी प्रा. अशोक शिंपी यांनी सुमारे १ कोटी २० लाख रुपये किंमतीची ४० हजार पुस्तके भेट दिली. हे प्रा. शिंपी मालेगाव तालुक्यातल्या दाभाडी गावचे. अमेरिकेतल्या कन्सास सिटीतल्या गणित विभागात प्राध्यापक असलेल्या या गृहस्थांची बालवयातील वाचनाची वाढती भूक गरुड वाचनालयाने भागवली होती. त्या कृतज्ञतेपोटी एकूण ४१,२०० मौल्यवान ग्रंथ त्यांनी वाहतुकीचा पावणेदोन लाख रुपयांचा खर्च सोसून ग्रंथालयाला सुपूर्द केले. 'ग्रंथ येति घरा, तोचि दिवाळी दसरा' साजरा करण्यात आला. त्या समारंभात मुख्यमंत्र्यांसह पदाधिकाऱ्यांनी पुस्तकं ठेवायला लागणारी इमारत, कपाटं नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली. बातमीच्या शेवटी 'या ग्रंथसामग्रीचा दूरचित्रवाणीवरील वेगवेगळ्या चॅनल्सच्या जंजाळात सापडलेले धुळेकर कितपत उपभोग घेतात याबद्दल अनेक मान्यवरांनी प्रश्न उपस्थित केला आहे', असं म्हटलंय!

प्रश्न फक्त धुळेकरांचा नाही, सर्वांचाच आहे. शाळा-कॉलेजांच्या विद्यापीठांच्या किंवा सार्वजनिक वाचनालयांच्या गंगाजळीत अनेक देणगीदारांची भर पडलेली असते. विद्वानांनी भेट दिलेली ग्रंथसंपदा त्याच्या नावाचं दालन बनवून ठेवलेली असते. बारकाईनं पाहिल्यास मराठी साहित्यिक, समीक्षक, इतिहासकारांची संख्या शास्त्रज्ञ किंवा डॉक्टर वकिलांपेक्षा जास्त दिसते. देववाणीचे व्यासंगीही कृपणासारखे ग्रंथधन जमवतात. 'कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति। अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति।' चिक्कू माणसासारखा दानी झाला नाही, होणार नाही. (दानाच्या वेळी) हातही न लावता सगळा पैसा तो परक्याला देऊन टाकतो. या वचनाप्रमाणे पुस्तकं ग्रंथालयार्पण होतात. दालनं हे ग्रंथालयाचं भूषण असतं. अनेक अभ्यासकांची त्यामुळे सोय होत असते.

पण हे चित्र जरा उलटं करून पाहिले तर त्यातला वास्तव अर्थ चटका लावणारा आहे. या ग्रंथदानींचे ग्रंथ तेवढेच घराबाहेर झालेले असतात, गंधर्वांच्या ऑर्गनसारखे. त्यांची राहती घरं, आरामदायी सामानसुमान त्यांचे वारस उपभोगत असतात. फक्त पुस्तकं कोण वाचतंय? कोण सांभाळणार? आजकाल जागेची टंचाई! त्यापेक्षा ग्रंथालयात त्यांच्या नावे दिली तर त्यांचं नावही राहील आणि दुसऱ्यांनाही उपयोग होईल इ. इ. युक्तिवाद करुन कोणाला तरी सोपवली जातात. ग्रंथसंग्राहकाचा काळ झाला की पहिली कुऱ्हाड येते ती त्या पुस्तकांवर! फर्निचरही चार जणांना उपयोगी पडावं म्हणून रेल्वेच्या विश्रांती कक्षाला कुणी देत नाही. शिळंपाकं अन्न कुणाच्यातरी मुखी पडावं या उदारतेनं वाढतात, तशी पुस्तकं वाचनालयाच्या धुळीत पडतात. पोटाला चिमटा, कोटाला भोसके सोसून जमवलेल्या पुस्तकांनाच बेवारस करून तो विद्याव्यसनी मरतो. वाचनालयातलं दालनावरचं त्याचं नाव हे ग्रंथ त्याच्या घरातच बेवारशी आहेत याचा लागलेला जाहीरनामा असतो.

प्रत्येकाच्या बाबतीत हे घडतं असं नाही पण अनेकांच्या कपाळी मात्र तेच असतं.अभ्यासकांना त्या पुस्तकांचा उपयोग होतो हे खरं आहे पण त्या साहित्यिकाच्या किंवा विद्वानाच्या घरात काय उरतं? पुण्यातल्या तुळशीबागेत 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे या जागेत राहिले' अशी एक पाटी लटकलेली दिसते. शिवरामपंतांच्या 'काळ' मधल्या निबंधांवर जप्ती आली तेव्हा त्यांनी 'भासाची भवितव्यता' हा भावपूर्ण लेख लिहिला. आपले ग्रंथ आगीत भक्ष्यस्थानी पडताना भास कवीचा जीव किती तडफडला असेल याचं वर्णन करत शिवरामपंतांनी आपले तप्त अश्रू अक्षरांमध्ये ओतले आहेत. पुस्तकं अडगळ म्हणून

घराबाहेर काढलेली पाहून त्यांच्या पालकांच्या आत्म्याला त्याच यातना होत असतील. जन्मभर इतिहासाचा फडशा पाडणाऱ्याच्या घरी कोणी अपेक्षेनं गेला तर तिथे इतिहासकारच नसतो! उत्सवमूर्तीचं निर्माल्यासह विसर्जन झाल्यावर उरलेल्या असतात फक्त घराच्या भिंती. ग्रंथधनावरही पुढे होऊन वारसा हक्क सांगणारे त्या घरात नसतात. डॉक्टरचा मुलगा वडलांच्या वाहत्या प्रॅक्टिससाठी पैका ओतून का होईना पण डॉक्टरच होतो, हे भाग्य पाली- अर्धमागधीच्या किंवा मराठीच्या कुशल विद्वानांसाठी का बरं नाही? शहनाईसारख्या वाद्याची, गाण्याची घराणी होतात, पण वाचणाऱ्यांची घराणी दिसत नाहीत.

प्रा. अशोक शिंपी निघाले. त्यांच्याप्रमाणे शिक्षणासाठी परगावी राहून अधाशासारखे पुस्तकं वाचणारे, दहा पुस्तकांमागे एक बाल-अशोक मिळतील का? इमारत, फर्निचर ह्या ग्रंथालयाच्या भौतिक गरजा असतात. त्या पोसल्या जातात वाचकांच्या भुकेवर! देवी शारदे, ग्रंथकारांना आणि ग्रंथसंग्राहकांना शंभर पुत्र नकोत, एक सत्पात्र छात्र दे! त्यांच्या वंशाला नव्हे, त्यांच्या ग्रंथाना वारस दे!

अनुक्रमणिका

श ष स ह

....

'अरे बाबा, शोर नहीं सोऽर सोऽरऽऽ' ही मुकेशच्या आवाजातली दुरुस्ती अनेकांना आठवत असेल.

बहुतेक भारतीय भाषांची वर्णमाला सारखी आहे. एखाद दुसऱ्या ठिकाणी वेगळेपणा प्रत्येक भाषेत असतो. अवघी दक्षिण व्यापून राहिलेला ळ बंगाली, असमिया आणि राष्ट्रभाषेत नाही. उर्दूतले नुक्ते दुसरीकडे नाहीत. आपल्या 'झालाच पाहिजे' मधलाच इतरांना येत नाही. मलयाळममध्ये पाच ल आहेत. सिंधीतले अन्तर्विस्फोट म्हणजे गळघाटी आत खेचून उच्चारायचे ध्वनी परभाषिकांना अवघड वाटतात. पण सर्व भारतीय भाषांमध्ये गोंधळ उडवून देणारे समान उच्चार आहेत ते म्हणजे श, ष, स आणि ह.

मराठीचंच घ्या ना! आपल्या भाषेत ष आहे पण जिभेवर शच. गायक सुधीर फडके, जीतेंद्र अभिषेकी आणि संस्कृतचे प्राध्यापक (कै.) अरविंद मंगरूळकर अशा काही कोट्यांश टक्के अपवादांच्या कंठात तो मूर्धन्य (पोटफोड्या ष) असतो. पण बाकी आपली भाशा म्हणजेच भाषा समजायची. संस्कृत गंगा मराठीत थोडी उलटी होऊन शर्कराची साखर झाली, शाल्मली सावर झाली, शंकर शंभूही भोळा होऊन सांब झाला. हिन्दीत मात्र शालकाचा साला होऊन शिव्यांमध्येच शिरला. नागर मराठीतली सीता बोलींमध्ये शीता. साबुदाही शाबुदाणा होतो. कोकणात माणून सिक न होता शीक पडतो. पुढारी ग्रामीण भागातला असला तर गोष्टी शाशनाच्या कानांवर घालीन म्हणतो.

श, ष, स, ह असा एक चौकोन करायचा. उत्तरेला बिहार, उत्तराखण्ड, दक्षिणेला महाराष्ट्र, पूर्वेला असम आणि पश्चिमेला काठेवाड-सौराष्ट्र असा दुसरा चौकोन. हे दोन्ही एकत्र आणले की मजाच मजा! काठियावाडी बोलीत सचा ह होतो. 'हाडी हारी छे. हाहू ए आपी. हा हू हवारे हवारे आवी हाती' इतक्या साऱ्या ह मधल्या फक्त शेवटचा ह आहे. बाकी सगळे स. साडी सारी म्हणजे चांगली आहे. सासूनं दिली. सासू सकाळी-सकाळीच आली होती. हा मुळातला मजकूर.

या उलट प्रमाण गुजरातीत शचा स होताना दिसतो. विशेषतः फेसन, डिस्कसन, ओपरेसन अशा शब्दावलीत अरब सागरतीराचं गुजराती आणि वंगोपसागर तटनिवासी उडिया एकाच ओळीत बसतात. एखादी गुजराती मुलगी बिनधास्तपणे आपलं नाव 'सैलबाला' म्हणून सांगते पण खरी ती असते शैलबाला!

हा गोंधळ नावांमध्ये तर विचारूच नका! सुचेता आणि शुचिता या नावांमध्ये नेहमीच गडबड होते. कधी होते सुचिता (चांगली म्हणजे चंदनाची (?)चिता आणि शुचेता (अर्थ नाही). बंगला शरशकट शगळ्या सचे श करतात. म्हणून त्यांची 'शुश्मिता शूमनदी पान खाबेन, शूमनदी आशुन आशुन' ऐकल्यावर मला मी शुमन की शोमन असा संभ्रम पडला, पण ते सुमन म्हणणारच नाहीत. वंगभद्र महिला 'खर्रऽऽऽ' या अर्थी 'शोत्तीऽऽऽ' म्हणतात ते मात्र फार गोड वाटतं.

ओरियात पुनः शचा स. एक विद्यार्थी आपलं नाव सांगत होता, सुकदेव. मी अंदाजे दुरुस्ती करून सुखदेव लिहिलं. त्याला ते अमान्य. वैराग्याच्या इंग्रजी भाषांतरावर ठेचकाळत तो रंगऊर्वशचे दाखले देऊ लागला. तो होता 'शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे' मधला शुकदेव. संसारी झाल्यामुळे वैराग्यावर अधिकार उरला नव्हता. पण सुदामा प्रकृतीमुळे तो सुकदेवच शोभत होता. बिहारी बाबूसुद्धा 'हम वही सक्करवाला स

अनुक्रमणिका

बोल रहे हैं!’ असा हट्ट सोडत नाही. ‘क्रिसन भगवान ने ससुरे सिसुपाल को ऐसन सुनाई...’ अशी त्यांची सची बाराखडी. वर्गात राहिलेली शाल ते ‘ताई तुमची साल!’ म्हणून परत देतात.

सर्वात हाहाःकार माजला आहे, अहोमियात! श, ष, सला ते तालोंबिया रव्हो, मूर्धिनिया रव्हो आणि दोन्तिया रव्हो असे रव्होच म्हणतात! म्हणून पूर्वेच्या पंडिताकडून आशीर्वाद घेऊ नये असं वचन आहे. ‘शतायुर्भव’ हा अर्थ मनात असला तरी मुखावाटे ‘हतायुर्भव’ (आयुष्य संपलेला हो!) असंच बाहेर पडतो. ‘आमि हिरव्हक’ अशी ओळख सांगणाऱ्याच्या जिभेवर ‘शिक्षक’ बसवताना घसा घासावाच लागतो. ‘She sells sea shells near the sea-shore’ हे वाक्य आम्ही त्यांना घोकायला देतो. बिचाऱ्यांचे हाल हाल होतात. सुंदराला हुंदर, संधीला हंदी, अशक्तला अहक्त, सिंहगडचा हिंहगर ऐकायची सवय होईपर्यंत सहा महिने जातात. भरीत भर म्हणून ते ‘च’ ला प्रथम ‘सो’ आणि ‘छ’ ला द्वितीयो ‘शो’ म्हणतात. म्हणून असममध्ये ‘चिटी बस’ लिहिलेलं असतं. कंडक्टरनं प्रवाश्यांना आणि प्रवाश्यांनी कंडक्टरला ठकवावे अशा दुहेरी वाहतुकीसाठी चिटिंग चालते ती चिटी-बस, अशी एकानं व्युत्पत्ती सांगितली. एक जण आपलं आडनाव सुतिया सांगायचा. लिहिताना मात्र सचा च करायचा!
हिन्दीवाल्यांनी ती शिवी आहे हे त्याला समजावलं तरी नाव बदलणार कसं?

या श ष स हनं चक्रावून मी एका अहोमियाला विचारलं, ‘मग तुम्ही सीताची चिता करत असाल?’

तो म्हणाला, ‘नाही. सीता असमियात ‘हिता’ असते.’

वा! ग्रंथकर्त्यांनो, तिच्या नशिबी जिवंतपणी चिता ठेवलीत तरी बाबा ब्रह्मपुत्राच्या अपत्यांना ती ‘हिता’ राहिली.

एका श्वासाचं अंतर

....

बहिणाबाई म्हणते, 'जगणं मरणं, एका श्वासाचं अंतर!' बोलताना, गाताना एका श्वासाचं अंतर म्हणजे विराम घ्यावा लागतो. कवितेत त्याला यती म्हणतात. तो चुकीच्या जागी पडला तर अर्थाचं जगणं मरणात पालटून जातं. ओळीत भलत्या जागी थांबलं की अर्थाचा गळा आवळला म्हणून समजावं. 'साम्य तिळहि नच दिसत मुखाचे, नावतरी कोऽऽऽ' इथे श्वास संपला की, पुढे रवा-शिरावर अशी ऑर्डर द्यावी लागते.

नाट्यसंगीतात अशा गमजा जागोजागी आढळतात. 'रूपबली तो नरशार्दूल राजा' म्हणायचे सोडून 'रूपबली तो नरशाऽऽ' ही तान लांबते. रुक्मिणी नरसिंह चिंतामण केळकरांना की नरसिंह रावांना हाकारत्ये हेच कळत नाही! पुढे श्वास घेऊन 'दुलराजा' म्हटलं की हा राजा गब्दुल असावा असं वाटतं! 'सुजन कसा मन' नंतर चोऽऽऽ इतका लांबतो की ती चोरी आहे हे समजत नाही! 'दाखवयासी मला तात नेति' असं शारदा म्हणते. पण कंजूष कांचनभट पदरमोड करुन मुलीला 'दाखवावयाऽऽऽसिमला' जात होता असा समज होतो! 'कर हा करी धरला शुभांगी, सुदिनी रमाकांतासमोरी' असं वचन देणारा अश्विनशेट 'सुदिनी रमा कांतास मोरी' दाखवतो. शिवाय 'कांतास मोरी, कांतास मोरी' असं तीन-तीनदा घोकतो! कुण्या कांताला मोरीत कोंबतो देव जाणे! वसंतराव देशपांडे ह्यांनी असल्या गमती प्रात्यक्षिकासह दाखवलेल्या (ऐकवलेल्या) अनेकांना आठवत असतील.

मुळात नाट्यसंगीत हेच मुळी कृत्रिम. त्याची रचना आऽऽ ऊऽऽ च्या सोयीनं ठोकलेली. पहिली ओळ नीट पोचली की पुरे! 'शूरा मी वंदिले' ऐकलं की श्रोत्यांच्या भाव लक्षात येतो. पुढच्या तानांसाठी आसुसलेल्यांना मग त्यामागून येणाऱ्या बाराखडीची पर्वा नसते.

शब्दांची ही मोडतोड हिन्दी चित्रपटांमध्ये दिसत नाही. कुंदनलाल सैगल, लताबाई यांची हजारो चित्रपटगीतं सुरांप्रमाणे शब्दगुणांवरही टिकून आहेत. कानातून सहज मनात जाणारे, गुंतागुंत नसणारे निराडंबर शब्द असतात ते. मनातून तितकेच सहजतेनं ते जिभेवर येतात. विचित्र जागी तोडून रसभंग करणारी गाणी जवळजवळ नसतातच. फिल्मी गाण्यांची फारच तरफदारी झाली असं कोणाला वाटेल, त्यांनी मनाशी सहज आठवणारी गाणी पडताळून पहावीत. मुळात शब्दच दोन-तीन अक्षरांचे, त्यामुळे ते मध्येच तोडण्याचा प्रश्नच येत नाही.

मराठी भावगीतं ऐकताना मात्र हे बऱ्याचदा खटकतं. 'जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा' म्हणताना दोन्ही 'जा' एकाच श्वासात म्हटल्यामुळे मुलीला हाकलून देतायत असं वाटतं! तेच 'जा मुली, जा दिल्या घरी, तू सुखी रहा' असं म्हटलं तर जास्त माया वाटते. लताबाईंच्या स्वराचा मध बाभळीच्या काट्यांनाही गोड करतो. पण दुसऱ्या गायक-गायिकांची ही शब्दप्रधान गायकी फारच खटकते. 'चंदनासि हातपायही चंदन' ही ओळ म्हटली जाते. 'चंदनासि हातऽऽ पाय ही चंदन' पुढेही 'दीपालागी पाठीऽऽ पोटी अंधःकारु' शब्दाच्या मध्ये श्वास घुसला की हातपाय तुटणार, आणि पाठपोट अलग होणार!

हे पद्यातच होतं असं नाही. कानांवर पडणाऱ्या रचलेल्या गद्यातही ते दिसतं. आकाशवाणीच्या,दूरदर्शनच्या बातम्यांत किंवा निवेदनात हा लिखित भाषेचा तोंडी आविष्कार दिसतो. वर्तमानपत्रांच्या संपादकांप्रमाणे लिहिण्याच्याच भाषेत लांबलचक वाक्यांचा मजकूर या बोलक्या

माध्यमांसाठी ‘लिहिला’ जातो. तो दूरदर्शनवर तर पडद्यावर बघून वाचायचा. त्यामुळे अनेकदा आपण बातमी ऐकली असं न वाटता अक्षरं ऐकली असं वाटतं! त्यात जाहिरातींचे घुसवलेले आगंतुक विराम असतातच. शिवाय वाचणाऱ्यांचे कृत्रिम विराम विराजमान होतात. मजकुरात विशेषणं, अव्ययं ज्या त्या नामांबरोबर एकत्र हवीत. पण ‘.. गर्दीनं फुललेल्या, रस्त्यां, मुळे...’ असे विचित्र ठिकाणी विराम येतात! उलट हवा तिथे विराम नसतोच . ‘दत्ता सामंतांच्या कुटुंबीयांचे पंतप्रधानांनी सांत्वन केले आणि पंतप्रधान उद्योगपींनी आयोजित केलेल्या मेजवानीस हजर राहिले.’ (!) या दोन वाक्यांची फारकत करायला हवी हे त्यांच्या लक्षातच येत नाही! ओळ सरकत जाईल त्यानुसार वाचायच्या मजकुराला एक आडवी रेघ असते. सलग वाहता प्रवाह नसतो. उपवाक्याचा शेंडाबुडखा लक्षात नसला की, ‘या परिषदेत सदुसष्ट देशांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला असून ते सर्व विकसनशील आहेत’, ‘असे देश सोडून प्रतिनिधीच विकसनशील होतात!

वाचणाऱ्यांनो आणि गाणाऱ्यांनो, जे म्हणायचं ते एका दमात नको. जरा दमादमानं, दमादमानं घ्या !

अनुक्रमणिका

दुर्दशादर्शन

....

पाणिनीच्या अष्टाध्यायीचा भाष्यकार पतंजली म्हणतो, 'एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सम्यक् प्रयुक्तः स्वर्गलोके कामधुक् भवति।' एक शब्द सम्यक् रीतीनं जाणून घेतला, त्याचा अचूक ठिकाणी योग्य उपयोग केला तर स्वर्गलोकात कामना पूर्ण करणाऱ्या गाईसारखा तो दुभता असतो!

शब्द आणि जोडीला संगीत यासाठी 'आकाशवाणी'चा जन्म झाला. आकाशवाणी हा शब्द सम्यक् प्रयुक्त केला तो हिन्दी कवी सुमित्रानन्दन पन्तांनी. कालांतरानं त्याचं धाकटं भावंड जन्माला आलं. त्याचं पाळण्यातलं नाव 'दूरदर्शन'. आकाशवाणीचे काव्यात्म संदर्भ त्याला नाहीत! आठवण झालीच तर 'दुरून डोंगर साजरे' या म्हणीची!

अजून तरी मराठी दूरदर्शन दृश्यप्रधान असण्यापेक्षा शब्दप्रधान माध्यमच दिसतं. मधला वेळ भरून काढण्यासाठी त्यांच्याजवळ दृश्यं नसतात , 'सुविचार संग्रह' असतो! त्यांची पातळी बाळबोध. खरं तर निरपवाद त्याच माणसाची म्हणता येईल अशी भाषा किंवा विचार हवेत, पण त्यांचा असा आग्रह नसतो! वाक्य असं की साने गुरुजी-खांडेकरांपासून ते आंबेडकर- नेहरुंपर्यंत कोणाचंही नाव खाली घालावं अशा सार्वजनिक मालमत्तेसारखं! ते कुठून घेतलंय याचा थांगपत्ता दिलेला नसतो.

यांच्या शिरपेचातले तुरे म्हणजे चर्चेचेच कार्यक्रम. फक्त 'कवी तो आहे कसा आननी' दाखवण्याचा फरक. मराठीत प्रतिभावंत कवी, नाटककार, गीतकार यांची वाण नाही. लावणी - पोवाडा, गोंधळवालेही राष्ट्रपतींची बिरुदं गळाखांद्यावर मिरवणारे. कार्यक्रम त्यांचा असतो तेव्हा जीवही तेच ओततात. प्रश्न येतो दूरदर्शनच्या चाकरमान्यांच्या भाषेचा.

बातम्या, गाड्यांच्या वेळांची, तीथवाराची नाहीतर 'अऽऽसे आहेत आम्चे उद्याचे कार्यक्रम' ची निवेदनं ही माझी हुकमी करमणूक आहे, अहाहा! त्या लिहिलेल्या पाट्या आणि श्रेयनामावल्या! 'मौजे' नं कित्ता गिरवावा असं त्यांचं शुद्धलेखन! 'साळसूद' सारखी समोरून हलू न देणारी मालिका असली तरी श्रेयनामावली सुरू झाली की डोळ्यासमोर कचाकच ऱ्हस्वदीर्घांचे खडे! दिवसाकाठी तुळस वहावी तशा नेमानं पाटीगणिक शुद्धलेखनाच्या चुका वर्षानुवर्षं करायला किती बरं कष्ट घ्यावे लागत असतील!

कार्यक्रमाची संहिता (चुकले ! स्क्रिप्ट) लॉर्ड विलिंग्डनच्या किंवा अव्वल इंग्रजी मिशनऱ्यांच्या मराठीत. चर्चा नाटकाची असली तरी अंगठ्याएवढा बालकलाकारसुद्धा 'त्यांनी स्क्रिफ्ट दाखवण्यापूर्वी जर्म सांगून माझ्या रोलमधल्या पोटन्शियल्सची आयडिया दिली होती!' असं फेकत असतो! अख्खं नाट्यशास्त्र एकही इंग्रजी शब्द न वापरता लिहिणारा भरतमुनी गेला उडत!

अस्सल मनोरंजन हवं असेल तर बातम्या, निवेदनं पहात-पहात ऐकावीत! 'शेवटी ठळक बातम्या'त लातूरच्या भूकंपाची बातमी असली तरी वयाला न शोभणारा लाडिक झटका मानेला देऊनच बातम्या संपतात. निरोपाचं हास्यसुद्धा 'लाडे लाडे केले बाई वेडे' जातीचं घायाळ करणारं! आपण निवेदन किंवा कर्मचारी आहोत हे दाखवण्यापेक्षा 'बाई' आहोत हे दाखवण्याचा अट्टाहास! काय त्या नथी, तन्मणी! किरण बेदीपण दिवाळीच्या दिवशी कामावर जाताना का बरं तन्मणी घालून जात नाहीत?

अनुक्रमणिका

मराठी शब्दांचे उच्चार रंगीबेरंगी कारंज्यांसारखे बहारदार! ब्यूटी पार्लरचे सगळे फवारे आणि ओठांवरचं लिपस्टिकचं 'सील' सांभाळत केलेली कसरत अप्रतिम! मग मराठीतला ओष्ठ्य फ फ्हार, फ्हूल, फ्हळ असा ओठांच्या पोकळीतून अल्लद सुटत असतो. च/च़, ज/ज़, झ/झ़ या उच्चारांची मराठीतली अक्षरं एकच, त्यामुळे 'मंचावर' वाचताना 'मंच' मध्ये चुकीतला 'च' ओठातून निसटतो. चव्हाण, चौधरी ही मराठी आडनावं मराठी चची पण ह्यांच्या तोंडी तीच रजपूत वंशाची होतात! आपला प्रांत महाराष्ट्र आणि खातं माहितीशी बांधलेलं. पण कानांवर सातत्यानं पडतं 'म्हाराष्ट्र', 'म्हाइती'. कुणी नीट 'माहिती' म्हटलं तर चमकायला व्हावं! 'वाजता' ला नेहमी 'वास्ता' दिलेला!

मराठीच कशाला, एकूणच दूरदर्शनवर विशेष नामं कशी उच्चारतात हा चिंतेचा विषय आहे. नाव असतं 'अनादिशरण' पण वाचतात 'अनाडीसरण'! गुढीपाडवा इंग्रजीतून वाचला जातो तेव्हा 'गुढीपरवा' किंवा 'गुऱ्ही परवा' यांतला एक असतो. विकास आमटे भले दुनियेला माहीत असतील, पण निवेदिका त्यांचा 'विकेश आम्ते' करते. सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांसारखी नावं घेण्याचा प्रसंग दूरदर्शनवर येण्याची कमीच शक्यता, नाहीतर त्यांची चित्तरकथाच केली असती!

भारतातील संभाव्य ठिकाणं, माणसं वगैरेंची नावं स्वभाषेत कशी उच्चारली जातात हे संगणकावर शिकवायला आमचे शेट्टी तयार आहेत. ते मूळचे मराठी नसल्यामुळे हे काम ते अचूक जाणतात. पण मग शिकण्याची तयारी? यू नो...

चिदंबरम् अर्थमंत्री होते त्यावेळी अंदाजपत्रक सादर करताना त्यांनी एक तमिळ म्हण सांगितली होती - 'ज्या राजाला टीकाकारांचा राग येतो त्याचा पराभव करण्यासाठी शत्रूची गरज नसते!'

अनुक्रमणिका

मराठीः लेखकांचं आणि संपादकांचं

....

पुरुषोत्तम धाक्रसांनी मराठीतल्या अराजकाविषयी संपादकीय पुरावे देऊन घणाघाती लेख लिहिला आहे. (महाराष्ट्र टाइम्स, ३०.३.९७) तीर्थक्षेत्रावर धर्मकृत्य म्हणून करतात त्या वर्गातलं हे काम केल्याबद्दल त्यांचे उपकारच मानावेत.

भाषेविषयीच्या लेखनात 'सौ सुनार की एक लुहार की' असा हा प्रहार आहे. वर्तमानपत्रात काय लिहून येतं आणि संपादक त्यावर कसला हात फिरवतात याचे अभ्यासपूर्ण पुरावे त्यांनी दिले आहेत. तरीही वर्तमानपत्रांचं आयुष्य तसं एकच दिवसाचं. त्यांच्यापेक्षा पुस्तकांचं जीवनमान जास्त असतं. साहित्यिक गुणांखेरीज अन्य कारणांनीच प्रसिद्धी मिळवणाऱ्या पुस्तकांच्या आवृत्त्याही निघतात. तितकी वर्षं ती पुस्तकं भाषेच्या चुकांचं विष वाचकांमध्ये हळूहळू भिनवत असतात, इतकं की त्या चुका लक्षातही येणार नाहीत अशी बधिरता वाचकांना येते!

सध्या थोरांच्या बायकांची आत्मवृत्तं लोकप्रियतेच्या लाटेवर आहेत; म्हणून त्यातलंच एक निवडू ! कलावंत आईच्या पोटी जन्म आणि कलावंत जीवनसाथीचा लाभ झालेली ही लेखिका आहे. महाराष्ट्रातल्या पहिल्या विद्यापीठाची मराठी विषयातली एम. ए. पदवी घेतल्यामुळे लेखनकलेवर तिचा पदसिद्ध अधिकार आहे! शितावरून भाताचा अंदाज येण्यासाठी चार पानांच्या प्रस्तावनेचाच इथे विचार केला आहे.

'आठवणी लिहून घ्यायचे असे ठरवले होते'. आता हे वाक्य 'आठवणी लिहून घ्यायच्या असे ठरवले होते' असं पाहिजे किंवा 'आठवणी लिहून घ्यायचे ठरवले होते' असं पाहिजे. पुढे - 'ज्या चाहत्यांनी आठवणी पाठवल्या होत्या त्यांची संख्या फारच अल्प होती.' याचा अर्थ चाहते अल्प असा घ्यायचा तर आधी 'प्रचंड प्रतिसाद मिळाला' असं लिहिलं आहे, त्याचा अर्थ काय?

लेखिकेचा 'वैयक्तिक' शब्द लाडका आहे. वैयक्तिक आठवणी, वैयक्तिक पत्रं, म्हणता- म्हणता 'मी वैयक्तिक त्यांना जाऊन भेटले.' झालं! वैयक्तिक हे विशेषण असताना क्रियाविशेषण कसं होईल? उलट मुळातल्या क्रियाविशेषणाला प्रत्यय जोडण्याचा नमुनाही आहे. 'मी प्रत्यक्षपणे संबंधितांना भेटावे' (मी सर्व संबंधितांना प्रत्यक्ष भेटावे -असं पाहिजे.) या वाक्यात क्रियाविशेषणाची जागाही चुकली आहे! क्रियाविशेषण क्रियापदाजवळ आणि विशेषण नामाजवळ असावं.

'प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित डॉक्टरांवरील एक पुस्तक' यात मुलाखतीवर आधारित ही माहिती पुस्तकाची आहे, डॉक्टरांची नाही.

व्याकरण सोडून जरा शब्दांची निवड पहा. *'कलावंत, प्रियकर, पती* अशा *वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांनी....'* व्यक्ती एक तर मग व्यक्तिमत्त्वपण एकच ! अनेक असतात ते त्याचे पैलू.

दुसरं *'खुल्या पुस्तकासारखे'*, *'दुसऱ्याचे हित सांभळण्यासाठी'* हे वाचताना 'खुली किताब', 'दूसरों के हित की रक्षा के लिए' चं सही सही भाषांतर वाचतोय असं वाटतं!

अनुक्रमणिका

‘डॉक्टरांबद्दलच्या’ हे काय गौडबंगाल आहे? तो मधला च्या कुठून घुसला?

‘त्यांना देवत्व प्राप्त करून देण्याचेही घडू नये’ किती आडवळणी रचना! आणि काय घडू नये? पापच ना? मग म्हणा तसं!

वाक्प्रचारही तसेच. *‘कागदपत्रांचा ढीग उपसण्यात माझे कितीतरी दिवसी खर्ची पडले’* तो जर कामाचा आवश्यक भाग असेल तर ‘फुकट गेले’ या अर्थी खर्ची पडले का?

‘आईचे आभार मानणे मला आवश्यक वाटतात.’ आभार अनेक असले तरी ‘मला आवश्यक वाटते’ असंच वाक्य पूर्ण होणार.

‘त्यांच्या दरवेळी येणाऱ्या नव्या नाटकाच्या वेळी... जाणकारांनी लिहिले’ हे दरवेळी येणारं नवं नाटक म्हणजे काय? ते हवं ‘जाणकारांनी दरवेळी लिहिले.

‘सतत पंचवीस वर्षे त्यांना सहन तरी कसे केले...’ ही इंग्रजी रचना सर्वच लेखकांनी सफाईनं मराठीत घुसवली आहे.

एक वाक्य तर असं आहे की ते ना लेखिकेनं वाचलं ना संपादकांनी पाहिलं. *‘डॉक्टरांनी त्यांच्या मरणोत्तर त्यांचा देह वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयोगी व्हावा असे वाटे’* वाचणाऱ्यांनीच हे दुरुस्त करावं झालं!

‘स्वतः सांगितलेल्या स्वतःच्या आयुष्यातील आठवणी’ आणि ‘आत्मनिवेदन माझे’ यातली पुनरुक्तीपण सुधारून घ्यावी. *‘असे घडले असे ठळक निकष मांडले नाहीत’* ते असायला हवं होतं ‘निष्कर्ष’. *‘प्रसंगान्वये घडलेल्या त्यांच्या स्वभावदर्शनातून’, ‘यातील त्रुटितांची (त्रुटींची?) जवाबदारी’* यांचा अर्थ कोणाला लागला तर कृपया कळवावा!

असल्या पुस्तकांच्या आशयाबद्दल लिहिणारे हळवे असतात हे मला माहीत आहे. भाषेच्या चुका दाखवणाराही त्यांना निष्ठूर, पाषाणहृदयी वाटण्याची शक्यता आहे. पण त्यांचा खप आणि यश हीच काळजीची बाब आहे कारण वैचारिक गद्याच्या वाटेला वाचक जात नाहीत. म्हणूनच लोकप्रिय पुस्तकांच्या भाषेची ‘जलशुद्धीकरणासारखी योजना’ राबवायला हवी.

घातक परिणाम दिसल्यावर कारणांचा शोध घेणं समाजाला कोणत्याच बाबतीत परवडणारं नाही. मग भाषेत?

अनुक्रमणिका

दूरदेशीचं प्रौढ लेकरू

....

एक कोटीच्या महाराष्ट्र फैन्डेशनचा संस्थापक सुनील देशमुख माझा वर्गमित्र. एफ. वाय. नंतर (१९६६) आमचे रस्ते फुटले. त्यावर १९९७ मध्ये आमच्या भेटीचा योग आला. इतक्या वर्षानंतर आलेलं त्याचं पत्र पूर्णपणे मराठीत होतं, फक्त फोनचे इंग्रजी आकडे वगळता. बाकी संपर्क साधा, मेळावा भरवतो, जतन करून ठेवलं असं ते शुद्ध मराठी लेखन आहे. आपल्या मराठीत आपण कॉन्टॅक्ट, गेट टूगेदर, प्रिझर्व्ह असे शब्द सहज वापरतो. ते शब्द सुनीलच्या पत्रात नाहीत. 'माझी पुरोगामी वैचारिक बैठक आहे' हेही तो अभिमानानं नमूद करो.

त्याच्याही आधीपासून परदेशात गेलेले बाळ दादा, माझे नातेवाईक. ते विशीतच रशियाला गेले. नंतर अमेरिकेत जाऊन स्थायिक झाले. सातच्या दशकात महाराष्ट्र सोडलेल्या बाळदादांचं मराठीही सुफळ संपूर्ण आहे. आपल्याला 'रक्तबाधेचा आजार झाला होता' असं ते लिहितात. कुठेतरी कसलीतरी बाधा झालेली असणार या त्यांच्या वाक्यात बाधा म्हणजे इन्फेक्शन असं ते सुधारून मी ते वाचलं! कुसुमाग्रजांच्या कवितांची कॅसेट आणि मर्ढेकरांचा काव्यसंग्रह मिळाल्यावर त्यांना ब्रह्मानंद झाला होता. मर्ढेकरांचं वेड ते अगदी भिजल्या स्वरात सांगत होते.

पत्राची भाषा ही मुळातच घरगुती, अनौपचारिक असते, पण ज्यांनी साठच्या आसपास देश सोडला त्यांची वैचारिक लेखनाची भाषाही विलक्षण घरंदाज आढळली. हा सुखद धक्का जयंत लेले यांच्या महाराष्ट्रातील निवडणूक' आणि मराठ्यांचे धुरिणत्व या लेखानं बसला. (समाजप्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून १९९०) गेल्या तीस-पस्तीस वर्षात ज्यांचा भाषाव्यवहार मराठीत जवळ जवळ नाहीच त्यांचा हा लेख स्वभाषेतच लिहिलेला वाटतो. इंग्रजीत लिहून मराठीत भाषांतर केलं असं वाटत नाही इतका एकटाकीपणा लिखाणात आहे. या भाषेत अभिजन, योगदान हे अलिकडचे शब्द आहेत. वर्चस्व (ominance) आणि धुरिणत्व (hegemony) असा अर्थाचा सूक्ष्म फरक दाखवणारी शब्दयोजना आहे. 'प्रभाव-पराभवाचा मागोवा, शेटजी-भटजींच्या वर्चस्वापासून, सुइणीचं आणि दायीचं काम, अशुभ संधान, आदिम अस्मिता, अशब्दांकित मान्यता, सहवीर्याच्या अनुभवासाठी, व्याधिसीमेच्या दिशेने' इत्यादी शैलीदार शब्दरचना त्यांनी विचारपूर्वक केलेली दिसते. मुक्तहस्त दिला आणि मुभा दिली हे दोन्ही प्रयोग त्यांनी अचूक ठिकाणी केले आहेत. अंतिम पंच, शिखर पंच आणि कसबी पंच यातील विशेषणं चोखंदळपणा दाखविणारी आहेत. त्यांचे दडपणूक, तुडवणूक हे शब्द प्रचलित दडपशाही किंवा पायमल्लीपेक्षा अधिक मराठी जातकुळीचे आहेत. 'राज्य संस्थेची वरकड उचलण्याची किंवा भक्कम स्वरुपाची वरकड काढणाऱ्यांना' असे वाक्यांश वाचताना वरकड हा शब्द अनेकांना अपरिचित वाटेल. तोडफोट ऐवजी फोडतोड, शुची-अशुची प्रचारात असताना शौच्य-अशौच्य ही त्यांची रूपं चौकटीबाहेरची वाटतील पण 'भडभुंज्या नेतृत्वासाठी, भांडवलशाहीचे अनधिकृत पायदळ, हुकमी बहुमताच्या अडणीवर बसलेलं आडमुठं सरकार' ही भाषा खास दाद देण्यासारखी! रॉबिनहूडपणा, कंगालीकरण, सामूहिक स्मरण हे लेखकाचे शब्द मार्मिक आहेत. लिहिण्याच्या ओघात 'हाणामारीतून शिक्षेच्या बडग्याच्या धाकाशिवाय जुने सूड उगवून घेता येतात' असं ठणठणीत, अर्थपूर्ण गद्य ते लिहितात.

ही उदाहरणं महाराष्ट्रात राहणाऱ्या मराठी जनांना अंतर्मुख करायला पुरेशी आहेत. तीस वर्षं जे भाषेच्या प्रवाहापासून तुटले त्यांची भाषा निर्भेळ, टवकासुद्धा न उडालेली राहते, आणि आपण? आपण मुद्दाम करतो असं नाही, पण आपण भाषेच्या प्रदूषणाचे बळी ठरतो. कार्यक्रम संपन्न झाला, पुस्तकाचं

विमोचन झालं हे प्रसारमाध्यमांचं आक्रमण आपण निमुटपणे सहन करतो. विशिष्ट वर्गात शिरायला धेडगुजरी भाषेची रंगरंगोटी करतो. 'हात-पाय धुऊन आलो' आणि 'वॉश घेऊन फ्रेश झाले' हे भिन्न सांस्कृतिक वर्ग आपण मानतो. धमक विसरून गट्स, ताण सोडून टेन्शन, घुसमटलो वगळून सफोकेशन झालं असंच बोलत जातो. स्वभाषेची गाय आपण कुणाच्या दावणीला बांधतोय याचं भान आम्हाला नाही. तिच्या लक्तरांची लाजही नाही.

घरापासून हजारो मैल राहणारं दूरदेशीचं प्रौढ लेकरू आई-बापाच्या आठवणी सोन्याच्या मोहरांसारखं जपत असतं. दुसरीकडे म्हाताऱ्यांना सांभाळणं गळ्यात पडलं म्हणून दुसरी मुलं त्यांना वृद्धाश्रमात सोडतात. आता तोच स्वधर्म होऊ पाहतोय, त्यांचा हा स्वधर्मच भयावह आहे.

अनुक्रमणिका

जाबसाल

....

बखरींमध्ये प्रत्युत्तराला, उद्गारांना उद्देशून जाबसाल शब्द आला आहे. सवाल आणि जवाब हे दोन्ही शब्द पोटात सामावणारा हा शब्द आहे. एखाद्या प्रसंगी कोणाच्यातरी बोलण्यावर दुसऱ्यानं काही प्रतिक्रिया व्यक्त केली की तो जाबसाल. जाबसाल म्हणजे हजरजवाब नाही. हजरजवाबी बोलणं तात्काळ चतुराईचं असतं. नेमक्या क्षणी मार्मिक असं काहीतरी सुचण्याला तिथे महत्त्व असतं. पण बखरींमध्ये जाबसाल त्या-त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्त्व झळाळून टाकणारे आहेत. जुन्या काळात महानुभावांचा अपवाद सोडल्यास गद्य रचना कमीच. त्यात बखरींना इतिहासाच्या पंक्तीत वाकडा पाट! पण बखरींची साहित्यात प्राणप्रतिष्ठा करण्यात या जाबसालांचा वाटा फार मोठा आहे.

मोरोपंतांच्या भारतात 'तेव्हा गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म?' असं कृष्ण कर्णाला खडसावतो तोही जाबसालच आहे, पण पद्यातला. पानिपतच्या भीषण शोकांतावर लिहिलेल्या 'भाउसाहेबांच्या बखरीत' असे प्रभावी जाबसाल आहेत. किंबहुना इतर बखरींपेक्षा हीच बखर लोकप्रिय होण्याचं कारणही बहुतांशी तेच आहे.

दत्ताजी शिंदे आणि अब्दाली यांच्या धुमश्चक्रीत निर्वाणीचा प्रसंग पाहून तानाजी खराडा दत्ताजीला म्हणाला, 'निशाण उघडे पडले, अब्रू जाणेचा प्रसंग. निशाण काढता उत्तम आहे.' त्यावर दत्ताजी उत्तर देतो,

'आप मेला जग बुडाले, आब्रू जाते आणि वाचतो कोण? अजून निघावयाची काय बाकी राहिली आहे. सफेजंगी होऊन गेली, आता निशाण काढाल तर फौज पळू लागेल. मग म्याही पलावे? मग देशी. मी दत्ताजीने तोंड काय म्हणून दाखवावे... आम्हा क्षत्रियांचा स्वधर्म हाच की रणात विन्मुख होऊ नये... अपेश मरणाहून वोखटे यात मरणच उत्तम!' या शब्दांनी साक्षात् मृत्यू चरकला असेल. दत्ताजीच्या शौर्यापेक्षा, जगण्यापेक्षाही त्याचं मरण मोठं करणारा हा जाबसाल आहे.

दत्ताजीच्या मृत्यूनंतर त्याचा पुतण्या जनकोजी शोक करत असतो. दत्ताजीची अवघडलेली गर्भार पत्नी त्याला म्हणते, 'बाबा तू रडतोय काय? जयाजी शिंदे यांचे पोटी चौघी लेकी जाहल्या तसीच तू येक जाहली असती तरी आणखी येक जावई येता. पाटील काय घेऊन गेले. तुमची दौलत, महाल, मुलुख, खजिना, हत्ती-घोडे सर्व तुमच्यापाशी ठेवून गेले. तुम्ही हिंमत धरून त्याचे सार्थक करावे. आता रडून होणे काय!' ही खरी वीरपत्नी!

गोविंदपंत बुंदेल्यांचं शीर अब्दाली भाऊंकडे पाठवतो आणि निरोप देतो की 'तुमचे गोविंदपंत पुढे तुम्हास स्वर्गी जागा पहावयास गेले आहेत.' त्या सुन्न स्थितीतही भाऊ म्हणतात,

'तो जागा सर्वांचा आहे, त्याशिवाय दुसरी गती कोणती आहे. प्रस्तुत तुम्ही थोर खंदरचे पातशहा. तुम्ही तेथे जाल तेव्हा तुमचे स्वरूपाप्रमाणे मान झाला पाहिजे. सबब तुमचे मेजवानीचे तरतूदीस पुढे गोविंदपंत गेले आहेत.' विजयाहून पराभवाला महान बनवणारी ही भाषा.

अनुक्रमणिका

युद्धावर निघालेल्या बळवंतराव मेहेंदळ्यांना त्यांची पत्नी निरोप देते, ‘शतवर्षात केव्हातरी मरावे त्यास या संग्रामात मुक्ती आली तरी बहुत बरे जाहाले. त्याची क्षीत कशास करावि? तुम्ही लौकिक करून गेला तरी मीही वाचणार नाही. तुमची सांगातीण होईन!’ या शब्दांनीच पुढे सतीच्या ज्वाळा लपेटून घेतल्या.

मल्हारराव होळकरांच्या बायकोचा - गौतमा बाईचा जाबसालही अतिशय परखड आहे. दत्ताजी पडल्यावर शिंद्यांच्या गोटात समाचाराला, मदतीला जावं अशी गौतमा बाईची इच्छा. पण धास्त खाल्लेला मल्हारराव चरफडतो, ‘तुझे चित्तात आम्ही मरावे असे आहे.’ बायको जाबसाल करते,

‘पती असता कोणी वैधव्याची आशा करील असी कोणीही नाही. अहेवपणे हळदीकुंकूमंडित असावे हीच सर्वांची इच्छा. परंतु जैसे पूर्वाचरण असते तसेच घ्यावे लागते. आपले पदरी लौकिक भारी. तुम्ही आपले घोंगडी विणावयाचे स्वकर्म करीत असता, तरी सहजच वाचावयाची आस्था धरावी.वाटा तरी शूराचा उचलला आहे. वाण सतीचे घेतले आहे. ते सांभाळावे असेच धर्मशास्त्र.’ संस्कृत रसशास्त्रात कान्तासम्मित उपदेश म्हटला आहे तो हाच!

निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्तानं घडलेलं हे बोलणं म्हणजे भाषेचा अतिशय ओजस्वी आविष्कार आहे. बोलणारी माणसं जितकी मोठी होती तितकीच त्यांची भाषाही! नियतीच्या रेट्यापेक्षाही त्यांच्या शब्दात अधिक ताकद होती. म्हणूनच जुनी शस्त्र वस्तुसंग्रहालयात जमा होतात आणि असले जाबसाल भाषेचे जडजवाहीर बनतात.

शेजाऱ्यावर प्रेम करा - भाषेतून !

....

परकियांच्या भाषा शिकणाऱ्यांच्यामध्ये नेपाळ-भूतानसह बृहद् भारतातल्या लोकांचा क्रमांक पहिला आहे. नागोया विद्यापीठानं जपानी भाषा शिकणाऱ्यांसाठी बनवलेल्या पुस्तकातलं हे पहिलं वाक्य आहे. जपान्यांनीच मानलं आहे तेव्हा ते खरंच असणार. कोणालाही याचा अभिमान वाटेल. पण प्रत्यक्षात मात्र आपण आपल्या शेजाऱ्यांच्या भाषा किती कौतुकानं शिकतो हे पाहिलं तर मात्र वरच्या मताबद्दल कोणालाही शंका येईल.

भारत ही सर्वाधिक भाषांची आणि बोलींची प्रचंड प्रयोगशाळा आहे. या देशात भाषा आणि बोली धरून एकूण सोळाशे बावन्न भाषा बोलल्या जातात! लोक पोटापाण्यासाठी देशाच्या टोकाला जाऊन राहतात. महानगरांतच नव्हे तर लहान लहान गावांमध्येही परभाषिक गाववाले होऊन राहिलेले दिसतात! त्यांच्या भाषा त्यांच्या उंबरठ्याच्या आतच असतात. बाहेर मात्र पाण्यात राहिल्यावर तिथल्या माशांची भाषा न शिकून चालत नाही. एकेका भाषिक प्रदेशात त्या त्या भाषेचं वर्चस्व असतं. ते स्वाभाविकही आहे.

प्रश्न येतो तो शेजारच्या भाषेकडे आपण कसं बघतो त्याचा. आपली भाषा तेवढी उच्च कुळीची आणि दुसऱ्या त्या धेडगुजरी हा भाषिक अहंगंड बंगल्यांमध्ये पराकोटीचा असतो. त्यांच्या भाषिक अहंमन्यतेचे चटके असम, ओरिसा आणि बिहारवाल्यांनाच विचारावेत. बंगाली सहसा दुसऱ्याची भाषा शिकत नाहीत. मला स्वतःला गेल्या सतरा वर्षात आमच्या संस्थेत एकही बंगवासी इतर एखादी भाषा शिकायला आलेला दिसला नाही!

हिन्दीवाले राष्ट्रभाषेच्या मचाणावर बसतात. अमिताभ बच्चन, माधुरी दीक्षित त्यांचे हाके घालत असतात. त्यामुळे दुसऱ्यानं आपल्याशी हिन्दीत बोलावं (आणि आपणमात्र साऱ्या मुलाखतींमध्ये अट्टासाहानं इंग्रजीत बोलावं) हा त्यांनी अलिखित कायदाच केलेला. आपण मराठी माणसंही काही कमी नाही. आपली शिष्टमंडळं मॉरिशसला गेली तरी विमानतळावर ‘बहु असोत’ चं वृंदगान करतात.

आपल्या राम गणेश गडकऱ्यांनी विनोदासाठी कानडीला खर्ची घातलं. दगड-गोटे गाडग्यात घालून वाजवले की झाली कानडी, हे आपलं मत! ती भाषा किती सुमधुर आहे हे ज्यांनी डॉक्टर मुगळींसारख्यांची कन्नड ऐकली त्यांनाच माहीत. महाराष्ट्र-कर्नाटकात बेटीव्यवहार अखंड चालू असतो, (म्हणून तर बेळगावचा प्रश्न निर्माण झाला!) पण कन्नड भाषी मुलगी महाराषट्रात आली की तिला मराठी शिकावं लागतं. तिच्यासाठी कोणी कन्नड शिकत नाही. उलट मराठी मुलगी अख्ख्या कुटुंबाला मराठी शिकवते. ती जाम कन्नड बोलत नाही.

परभाषा शिकली जात नाही याचा पुरावा सिन्धी! सत्तेचाळीसपासून सगळे सिन्धी हिन्दी झाले. पण किती हिन्दींनी सिन्धी शिकून घेतली? ती मुळीच न शिकल्यामुळे सिन्धी व्यापारी आपसात बोलताना निर्धोकपणे सिन्धी वापरू शकतात!

या देशात परभाषेबद्दल तुच्छता किंवा अडेलतट्टूपणा परवडणारा नाही. जपानी माणूस दुसरीकडे जाण्यापूर्वी तिथली अभिवादनाची पद्धत, गरजेपुरती आभार-दिलगिरीची नि प्रशंसेची भाषा शिकून घेतो. परक्यांनी त्याची भाषा रिवाजासह वापरली तर त्याला अ(ति) पूर्वाई वाटते. हा सुसंस्कृततेचा भाग आहे.

अनुक्रमणिका

देश तसा वेश खरं तर वरवरचं. देश तशी भाषा, निदान हातखर्चापुरती तरी हवी ! शेजाऱ्यांचे इडली-डोसे, ढोकळे, संदेश आपण खुशीनं जिभेवर चढवतो. पण त्यांची भेट झाल्यावर? तमिळ, कन्नड भाषिकाला आपण सकाळी उठून साहेबाच्या भाषेत गुड मॉर्निंग म्हणतो. जय श्रीकृष्ण, वणक्कम्, सत् श्री अकाल, जय रामजी की इतकंही म्हटल्यानं आपली जीभ विटाळते का? नमस्काराचा उच्चार प्रांतागणिक वेगळा असतो. आपण जसा ऐकला तसा नमस्कार उच्चारायला काय हरकत आहे? सगळं काही आपल्या भाषेतच आहे हा गैरसमज सोडायला हवा.

आमचा एक सहकारी आहे. त्याला कुणी आपल्या प्रांतात बोलावलं की म्हणतो, 'आधी तुझ्या भाषेतल्या आठ-दहा शिव्या शिकव! स्टेशनवर उतरल्यापासून त्यांचा वापर करावा लागेल!'

परभाषांच्या स्वागताची ही वृत्ती हिन्दी चित्रपटांनी आणि पाठोपाठ दूरदर्शन मालिकांनी चालू ठेवली. सौ रब दी, पाडोबा पोरगी फसली, बाबू मोशॉय यांना हिन्दीवाल्यांच्या जिभेवर चढवलं. 'एक कहानी' सारख्या मालिकेत प्रादेशिक भाषांचा उत्तम उपयोग केला होता. दुसऱ्याच्या भाषेत काय सुंदर आहे ते तिची खिडकी उघडल्याशिवाय कसं दिसणार?

'मराठी साहित्य इतकं परभृत आहे की ते खऱ्या अर्थानं परभृत नाही.' असं मर्ढेकर म्हणाले होते. एकूण इंग्रजीवरच कलंडलेलं असल्यामुळे जगातल्या अन्य भाषांचं खतपाणी त्याला मिळालं. साहित्यच काय पण भाषेबद्दलही आपण एकखांबी नाही तर एखाद्याच भाषेवर कलंडलेले आहोत.

देशाबाहेरच्या भाषा शिकण्यात आपण पुढे असूनही पण देशातल्या देशात रोज ज्यांच्या गाठीभेटी होतात त्यांच्या भाषेवर मात्र आपण प्रेम करत नाही.

अनुक्रमणिका

‘अहो, अगं आणि अरे’

....

एक वक्ते व्यासपीठावर श्रीफल विसरून उतरले तेव्हा इरिनानं त्यांना ‘अहोऽऽ’ अशी हाक मारली. या रशियन सुंदरीचा जनानी, नुसताच अहोऽऽ ऐकून सभेत खसखस पिकली. वक्ताही लाजून चूर झाला. आता शेवटच्या पिढीची म्हणता येईल; पण महाराष्ट्रात ‘अहोऽऽ’ ही हाक फक्त नवऱ्यासाठीच असते. इतरांना हाक मारताना अहो नंतर काका, मामा, गोपाळराव असं काहीतरी हवंच. त्यामुळे अनोळखी माणसाला हाक मारताना आपली पंचाईत होते. अपरिचित बाईसाठी किंवा बुवासाठी सर्वमान्य संबोधन नाही. त्यातल्या त्यात ‘अहो बाई’ बरंच सरसकट वापरलं जातं. पण बुवासाठी? काहीही नाही! बाईसुद्धा हरेकाच्या तोंडी असेलच असं नाही. ताई, वहिनी, मावशी, आजी असं वयोमानाप्रमाणे बढत्या देणारं जवळिकीचं संबोधनही कानांवर पडतं. ‘कुण्णापासून मेली वय लपवायची सोय नाही! लोक आपसुक ताईवरून वहिनी, मावशी, आजी म्हणायला लागतात!’ अशी एका पुरंध्रीला खंत वाटायची.

पुरुषांना दुसरे पुरुष भाऊ, काका, आजोबा सहज म्हणतात. पण तितक्या सहजतेनं बायका असं म्हणताना दिसत नाहीत. ‘साहेब’ दिसला तरच कोणी साहेब म्हणणार! म्हणजे कोणी परक्याचं किंवा परकीचं लक्ष वेधून घ्यायला आपल्याकडे निश्चित शब्द नाहीत. ‘अहो’ नंतर ‘शुकशुक’ केलं तर मुलीला तरी धपाटेच मिळणार! कारण ते ‘शुकशुक’ ‘छिकछिक’ च्या असभ्य वाटेला जाणारं!

आपल्या शेजाऱ्यांकडे मात्र तसे शब्द आहेत. गुजरातीत ‘बेन’ आणि ‘भाई’ कसं चटकन म्हणता येतं. अख्खा उत्तर भारत नाती जोडून समस्त महिलावर्गाला ‘बहनजी’ म्हणून हाक मारतो. अगदी पहिल्याच भेटीत परक्याकडून ‘बहनजी’ ऐकताना जरा गिळगिळीतच वाटतं. या उलट दक्षिणेला गेलं की ‘अम्मा’ आणि ‘स्वामी’. ‘मी काय तुझी अम्मी दिसते का रे?’ म्हणून एक तरुणी एका विक्रेत्यावर उखडली होती! पण अगदी पाच वर्षाच्या मुलीलाही अम्मा म्हणायचं अशी त्यांची रीतच आहे. त्यांचा तो ‘अम्मा’ शब्द उच्चारणातही अतिशय मऊ आणि सौजन्यशील असतो.

पूर्वेकडचे लोक ‘मा’ म्हणतात. ते काली माँचे भक्त. आपल्याकडे एकटा तुकाराम ‘पराविया नारी आम्हां रखुमाईसमान’ म्हणत असे. सिन्धी भाषेत पुरुषांना ‘सांई’ आणि बायकांना ‘दादी’ (मोठी बहीण) म्हणायची पद्धत आहे.

वडिलधाऱ्यांना सर्रास ‘काका’ म्हणतात. काका म्हटलं तर मुलाला वळण आहे असं काकालाही वाटतं! इंग्रजांनी आपल्या सर्वांनाच हॅलो आणि सर, मॅडम (मॅम) दिलं. पंजाबी त्या ‘सर’चं ‘सरजी’ बनवतात. बंगालीनं मात्र इंग्रजांच्या संपर्कात राहूनही आपलं ‘मोशाय’ आणि ‘दीदी’ सोडलं नाही. मा, अम्मा, दादीचा वापर आपल्याकडच्या तरुण मुलीला माहीत नसेल तर तिला थोडा राग येईल. याच्या उलटही घडतं.महाराष्ट्रात लकीण मोलकरणीला ‘बाई’ म्हणते आणि मोलकरीणही मालकिणीला ‘बाई’च म्हणते. या समाजवादाचा पहिला झटका उमा शुक्लांना बसला! ‘तुम्हारी हिम्मत कैसे हुई मुझे बाई कहने की?’ असं म्हणत त्यांनी मोलकरणीला सरळ घराबाहेर काढलं कारण त्यांच्या प्रदेशात ‘बाई’ फक्त कोठेवाली!

अहो, अरेसुद्धा सगळ्या भाषांमध्ये समांतर नसतं. आपण आईला ‘आईग’ म्हणतो; पण गुजराती कुटुंबात आई एकेरीवर नसत. उत्तरेत एकूणच आई माजी, माताजी अशी अनेक वचनात. उर्दू तहजीबमध्ये

तर जन्मलेल्या मुलापासून सगळेच ‘आप’. त्यामुळे आपला हक्काचा जवळिकीचा ‘तू’ त्यांच्याकडे विरळा. अरेबिकचे एक विद्वान प्राध्यापक म्हणत, ‘अरे हम तो उम्र भर तरस गए कि कोई हमें तू कह कर पुकारे!’ आपला ‘तू’ जितका प्रेमाचा तितकाच हमरी-तुमरीवर येण्याचाही. बसमधलं बोलणं सुट्या पैशावरून का सुरू होईना, ज्या क्षणी त्यात ‘अरे’ घुसतो तिथून ‘कारे’ ला आरंभ होऊन भांडण पेटतं. मराठीत ‘तू’ चं वर्तुळ मोठं. या उलट ‘आपण’ चं फारच आकसलेलं. त्यामुळे अमराठी लोकांना आपण फारच उर्मट वाटतो. वर्गात एकदा या चर्चेच्या वेळी मी सांगितलं, ‘नामदार गोखले रमाबाई रानड्यांना वहिनीबाईसाहेब म्हणत. तुम्ही हे म्हणून पहा आणि सांगा कसं वाटतं ते!’

उत्तर द्यायला हा अपवाद ठीक आहे, पण परक्याला एक हाक आपल्याकडे नाहीच. संस्कृतातून आपण इतकं काही घेतलं, त्यात ‘भो’ फक्त पंचम जॉर्जपुरताच आला. पुढचं भद्र, भद्रे वगैरे काहीही आलं नाही. म्हणून आपण अगं, तुगं आणि अरेला कारे करत राहिलो.

शुभ बोल

....

कल्याणीचे लग्नातले पाटल्या-बांगल्या तोडे डोहाळजेवणापर्यंत चढेनासे झाले. तिला म्हटलं, 'त्यात काय? वाढवून घे!' लगेच तिनं दुरुस्ती केली,

'देणार आहे मी माप मोठं करायला.'

सवाष्णीची बांगली फुटली न म्हणता वाढवली म्हणायची आपली रीत आहे. वाढवण्याचा तो अर्थ पकडून ही मुलगी वाक्य सुधारून घेत होती. आपण नारळ, कुंकू, मंगळसूत्र वाढवलं, दिवा थोर झाला असं म्हणतो तेव्हा शब्दांचा खरा अर्थ वेगळा असतो. अशुभसूचक शब्दांच्या जागी शुभ शब्द योजण्याला भाषाविज्ञानात euphemism म्हणतात. आपण त्याला शुभ-बोल म्हणूया!

या विशिष्ट शब्दयोजनेमागे सामाजिक धारणा असतात. त्यांचा संबंध थेट संस्कृतीशी असतो. साधारणपणे पौर्वात्यांच्या संस्कृतीत हा समान भाग आहे. आपण निरोप घेताना 'येतो' म्हणतो. कोणी जातो म्हणाला तर 'जातो म्हणू नये, येतो म्हणावं!' असं बजावतो. आपले गुजराती शेजारी 'आवजो' म्हणतात तर कन्नडिगे 'नानु बरुत्तेने' म्हणतात. इतकंच काय, जपानी माणूसही जातो न म्हणता किमास'(येतो) म्हणूनच निरोप घेईल. उर्दूततर 'खुदा हाफिज' असं देवालाच साकडं घालतात. जाणं एकच - या जगातून! ते सुचवू नये म्हणून हा सगळा खटाटोप!

मरणं किंवा मारणं शुभ बनवण्यासाठी चांगले शब्द वापरण्याची ही परंपरा थेट संस्कृतपासून चालत आलेली. पशूचा बळी देण्यासाठी असलेल्या आलभन किंवा संज्ञपन शब्दाचा अर्थ केवळ स्पर्श करणे, जाणीव करून देणे इतकाच आहे. वाढ होणे हा मराठी शब्द ज्या वृध् पासून आला तो मुळात नाळ कापण्यासाठीही वापरत असत. संस्कृतीतल्या अशा धारणांमुळे भाषा किती समृद्ध होते. जन्म ही गोष्ट आनंदाची, उत्सवाची ! तिला एकच शब्द पुरे - जन्मला ! तेच मरण पहा - डोळे मिटले, राम म्हटला, इहलोकीची यात्रा संपवली, देवाज्ञा झाली, निजधामास / देवाघरी गेले, कैलासवासी / वैकुंठवासी / स्वर्गवासी / पैगंबरवासीही झाले, पंचतत्वात विलीन झाले, प्राणज्योत मालवली, काळनं झडप घातली, पोरके करून गेले, आयुष्याची दोरी तुटली इत्यादी किती किती शब्द! माणूस शूरवीर असेल तर वीरगती प्राप्त झाली, धारातीर्थी पडले, धारातीर्थी देह ठेवला, हौतात्म्य पत्करले येईल. अर्थात हुतात्मे केवळ आपले सैनिक होतात, शत्रूचे नुसतचे मरतात. 'नबाब आजारी आहेत' असं सांगणाऱ्या एका गांवढळ बेगमेला 'दुष्मन की तबीयत नासाज़ है!' शिकवण्यात आलं. म्हणता-म्हणता नबाब मेल्यावर तिनं सांगितलं, 'दुष्मन अल्ला को प्यारे हो गए!' दुष्मन जर अल्लाला प्यारा झाला तर बापडा नबाब कुठे गेला? संन्याशांचा त्यातही सवतासुभा. त्यांनी 'समाधी घेतली' म्हणायचं.

शापवाणी उच्चारून जीभ कशाला विटाळा म्हणून सिन्धीत 'तुहींजी बेडी तरे' (तुझी नाव तरो!' म्हणतात. मनात अर्थ (बुडो) हाच असतो! 'गच्छ सूकर, भद्रं ते-' (डुकरा, तुझं भलं होवो!) तरी वेगळं कुठे आहे? शापाप्रमाणे अपमान, पराभवसुद्धा गौरवून सांगण्याची रीत आहे. शत्रूला नमवलं तरी पाणी पाजलं, खडे चारले अशी खाण्यापिण्याची क्रियापदं नाहीतर अस्मान दाखवायचं. एखाद्यानं शिव्या दिल्या तरी 'लाखोली वाहिली' म्हणायचं. कन्नड भाषी तर मंत्रक्षता, मंगळारती असे थोर शब्द वापरतात. कुणाला

अनुक्रमणिका

हाकलल तरी 'नारळ दिला' म्हणायचं. 'मान सांगावा जनात' असं म्हणतात. आपमानही मानवाचक शब्दात सांगावा, असं शुभ-बोल म्हणतात.

पूर्वी साप-घुबडाची भीती म्हणून 'पान लागलं', 'दिवाभीत' असे दूरचे शब्द वापरत. आजही चार-चौघांत न उच्चारण्याच्या गोष्टी आडवळणानं सांगितल्या जातात. शौचाला, बहिर्दिशेला असले सुसंस्कृत शब्द किंवा टॉयलेटला हा इंग्रजी शब्द मूळ शब्दावर झाकण घालतो. अलिकडे इंग्रजी शब्द कितीतरी ठिकाणी शुभबोलाचं काम करतात. गरोदरपेक्षा प्रेग्नन्ट, विटाळ गेला ऐवजी मेनोपॉज बरं वाटतं. मूळव्याध 'पाइल्सचा त्रास' म्हणून सौम्य होतो. आज कुणीही 'हगवण लागली' म्हणत नाही तर डिसेंट्री झाली हेच रुळलंय.

काव्याच्या प्रयोजनांमध्ये 'शिवेतरक्षतये' म्हणजे 'अशुभाच्या नाशासाठी' असंही एक आहे. शुभ-बोलांचा हेतूही तोच असतो. भाषेचा हा अतिशय वरच्या श्रेणीचा, शैलीदार वापर असतो. जोपर्यंत हे शब्दप्रयोग नेमकेपणानं वापरता येत नाहीत तोपर्यंत परभाषा तरी आत्मसात झाली असं म्हणता येणार नाही.

म्ह म्ह म्हणीतला

....

एखाद्याला भाषा आली असं केव्हा समजायचं? या प्रश्नाचं माडगूळकरांचं उत्तर आहे, 'म्हण समजली की ती भाषा आली!' रसायनशास्त्राप्रमाणे एखादा पदार्थ आणि द्रव यांचं अचूक मिश्रण करून ते स्थिर ठेवलं की स्फटिक तयार होतो. तशी एखाद्या समाजाचा जीवनानुभव, त्याचं 'शहाणपण' आणि नेमके शब्द यातून म्हण आकराला येते. या 'अपौरुषेय' वाक्याचा अर्थ प्रत्येकाला पटणारा असतो, त्याचे शब्दही लोकमान्य असतात. एखादा म्हण वापरतो तेव्हा तो जवळजवळ बिनतोड युक्तिवादच करतो. एक म्हण वापरून ढीगभर बोलण्याचे श्रमही तो वाचवतो.

जिथे जिथे जगणारा समाज आहे तिथे तिथे म्हण ही आढळतेच. म्हण नाही अशी भाषा नाही. 'शठं प्रति शाठ्यम्' सारख्या म्हणी थेट संस्कृतातून मराठीत आल्या. 'इतो व्याघ्र इतस्तटि', 'शीर्षे सर्पो देशान्तरे वैद्यः', 'विवाहानन्तरं वरपरीक्षा' अशा कितीतरी संस्कृत म्हणी रोजच्या जगण्याशी बांधलेल्या आहेत. 'जावयासाठी केलेला स्वैपाक आल्यागेल्याच्याही पदरात पडतो' किंवा 'साखरेनं पित्त शमत असेल तर कडू पटोल (म्हणजे काकडीची एक जात) हवा कशाला?' अशी अनुभवाची संस्कृत मात्रा असते देववाणीतल्या साहित्यामुळे आपली म्हणींची मनुष्यवाणी थोडी दुर्लक्षित राहिली हे खरं आहे.

म्हणी आणि समाज यांचं नातं कसं असतं? म्हण अगदी मर्यादित वर्तुळापुरतीही असते आणि सर्व काळ सर्वांचा अनुभव सांगणारीही असते. प्रदेशाचा भूगोल आणि इतिहास अगदी जातीनं म्हणींच्या मागे उभा असतो. 'मांडीखाली आरी नि चांभार पोरांना मारी' हा जातिवाचक पर्याय 'काखेत कळसा' ला असतो. लीळाचरित्रात 'उचलली माणिके हळुवे होती' ही म्हण येते, पण तिचा संदर्भ लोपला. या उलट 'वोठांतरा आले ते देशांतरा जाईल' ही म्हण कालबाह्य वाटत नाही. 'चिंच जसजशी मोठी होत जाते तसतशी जास्त आंबट होते' हे आंध्रात नाहीतर कुठे दिसणार? आपण 'बाजारात तुरी' असं म्हणतो. आसममध्ये 'फणसाची कुयरी झाडावर बघूनच मिशीला तेल लावून बसतो' असं म्हणतात. तिकडे गायी-गुरं-माणसं हे सजीव आकारानं छोटे; आणि लिंबापासून बांबूपर्यंत उगवतं ते ते जंबो'. वावभर होईल एवढा फणस खायला मिळायचा तर किती अवकाश? पण चीक लागू नये म्हणून मिशीला तेल लावणाऱ्या ठेंगण्या असमी माणसाची ही खास प्रादेशिक म्हण. 'पेजेसाठी शेज सजवावी लागते'. 'भावीण नाचते म्हणून न्हावीण नाचते' या म्हणींना प्रादेशिक सीमा आहेतच. या उलट देशकाळाच्या सीमा ओलांडून म्हणी समांतर जातानाही दिसतात.

संस्कृतात अर्धकुक्कुटी न्याय आहे. अर्धी कोंबडी कापून खायला हवी आणि अर्धी अंडी घालायला हवी; हे कसं जमायचं? हेच सांगायला साहेब म्हणतो, 'You cannot have your bread and eat it too' भारतीय भाषांमध्ये म्हणी किती समांतर आहेत याची साक्ष म्हणजे विश्वनाथ नरवण्यांचा कोश.

साधारणपणे पुरुषांपेक्षा बायका म्हणी जास्त वापरतात. 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' सोसणाऱ्यांना म्हणीपुरतीच बोलायची मोकळीक असते! एरव्ही अश्लील वाटेल असंही म्हणीत सहज खपून जातं, उघडपणे बोलता येतं बोलणाऱ्याचं भाषिक 'कॅथारसिस' करणाऱ्या म्हणी कोकणात रग्गड! अलीकडे जगभरातल्या भाषांमध्ये म्हणींचा वापर कमी कमी होत आहे. पूर्वी पिढ्यान्पिढ्या एकाच जागी राहणाऱ्या, तसंच जगणाऱ्या समाजाची एक साचेबंद जीवनशैली होती. त्यांचे समान अनुभव म्हणीत साठत. महायुद्धांनी आणि औद्योगिक क्रांतीनं अनेक उलथापालथी केल्या. दळणवळणाच्या अफाट साधनांनी

माणसं कुठच्याकुठे जायला लागली. पाणी स्थिर राहिना. ‘मायक्रो’ च्या युगात पूर्वीचा ढोबळ एकसंधपणा संपला. बायकांचं नुसतंच चूल-मूल जाऊन बरीचशी राहणी पुरुषांसारखी झाली. पूर्वीची पाठांतरप्रधान शिक्षणपद्धती गेली त्यामुळे चटकन् जिभेवर म्हण येणं कठीण होत गेलं. समाजाचा मोहराच ‘बाबा वाक्यं प्रमाणम्’ कडे पाठ फिरवता झाला. करत-करता ‘काप गेले नि भोकं उरली’ अशी अवस्था म्हणींनाच आली.

जी नाणी चलनातून जातात ती वस्तुसंग्रहालयात सांभाळून ठेवली जातात; व्यवहारातल्या किमतीपेक्षा एक वेगळं मूल्य त्यांना असतं. म्हणून भाषेचा अभ्यास म्हणींशिवाय पूर्ण होणार नाही. मग गावगाड्यापासूनच्या सगळ्या म्हणींचा संग्रह आज नाहीतर कधी करणार!

अनुक्रमणिका

विष्णुपदी

....

'बेलभाषेचे' हे अखेरचं बिल्वपत्र. आयुष्यभर शिवाची अक्षरपूजा करणाऱ्या विष्णू सखाराम खांडेकरांच्या चरणी वहायचं आहे. वि. स. किंवा भाऊसाहेबांच्या जन्मशताब्दीचं वर्ष (१९९७) आहे. त्यांच्या संपूर्ण नावाचा उल्लेख करण्यामागे एक कारण आहे.

एकदा आमच्या संस्थेतल्या मराठीच्या विद्यार्थ्यांना मी कोल्हापूरला खांडेकरांच्या घरी नेलं होतं. मंदाताईंनी (म्हणजे खांडेकरांच्या मुलीनं) आमचं अगत्यानं स्वागत केलं. भाऊंच्या हस्ताक्षरातल्या मजकुराच्या प्रती प्रत्येकाला आठवण म्हणून दिल्या. ज्ञानपीठ पारितोषक, वाग्देवीची मूर्ती इत्यादी पहात जयकृष्ण त्रिपाठी एका पुस्तकापाशी थबकले. त्रिपाठींच गाव गंगोत्रीजवळ. 'ययाती' उचलून इतका वेळ मराठीत बोलणारे त्रिपाठी उचंबळून म्हणाले, 'अरे, यह तो विष्णु सखाराम की पुस्तक है! मैंने रात रात जाग कर इसे पढ़ा है!' त्यांना खांडेकर नावाचा बोध झाला नव्हता; त्यांच्या लेखी ते 'विष्णू सखाराम' होते. खुद्द त्यांच्या वास्तूत आपण उभे आहोत या कल्पनेनं त्रिपाठी थरारून गेले, कृतकृत्य झाले! खांडेकरांच्या वाचकांची पिढी संपली असं वाटत असताना हा सुखद धक्का होता.

असे अनेक वाचक भेटले. रेल्वेत एक गुजराती प्रवासी दिवसभर एका पुस्तकात डोकं खुपसून बसला होता. ते होतं खांडेकारंच्या 'हृदयाची हाक'चं गुजराती भाषांतर. तमिळमध्ये तर शिवाजी गणेशन् हा सांस्कृतिक समास होण्यापूर्वीच खांडकरांचं साहित्य जाऊन पोहोचलं होतं. एका आर्जवी तुरुणानं भाषांतराची अनुज्ञा घेतली आणि जवळ जवळ प्रत्येक पुस्तक तमिळमध्ये अनुवादित केलं. त्यांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या. मराठी-तमिळमधला सेतू झालेले वयोवृद्ध भाषांतरकार श्रीनिवासन् भाऊंच्या जन्मशताब्दीला हयात आहेत ही भाग्याची गोष्ट. तंजावरचे विवेकानंद गोपाळ मराठी शिकले. त्यांच्या संग्रही भाऊंच्या मराठी पुस्तकांच्या बरोबरीनं तमिळ मधलं अक्षर अन् अक्षर जतन केलेलं आहे. अण्णादुरैपासून एम. जी. आर. पर्यंत अनेक राजकीय नेते भाऊंची तमिळ वाक्यं वापरून आपल्या निवडणुकीचे फड जिंकत असं विवेकानंद सांगतात. तमिळभाषी लोक खांडेकरांना अ-तमिळ मानत नाहीत.

आपल्या बहुभाषी देशात भाषांतरकारांनी या वाटा पाडल्या. अव्वल इंग्रजीत छापखान्याच्या शोधाबरोबर इंग्रजी-संस्कृतातली हुकमानुसार भाषांतरं मराठीत आली. पण देशी साहित्य फार उशिरा आलं. शरदबाबू-रवींद्रनाथांचे अनुवाद झाले नसते तर आपल्याला त्यांची ओळख कुठून झाली असती? तोलस्तोई, दस्तयेवस्की रशियनच्या कुलुपात राहते तर जगभरातले वाचक अभिजात साहित्याला मुकले असते. अनुवादाविना 'शाकुन्तल' ग्यॉअटऽपर्यंत पोहोचलं नसतं; शेक्सपीयर मराठी नटांच्या हाती लागला नसता. घराशेजारचे भैरप्पा, अनंतमूर्तीही नुसतेच कानांवरून गेले असते. बऱ्याच विदेशी रचनांचे अनुवाद 'यशसेऽअर्थकृते' होतात. अजूनही 'रागदरबारी' मराठीत आणणारे श्रीपाद जोशी किंवा कन्नड भाषी अनुवादक उमा कुलकर्णी एका हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच आहेत.

वास्तविक एकसंध भारतीय समाजात आंतरभारतीय अनुवाद पाश्चात्त्य संस्कृतीच्या तुलनेत सोपा आहे. आमच्या अभ्यासक्रमात विद्यार्थी मराठी पुस्तकाचा आपल्या मातृभाषेत अनुवाद करतात. त्यांना फारसे सायास पडत नाहीत. माडगूळकरांची 'गावाकडच्या गोष्टी', 'गोष्टी घराकडील' सारखी रचना अभ्यासताना 'आमच्याकडे अगदी असंच असतं!' असा निर्वाळा असमचे विद्यार्थीही देतात. हा लेखक त्यांना जवळचा वाटतो. पुण्या-मुंबईचे लोक मात्र माडगूळकरांना ग्रामीण, प्रादेशिक असली तोकडी विशेषणं

अनुक्रमणिका

लावतात. जी.ए. कुलकर्णींची ‘प्रदक्षिणा’ गुजरातीत लिहिताना मेघनाथींना सांस्कृतिक ओढाताण करावी लागली नव्हती. सलग संस्कृतीचा तो फायदा असतो. गंगोत्रीपासून कन्याकुमारीपर्यंत वाचक जोडणाऱ्या खांडेकरांची जन्मशताब्दी अखिल भारतीय पातळीवर साजरी करायची तर या परस्पर अनुवादाच्या वाटा खुल्या व्हायला हव्यात. ज्ञानपीठानं, साहित्य अकादमीनं गौरवलेल्या ग्रंथांची भाषांतरं सहा महिन्यांच्या आत इतर सर्व भाषांत उपलब्ध व्हायला हवीत. साहित्यिकांची जन्मशताब्दी पुतळे, पोस्टाची तिकिटं काढून करण्यात काय औचित्य आहे? ती साहित्यानंच व्हायला हवी.

‘गंगा ते कावेरी’ अशी कालव्यांची महत्त्वाकांक्षी योजना आपण ऐकत आलो आहोत, सर्व भारतीय भाषांमध्ये अनुवादाचे कालवे जोडायला हवेत. अमृत प्रीतम, इंदिरा संत सर्व वाचकांपर्यंत पोहोचायला हव्यात. उमाशंकर जोशी, वीरेन्द्रकुमार भट्टाचार्य वाचकांना त्यांच्या भाषेत वाचायला मिळावेत. हाताच्या अंतरावरच्या आपल्या भाषांमधलं अंतर मिटायला हवं. भाउंनी गंगोत्रीला जोडलेली कावेरी अखंड वहात रहायला हवी.

अनुक्रमणिका

पानिपताच्या पुण्यपथापासून

कारगिलच्या बर्फाटापर्यंत

विसावलेल्या सर्व हुतात्म्यांनो,

शब्द! जीवनाची अपत्यं.

मृत्यूपर्यंत पोहोचत नाहीत.

म्हणून मी तुमच्या अखंड तेवत्या

स्मृतीवर वाहते आहे

केवळ माझे मौन.

अनुक्रमणिका

काय नाव द्यावं? बेलभाषा?

आडनावामुळे बेली हेच माझं नाव अगदी
डॉ. कालेलकरांपर्यंत रूढ झालेलं होतं
ती थोडी नावाची हौस भागली.

पण खरा भाव थोडा वेगळा होता. भाषेला
शिवरूप मानून मी हा बेल अर्पण केला.

नियमित भटकणाऱ्या बाईबद्दल बोलताना पूर्वी
म्हटलं जायचं. 'ती होय' गेली बेल घालायला !'
त्या बेल घालण्यातला नियमितपणा
'लोकसत्ते' तील सदराच्या आवर्तात बसणारा होता.

कोणी इंग्रजी बेल पकडली तरी 'हकारोनि सांगे तुका'
ही भूमिका असल्यामुळे अर्थ बिघडत नव्हता....

- सुमन बेलवलकर